।। श्री ।।

श्रीदासराम ग्रंथमाला : पुष्प ७४

ॐ

# श्रीतुकाराममहाराज नित्यपाठ

## (सोळा अभंग)

विवरण व तात्पर्यार्थ :

प. पू. श्रीदासराममहाराज केळकर, सांगली

आवृत्ती पहिली सांगली इ.स.२०१९



● श्रीदासराम ग्रंथमाला : पुष्प ७४
श्रीतुकाराममहाराज नित्यपाठ
(१६ अभंग)
(प.पू.श्रीदासराममहाराज लिखित गद्य विवरण व तात्पर्यार्थासह)

● प्रकाशक :
श्री. गुरुप्रसाद सुरेश कुलकर्णी
गोरे बंधू अपार्टमेंट,
गांवभाग, सांगली-४१६ ४१६.

© सर्व हक्क श्री. दीपक चंद्रशेखर केळकर यांचे स्वाधीन

● प्रथम आवृत्ती - इ.स.२०१९
● प्रकाशन दिन : श्रावण शु.६ शके १९४१
मंगळवार दि. ०६/०८/२०१९
प.पू.श्रीदासराममहाराज केळकर
जन्मशताब्दी वर्ष शुभारंभ दिवस

● अक्षर जुळणी
साई कॉम्प्युग्राफीस
३३१ भावे इंजि.वाडा गांवभाग, सांगली.

● मुद्रक : श्रीकृष्ण मुद्रणालय,
औद्योगिक वसाहत, सांगली.

● प्रसाद मूल्य : ५०/- रू.

● प्रत मिळण्याचे ठिकाण : श्री. दीपक चंद्रशेखर केळकर
घ.नं.८२७, श्रीरामनिकेतन, गांवभाग, सांगली-४१६ ४१६.
फोन : (०२३३) २३३१७४७ भ्रमणध्वनी : ९८२२००७५२८

## ।। अनेक प्रणिपात ।।

श्रीतुकाराममहाराजकृत नित्यपाठ (१६ अभंग) (श्रीदासराममहाराजकृत गद्य विवरणासह) हे पुस्तक माझे पितृदेव श्रीदासराम महाराज केळकर यांच्या जन्मशताब्दीच्या निमित्ताने प्रकाशित होत आहे. अत्यंत आनंदाची गोष्ट आहे.

श्रीतुकाराममहाराजांच्या या नित्यपाठाचे बारा अभंग आणि फलश्रुतीचे शेवटचे चार अभंग असे एकूण १६ अभंग होत असल्याने या ग्रंथास ''श्रीतुकाराममहाराज नित्यपाठ (१६ अभंग)'' असे नांव दिले आहे. यातील १२ व १६ दोन्ही आकडे अध्यात्मदृष्ट्या अत्यंत महत्वाचे आहेत. बारा आणि सोळा या जीवनाच्या गती आहेत. या एकत्र आल्या की मोठी पारमार्थिक मौज अनुभवता येते.

बारा सोळा जणी गडे गं । बारा सोळा जणी ।
मिळोनी येती गलगा करिती । मशी गेल्या घेऊनी ।।
दहाव्या घरा जाऊनी सखे गं । दहाव्या घरा जाऊनी ।
सतरावीचे अमृत प्याले । हर्ष जाहला मनी ।।
कशी गत झाली सांगू सये गं । कशी गत झाली सये ।
स्वरूप वारे नयनी भरले । वाचे बोलता नये ।।

बारा आणि सोळा या जीवनाच्या गती-इडा पिंगला/ चंद्र सूर्य एकत्र आल्या की नाम हाताला येते असे श्रीमामामहाराज केळकर म्हणतात, ''इडा आणि पिंगला सुषुम्नेत सरता । रामनाम हाता येत असे ।।'' आणि नाम हाताला आले की ''हरी हाताला येतो, हरि आला हाता । मग कैची भय चिंता ।।''

सोळा आणि बारा अठ्ठावीस म्हणून भगवान श्रीसद्गुरू श्रीज्ञानेश्वरमहाराज यांच्या हरिपाठाचे अभंग २८, ''अभंग हरिपाठ असती अठ्ठावीस । रचिले विश्वासे ज्ञानदेवे।।'' या अठ्ठावीसात चित्त चतुष्टय मिसळले की ३२ होतात, म्हणून आमच्या ती.प.पू.श्रीमामामहाराज केळकर यांच्या श्रीरामपाठाचे अभंग ३२, ''अभंग रामपाठ



असती बत्तीस । वाचिता विश्वास धरोनिया।'' असे त्यांनी शेवटच्या बत्तीसाव्या अभंगात नमूद केले आहे.

श्रीतुकाराममहाराजांच्या या नित्यपाठातील शेवटच्या अभंगात, ''दूर होय विघ्न विठ्ठल म्हणे तुकया । शेवटी निजठाया नेईन मी ।।'' असा निर्वाळा स्वत: श्रीभगवंतानी श्रीतुकाराममहाराजांना दिला आहे. इतके या नित्यपाठाच्या अभंगाचे महत्व आहे.

''शेवटी निजठाया नेईन मी'' हा निजठाय ''देहाच्या निरसने पाविजे त्या ठाया।'' या श्रीमामामहाराजांच्या उक्तीप्रमाणे देहाच्या निरासा शिवाय तो ठाव प्राप्त होणार नाही. तसा निरास व्हावा अशी प्रार्थना भगवान श्रीसद्गुरू श्रीनिंबरगीकरमहाराज यांचे चरणी शतश: लोटांगण घालून करतो.

ती.प.पू. श्रीदासराममहाराजांनी या नित्यपाठाच्या अभंगावरील केलेले विवरण साधकांना अत्यंत उपयोगी पडणारे आहे, त्यामुळे हे पुस्तक श्री गुरूप्रसाद कुलकर्णी यांनी प्रकाशित करून साधकांच्यावर फार मोठे उपकार झाले आहेत. आम्ही सर्व ऋणी आहोत.

शेवटी भगवान श्रीसद्गुरू श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस, माझे आजोबा ती.प.पू.श्रीमामामहाराज केळकर व माझे पितृदेव ती.प.पू.श्रीदासराममहाराज केळकर यांचे चरणी अनेक प्रणिपात !

।। पुंडलिक वरदा हरि विठ्ठल श्रीज्ञानेदव तुकाराम ।।

।। पार्वती पते हरहर महादेव श्री गुरूदेव दत्त ।।

।। श्रीसद्गुरु परंपरा की जय ।।

सांगली

दिनांक : २२/०६/२०१९

श्रीदादांचा कृपाभिलाषी,

चंद्रशेखर

(चंद्रशेखर रामराय केळकर)

## हृद्गद

आपल्या निंबरगी संप्रदायात श्रीतुकाराममहाराजांच्या नित्यपाठातील सोळा अभंगाना अनन्यसाधारण महत्व आहे. प.पू.श्रीदासरामहाराज म्हणतात की हे सोळा अभंग म्हणजे स्वर्गातून आलेले अमृत आहे आणि ही त्रिकाल संध्या आहे. माझी पणजी ती.मातोश्री सौ.इंदिरामाता या सोळा अभंगांचे नित्यपठण करायच्या. या सौ. इंदिरामातांनी देह ठेवतेवेळी जवळच्या सर्वांना मोठ्याने सोळा अभंग म्हणावयास सांगितले व या अभंगांचे श्रवण करतच या माऊलीने देह ठेवला. प.पू.श्रीमामामहाराज यांचेकडे कोणी अनुग्रह मागणेस आला तर ते त्याला काही दिवस सोळा अभंग रोज पठण करा असे सांगायचे. आमच्या 'श्रीरामनिकेतन' मधे हे सोळा अभंग दररोज नित्यनेमाने पठण केले जातात. हिंचेगरी संप्रदायात जी जी स्थाने आहेत, या सर्व ठिकाणी फेर धरून हे सोळा अभंग नेमाने म्हटले जातात. अशा या सोळा अभंगांचे विवरण आमच्या श्रीदासराममहाराजांनी केले आहे. हे सोळा अभंगांचे विवरण सर्वप्रथम 'शांतीकुटीर संदेश' या त्रैमासिकातून यापूर्वी प्रसिध्द झाले. यानंतर त्यांनीच हे सोळा अभंग एकत्रितरित्या पुस्तकरूपाने प्रसिध्द केले. हे विवरण श्रीदासराममहाराजांनी केले असलेने आमचेकडेही या पुस्तकाला वारंवार मागणी येत गेली. याचा विचार करून प.पू.सद्गुरू श्रीदासराममहाराजांचे जन्मशताब्दीनिमित्त हे नवीन रूपात पुस्तक प्रकाशित करावे असे ठरले. यानुसार हे सध्या प्रकाशित होत आहे.

कोणत्याही अभंगाचा नुसता शब्दार्थ लिहिणे वेगळे परंतु अभंगातील प्रत्येक शब्दावर, चरणावर अभ्यासात्मक विवरण करून त्याला श्रीज्ञानेश्वरीतील ओव्या, श्रीदासबोधातील ओव्या, भगवद्गीतेतील श्लोक, इतर संतांचे अभंगातील चरणांचे दाखले देऊन लिहिणे ही तर आमच्या प.पू.श्रीदासराममहाराजांची खासियत होती. अशा या सोळा अभंगांचे विवरण या माझ्यासारख्या मुमुक्षु व्यक्तीला उपयोगी पडेल असेच आहे. या ग्रंथास श्री गुरूदेव रानडेसाहेब यांच्या गुरुपरंपरेतील श्रेष्ठ साधक व



लेखक प्रा. डॉ. नरेंद्र सदाशिव कुंटे, सोलापूर यांचा मोलाचा अभ्यासपूर्ण अभिप्राय लाभला आहे ही आमच्या दृष्टीने भाग्याची गोष्ट आहे. यामुळे या ग्रंथास आणखीनच शोभा आली आहे. त्यांनी लिहिलेला अभिप्राय ही केवळ अपौचारिकता नसून त्यामध्ये सखोल चिंतन तसेच मुमुक्षु व साधकांच्या विषयी असलेल्या जिव्हाळ्याचे प्रतिबिंब दिसून येते. त्या वाचनाने साधकांमध्ये परमार्थाविषयी अधिक जिज्ञासा निर्माण होणार आहे.

तसेच या पुस्तकाला प.पू.श्री.दासराममहाराजांचे अनुग्रहीत श्री.नारायणराव देशपांडे यांनी अत्यंत सुंदर व मार्मिक प्रस्तावना लिहिली आहे. त्यांना धन्यवाद द्यावेत तेवढे थोडे आहेत. कोणत्याही पुस्तकाला प्रस्तावना लिहिणे ही काही सोपी गोष्टी नाही. कारण ते पुस्तक वाचून त्यातील विषय समजून घेऊन त्यावर लिखाण करावे लागते. असे हे सोळा अभंगांचे विवरण असणारे पुस्तक प.पू. सद्गुरू श्रीदासराममहाराज केळकर यांचे जन्मशताब्दि शुभारंभ दिनी प्रकाशित होत आहे हा एक मोठा दुग्धशर्करायोगच म्हणावा लागेल.

असो, अशा या सोळा अभंगांचे श्रवण-मनन-चिंतनाने तुकाराममहाराजांनी सांगितल्याप्रमाणे भवपाश कर्म चुकावेत व भगवंताचे सगुणरूपाचे दर्शन व्हावे अशी प्रार्थना प.पू. सद्गुरु श्रीदासराममहाराज केळकर व माझे पितृदेव प.पू.श्रीआण्णा यांचे चरणी करतो व येथेच लेखणीस विराम देतो.

रविवार दि. १६/०६/२०१९

वटपौर्णिमा

श्रींचा नम्र सेवक,

दीपक चंद्रशेखर केळकर

## अभिप्रायरूप ग्रंथपूजन

## सद्‌भक्ती झालिया सहज साक्षात्कार

चिमड संप्रदायातील थोर आत्मसाक्षात्कारी संत प.पू.रामराय गोविंद तथा दासराममहाराज केळकर यांची जन्मशताब्दी (२०१९-२०२०) साजरी होत असून त्याचा शुभारंभ सोहळा दि. ६ ऑगस्ट २०१९ रोजी विविध कार्यक्रमाने संपन्न होत आहे. त्यानिमित्ताने त्यांचे तीन ग्रंथ प्रकाशित होत असून 'श्रीतुकाराममहाराजांचा नित्यपाठ' (सोळा-अभंग) हा त्यापैकी एक ग्रंथ नव्याने पुनर्प्रकाशित होत आहे. हा ग्रंथ पूर्वी १६ फेब्रुवारी २००३ साली (प्रथमआवृत्ती) प्रसिध्द झाला होता. त्यात थोडा मजकूर व केलेली मांडणी यासह तो आता संप्रदायिक साधक आणि परमार्थप्रेमी यांच्या हाती देण्यात येत आहे. या ग्रंथावर अभिप्राय द्यावा, अशी आत्मीयतेने प्रकट केलेली, त्यांचे चिरंजीव व गुरुपदभूषवित असलेले प.पू.श्री.चंद्रशेखरमहाराज यांची इच्छा माझेकडे पोहोचविली. थोर अशा आत्मसाक्षात्कारी संतांच्या या ग्रंथावर मी अभिप्राय द्यावा, असा माझा अधिकारही नाही आणि अनुभवही नाही. तरी संतांच्या पारमार्थिक ग्रंथाची सेवा विनम्रपणाने करावी, या भूमिकेतून मी त्यांच्या ग्रंथाचे पूजन शब्दसुमनांने करीत आहे. सद्‌गुरुकृपेने ती सर्वांना स्वीकारार्ह व्हावी, म्हणून त्यांचेच चरणी प्रार्थून आहे.

### पूर्वपीठिका :

महाराष्ट्र-कर्नाटक प्रांती मराठी व कानडी अशा दोन्ही भाषांचा समन्वय असलेली एक संप्रदायिक गुरुपरंपरा चिमडसंप्रदाय व निंबरगी संप्रदाय अशा नावाने रूढ झालेली असून त्यापूर्वी श्रीरेवणनाथ-श्रीकाडसिध्द-श्रीनारायणराव भाऊसाहेब निंबरगीकर तथा श्रीगुरुलिंगजंगममहाराज अशी एक परंपरा चालत आली. श्रीनिंबरगीकरमहाराजांपासून दोन शाखा (परंपरा) सुरू झाल्या. त्यापैकी एक म्हणजे चिमड संप्रदाय होय. त्यांत श्रीरघुनाथप्रिय तथा श्रीसाधुबुवामहाराज-श्रीरामचंद्रमहाराज यरगट्टीकर-श्रीहणंमतराव तथा तात्यासाहेब कोटणीसमहाराज-



श्रीरामराय गोविंद तथा दासराममहाराज केळकर-त्यानंतर सध्या गुरुपदी असलेले श्रीचंद्रशेखरमहाराज केळकर अशी परंपरा आहे. दुसरी परंपरा म्हणजे श्रीनिंबरगीकरमहाराज-श्रीभाऊसाहेबमहाराज उमदीकर (त्यांनी इंचगेरी येथे मठस्थापना केल्याने हा इंचगेरी संप्रदाय म्हणूनही ओळखला जाऊ लागला.) नंतर श्रीअंबुरावमहाराज कुलकर्णी (जिगजेणी) व श्री. डॉ.रा. ह. तथा श्रीगुरुदेव रानडे (निंबाळ) तसेच श्रीमती शिवलिंगव्वाआक्का (जत) हे तिघेही श्रीभाऊसाहेबमहाराजांचे अनुग्रहित होते. हे सर्व नमूद करण्याचे कारण एकच की ते म्हणजे या सर्वठिकाणी भजनावली व नेमावली असो, रात्रीच्या भजनात श्रीतुकाराममहाराज यांचे 'बारा-अभंग' नित्याने म्हटले जातात. हे ओळीचे अभंग वा साखळीचे अभंग म्हणून ओळखले जातात. 'हे अभंग गाथेत नसले तरी स्वतंत्ररूपाने मात्र उपलब्ध आहेत. ते पुष्कळ साधुसंतांच्या तोंडी असल्याने उपलब्ध आहेत. त्या अभंगातील विलक्षण प्रेमळपणा व ओतप्रत भरलेला स्वानुभव याचा विचार केला असता हे अभंग तुकाराममहाराजांच्या वाणीतूनच बाहेर पडले असावेत असे सबळ अनुमान आहे' असे डॉ. रा. द. रानडे यांनी 'नित्यनेमावली'च्या प्रस्तावनेत नमूद केले आहे. (पृ.२६-२७)

### नित्यपाठाचे 'अंतरंग' :

श्रीदासराम केळकरमहाराज यांनी 'नित्यपाठातील बारा अभंग' यावर जे विवेचन केले आहे, ते अधिक सविस्तरपणे केले असल्याने तसेच विवरणानंतर ग्रंथाच्या शेवटी त्यांनी 'तात्पयार्थ' देऊन प्रत्येक अभंगाचे चिंतनसूत्रच जोडले असल्याने, ग्रंथाचे नवेपणही त्यातून प्रकटले असून तात्पर्यार्थाने विवेचनाचा जणू 'गणिती ताळा' नोंदविला असल्याने अभ्यासक आणि उपासक यांना तो अत्यंत उपयुक्त ठरला आहे. सर्वच नव्हे, पण कांही निवडक अभंगातील 'विवरण' व त्यांतील 'तात्पर्यार्थ' याविषयीचा विचार इथे प्रकट केला आहे.

श्रीतुकाराममहाराज यांनी लिहिलेल्या बारा-अभंगांची रचना मोठी विलक्षण

आहे. कारण प्रत्येक अभंगातील शेवटची ओळ ‘बोधवचने’ असावीत अशी आहेत. तीच ओळ पुढल्या अभंगात प्रथम येते. त्यामुळे शब्दरचना आणि विचार यात एक ‘साखळीवजा अंतर्मेळ’ आढळून येतो. पारमार्थिक उपदेश करण्यासाठी लिहिलेल्या या अभंगांचा साहित्याच्या अंगानेही एक ‘विशेष–रचना’ म्हणूनही वेगळेपणा पाहावयास मिळतो. कारण अशी रचना फक्त बारा अभंगांचीच असल्याने पाहायला मिळते. त्यामुळे कांही अभंगातील ही वचने व त्यावर श्रीदासराममहाराजांनी केलेले विवरण सूत्रभाष्यासह विशद करण्याचा विनम्र प्रयत्न इथे केला आहे.

बारा (त्यांत दोन अभंग अधिक करून ही संख्या सर्वत्र १४ केली जाते. प्रस्तुत ग्रंथात ही संख्या आणखी दोन अभंगांची भर घालून १६ केली आहे.) अभंगात मुख्यत्त्वेकरून नरदेह घेऊन जन्माला आल्यानंतर जीवाने तो सार्थकी लावण्यासाठी प्रपंचासह परमार्थ करावा, पण त्यांतही ‘अहर्निशी परमार्थ’ केल्यास जन्माचे सार्थक होईल, अशी ग्वाही दिली गेली आहे.

## अहर्निशी-परमार्थ :

आपला जन्म सार्थकी लावावा यासाठी ‘अहर्निशी परमार्थ’ केला पाहिजे, हा महत्त्वपूर्ण उपदेश तुकोबांनी केला आहे. का ? तर प्रपंच हा सुख–दुःखाचा आहे. त्यांतही सुख थोडे आणि दुःख फार असाच अनुभव जीवनात येतो. पण दुःखमुक्त व्हायचे असेल, तर सुखाचा परमार्थ मार्ग शोधला पाहिजे. त्यासाठी सद्गुरुची भेट व्हावी, त्यांचेकडून नामानुग्रह प्राप्त व्हावा, म्हणजे त्या नामाचे स्मरण करणे हा अहर्निशी–परमार्थ होय. कारण गुरु हाच आपला उध्दारकर्ता आहे, ही गोष्ट मनात ठामपणे ठसली पाहिजे... रुजली पाहिजे. गंगाजल जसे पवित्र आहे, तसे सद्गुरुंचे मनही स्वच्छ–पवित्र असते म्हणून त्यांचे ठिकाणीच भगवंत उभा असतो. दुसऱ्या शब्दात सांगायचे, तर अशा सद्गुरुंच्या ठिकाणीच देव असतो, यावर विश्वास ठेवला, तर आपला उद्धार होऊ शकतो. दुःखे कधीच संपत नाहीत, पण भक्तीने ती



पचविण्याची ताकद येते. उपासनेने ही शक्ती मनाला प्राप्त होते. दुसरी गोष्ट ‘अहर्निशी–परमार्थाच्या साधनेशी निगडीत असलेली म्हणजे संतसंग/सत्संग प्राप्त करून घ्यावा. गुरुसंगती, नामसंगती, साधनसंगती, ग्रंथसंगती ही आपण धरू, तर त्यायोगे आपण प्रापंचिक मायाजाळात न गुरफटता परमार्थप्रवृत्त होऊ, हा त्यातला परिवर्तनाचा विचार तिथे अभिप्रेत आहे. देवाला ओळखण्यासाठी साधन केले पाहिजे. नामस्मरण आणि नीतिआचरण या दोन पाऊलांनी ही परमार्थाची वाट चालता येते. नामसाधना दृढपणे केली तरी परमार्थाचा मार्ग सुखाचा होतो. त्याशिवाय असणारे सर्व मार्ग म्हणजे आडरानी भटकंती करणे होय. आपले हित–कल्याण भक्तिपंथ अनुसरण्यात आहे. सद्गुरुंच्या कृपेनेच हा मार्ग सुकर होईल. मग सुखाचा मार्ग सांपडला तर दुःखाची क्षिती कोण करील? ईश्वर दर्शन होण्याने सुखप्राप्ती व दुःखनिवृत्ती होते. भक्तिमार्गाने हाच ‘पालट’ होतो. (अभंग १ ते ७ पर्यंतचा अभंगविचाराचा गाभा)

## अहंकाराची शांती करा :

अभंग क्र. ८ मध्ये परमार्थाच्या वाटचालीत आड येणारे एक महत्त्वाचे कारण श्रीतुकाराममहाराजांनी उपदेशिले आहे. अहंकार हा सर्वात घातक असा दुर्गुण आहे. तो घालविण्यासाठी सर्वाभूती म्हणजे सर्व जीवमात्राविषयी प्रेम–जिव्हाळा ठेवला, तर सर्वत्र ईश्वरांश भरून राहिला अशा जाणीवेने माणून लीन (नम्र) होतो. अहंकार असेल, तर तो कनवाळू ईश्वर कसा भेटेल ? प्रथम सर्व विषयीची (भूतदया) करुणा जर मीपणाला (अहंकाराला) दूर करीत असेल, तर, त्या साधनानेच प्रापंचिक मायेची आसक्ती (तीही एक अहंकाराचीच गोष्ट आहे.) कमी होऊन ‘सर्वाभूती–परमेश्वर’ पाहण्याने प्रापंचिक मायाजाळापासून आपण दूर होतो. एकविधभक्ती घडून येण्यासाठी प्रपंच, कर्तव्यबुध्दीने करावा व परमार्थ प्रेमळ अंत:करणाने करावा, तरच नामस्मरण या भक्तीने व भजन–कीर्तन पोथीपारायण इत्यादी उपाधीने ईश्वरप्राप्ती होऊ शकेल, (उपाधी या भक्तीला पूरकच ठरतात.) भ्रम–भ्रांती नाहिशी होऊन आपली श्रध्दा सद्गुरुशी एकरूप होईल ‘साधु कसा असतो? तर जगात पिशाचवत् वागत

असला तरी अंतर्मनात तो परब्रह्माशी एकरूप झालेला असतो, हेही ध्यानी घ्यावे, असे श्रीतुकाराममहाराजांनी म्हटले आहे, भोंदू साधु काय कामाचे ? साधु-सद्‌गुरु यांचेविषयी प्रेम-श्रध्दा-विश्वास हवा.' श्रीदासराम केळकरमहाराज विचारतात की, 'साधूचे पायासी प्रेम असेल, तर अनुभव कां येत नाहीत ? नुसते कोरडे प्रेम काय कामाचे ? साधुला जे प्रिय ते आपल्याला प्रिय झाले, तर मग ते खरे प्रेम झाले. ज्याला जे आवडते तेच केले तरच त्याचे प्रेम किंवा कृपा संपादन करता येते.' प्रत्येक कर्माचे वेळी माझ्या देवाला (सद्‌गुरुंना) ते आवडेल का ? हा विचार करावा.

### सद्‌भक्ती झालिया साक्षात्कार :

बारा-चौदा अशा संख्येने ओळखले जाणारे हे अभंग 'बारा-अभंग' म्हणून जरी प्रचलित असले तरी 'बारा-अभंगाला सोडू नका' हा श्रीतुकारामांनी केलेला उपदेश मात्र चौदाव्या अभंगात आहे. या अभंगाविषयी विचार करताना त्यातील तीन वचने विशेष महत्त्वाची आहेत. कोणती म्हणाल ? तर स्वर्गलोकीहोनी हे जे अभंग आले, त्याचे 'नित्यनेमे यासी पढता प्रतापे। जळतील पापे जन्मातरीची ।।' असा लाभ साधकांना होईल. नित्यनेमाने अभंग म्हणण्यात एक गोष्ट महत्त्वाची अशी आहे की, भक्तिशास्त्र काय आहे ? त्यातील गुरु-नाम-साधन यांचे स्थान काय आहे ? हे कळून यायला मदत होणार आहे. 'नेमे' याचे इथे दोन अर्थ संभवतात. नियमितपणे हा एक अर्थ, तर दुसरा अर्थ म्हणजे नामाचे स्मरण करण्याने असा होय. पठणाला नाम-स्मरणाची जोड असेल, तरच त्या सर्व अभंगातील भावार्थ मनावर बिंबेल. पापे जळतील म्हणजे काय होईल? तर भक्तिमार्ग हाच मुळी 'पुण्याचा मार्ग' आहे, तर त्याच्या स्मरण, पठण, चिंतन यामुळे पापबुध्दीच नाहीशी होईल. या अभंगात उपदेशाचा मेरूदंड असणारे दुसरे वचन म्हणजे 'सद्‌भक्ती झालिया सहज साक्षात्कार। होईल उध्दार पूर्वजांचा।।' हे होय. सद्‌भक्तीने म्हणजे एकविध भावाने होय. त्यासाठी अगोदर बुध्दीचा पालट व्हावा, असे म्हणतात ती बुध्दी म्हणजे दुर्बुध्दी होय. दुर्बुध्दी, दुर्वासना, दुराचरण हे नाहीसे झाले म्हणजेच सद्‌बुध्दी पदरात



पडते. प्रेम-श्रध्दा-विश्वास या तीन गोष्टींची परिपूर्ती होणे हीच सद्‌भक्ती होणे होय. तीच शुध्द बुध्दी होते. शरीरशुध्दीपुरते स्नान पुरेसे असते पण भक्तीसाठी त्यापेक्षाही मनाची शुध्दी, बुध्दीचा निश्चय महत्त्वाचा असतो. त्यायोगेच सुलभपणे साक्षात्कार घडून येणे शक्य आहे. हेही श्रीतुकाराममहाराज तुम्हा-आम्हाला दंडवत घालून सांगतात. आमच्या-तुमच्या आत्मोध्दाराची संतांना केवढी तळमळ आहे? त्यांचे बहुथोर उपकारच आहेत. शास्त्र सांगतानाही केवढा कनवाळूपणा आहे.

### नामस्मरणानेच आत्मदर्शन :

श्रीतुकाराममहाराजांनी तेराव्या व चौदाव्या अभंगात भक्तीची फलश्रुती सांगितली आहे. श्रीदासराममहाराज यांनी त्या संदर्भात त्रिकाळ नेम आणि त्रिकाळभजन या योगाने ईश्वराचा साक्षात्कार होतो, हे त्रिवार सत्य असल्याचे सांगून श्रीतुकारामांनी ठामपणाने केलेल्या उपदेशाचा गौरवही केला आहे. श्रीदासराममहाराज यांनी आपल्या आईचा एक अनुभवही दिला आहे. बारा अभंग नित्याने म्हणण्याचा त्यांचा परिपाठ होता. अभंग म्हणताना रामनिवास मधून आलेला तुळशीचा सुगंध तेथील साधकांना आल्याचेही नमूद केले आहे. ही गंध प्रचिती देवाचीच खूण आहे. 'अभंग पठण' केल्याने साधक जीवन्मुक्त होतो, असे अभिवचन श्रीतुकाराममहाराज यांनी या अभंगात दिले आहे.

चौदावा अभंगही विशेष महत्त्वाचा आहे कारण त्यांत श्रीतुकारामांनी त्याची एकूण अभंगसंख्या पाच कोटी एक लक्ष चौतीस सहस्र असल्याचे नमूद केले आहे. पण 'बारा अभंगाला सोडू नका' हे प्रेमपूर्वक पण निक्षून सांगितले आहे. 'जीवेभावे करिता होईल दर्शन । प्रत्यक्ष सगुण तुका म्हणे ।।' असे आत्मविश्वासपूर्वक व स्वानुभवावर सांगितलेले आहे. निंबरगी आणि चिमड संप्रदायात सगुणाबरोबर निर्गुणाचेही अनुभव सद्‌गुरु नि साधक यांना येतात, हेही या संदर्भात विशेष महत्त्वाचे आहे. श्रीनिंबरगीमहाराजांना ते पंढरपूर येथे गेले असता प्रत्यक्ष पांडुरंगाने गळ्यातील माळ महाराजांच्या गळ्यात घातल्याचा अनुभव श्रीदासराममहाराजांनी नोंदविला

आहे. श्रीभाऊसाहेबमहाराज पंढरपूरला नवस फेडायला गेले असता भगवंतांनी त्यांच्यावर पुष्पवर्षाव केल्याची हकिकत श्रीमती शिवलिंगव्वा यांनी त्यांच्या पत्रातही लिहिली आहे. त्यावेळी त्या तिथे उपस्थित होत्या. (त्यांनी श्रीगुरुदेवांना लिहिलेल्या पत्रात हा अनुभव लिहून कळविला आहे.) श्रीदासराममहाराजांनी त्याची पुष्टी केली आहे.

**श्रीतुकारामांचा आत्मसंवाद :**

सोळावा अभंग फलश्रुतीचा असला तरी श्रीतुकाराममहाराज यांनी तो अत्यंत आगळ्या-वेगळ्या स्वरूपात लिहिला आहे. जणु विठ्ठलच आपल्याशी बोलत असून त्याने श्रीतुकारामांची प्रशस्ती तर केलीच पण स्वत:च्या मुखाने ग्रंथाची फलश्रुती सांगितली आहे. जणु तो तुकारामांनी स्वत:शीच केलेला आत्मसंवाद आहे, असेच म्हणता येईल. विठ्ठल हे परब्रह्माचेच सगुणरूप असून त्यांनी म्हटले आहे की, हे तुकारामा, तू जे अभंग (बारा-चौदा) लिहिले आहेस, त्यांचे जर नित्यनेमाने पठण केले तर जीवमात्रावर आलेले संकटही दूर होईल. नित्यनेमाने भावपूर्ण स्वरूपात अभंगांचे पठण केले असता जीवमात्रांचे (तुमचे-आमचे) कल्याणच होईल. पाठ करण्यातला एक मंत्रही सांगितला आहे. तो म्हणजे 'नेमे संकटासी करी अकरा पाठ । विघ्न त्याचे स्पष्ट दूर होय ।।' हा होय. 'अकरा-पाठ' याचे दोन अर्थ आहेत. ११ वेळा अभंग पठण करा हा एक अर्थ, आणि दुसरा अर्थ म्हणजे एकावर एक ११ अशा स्वरूपात 'एकावर एक' म्हणजे सदैव असा त्यांत सूचक संकेत आहे. अनेकांनी हा मंत्रपाठ करूनही पाहिला आहे आणि संकटे दूर झाल्याचा अनुभवही घेतला आहे. विघ्ने तर दूर होतीलच, पण विठ्ठलानेच तुकाराममहाराजांच्या वतीने अशी ग्वाही दिली आहे की, 'शेवटी निजठाया नेईन मी' म्हणजेच तुझा उद्धार करून जीवाचे कल्याणही होईल ।। आत्मसंवादाचे रूप घेऊन श्रीतुकोबांनी श्रीविठ्ठलाला साक्षी ठेवून भक्तांच्या आत्मकल्याणाची खात्री दिली आहे. 'बारा-चौदा' अभंगाची ही फलश्रुती आहे.



**तात्पर्यार्थाची 'बळकटी' :**

श्रीदासराममहाराजांनी अत्यंत विस्तृतपणाने अभंग विवरण केले आहे. या संप्रदायात रोज रात्रौ 'कीर्तनसेवा' होत असल्याने त्यांनी भक्तिशास्त्रालाच संकीर्तनाचे स्वरूप दिले. निरूपण पटवून देताना अनेक संदर्भ उद्धुत केले आहेत. शिवाय या ग्रंथाचे वेगळेपण असे की, ग्रंथाच्या शेवटी त्यांनी 'तात्पर्य' देऊन विवरणाची सूत्रवजा पुष्टीच दिली आहे. त्यामुळे विवरण-निरूपण या दोन्हीला 'बळकटी' आली आहे. उदाहरणादाखल त्याचे स्वरूप इथे देत आहे. **अभंग १ :** दु:खरूप जन्माचे मूळरूप शोधून पाहता, कारण जन्म घ्यावा लागतो.(१) पापात्मक पुण्याने प्राणधारीचा जन्म व नरदेहाला येऊन हानी.(२) ज्याचे अंगी रज, तम, सत्त्व आहे, त्याच गुणाने वाया गेला असे होते.(३) अहर्निशी परमार्थ हेच सत्त्वाचे सामर्थ्य.(४) **अभंग-१२ :** स्वर्गलोकीहून आलेले हे सांग अभंग तुम्हालागी धाडले.(१) नित्यनेमे प्रतापे पढता जन्मांतरीची पापे जळतील.(२) मागेपुढे नारायण त्याचे रक्षण करून निर्वाण मांडल्यास तो उडी घालतो.(३) बुध्दीचा पालट, कुमतीचा नाश हीच सद्‌गती.(४) सद्‌गती झालेल्या सहजतेत साक्षात्काराने पूर्वजांचा उद्धार.(५) येणे इहपरलोक साधतील अशी माझी तुम्हास भाक आहे.(६) परोपकारासाठी देवाने सांगितलेला प्रासादिक मेवा ग्रहण करा.(७) येणे तुमची भवव्यथा जाईल अशी सख्या विठ्ठलाची आण आहे.(८) हे सजन्न हो, टाळ आणि कंथा धाडली निशाणी ओळखून घ्या.(९) माझे तुम्हा सर्वांस दंडवत असून देहासहित तुका वैकुंठाला गेला.(१०)

प.पू.श्रीदासराममहाराज केळकर यांचे चरणी मस्तक ठेवून त्यांना शिरसाष्टांग दंडवत घालून हे 'अभिप्रायरूप ग्रंथपूजन' सद्‌गुरुचरणी अर्पण करीत आहे. विद्यमान पीठाधीश प.पू.चंद्रशेखरमहाराजांना विनम्र अभिवादन करतो. त्यांनी कृपाशीर्वाद द्यावा, ही प्रार्थना.

**- प्रा. डॉ. नरेंद्र सदाशिव कुंटे**

दूरभ्रमण : ९४२२६५३६३६

## प्रस्तावना

भागवत धर्माचे कळस होऊन राहिलेले संतश्रेष्ठ श्रीतुकाराममहाराज हे महाराष्ट्राचे भूषण म्हणून गौरविले जातात. सर्वत्र भक्तीचा डांगोरा पिटणारे श्रीतुकाराममहाराज हे भक्तोत्तम तर होतेच तसेच ते ज्ञानी व योगी होते. वेद व उपनिषदामधील अर्थ त्यांनी आपल्या अभंगाद्वारा प्रकट करून जनसामान्यांना मुक्तीचा मार्ग दाखविला. कधीही भंग न पावणारे त्यांचे अभंग हे अलौकिक स्वरूपाचे आहेत. त्याचबरोबर त्यांच्या नित्यपाठातील बारा अभंगांनाही श्रीज्ञानदेवांच्या हरिपाठाप्रमाणे अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे.

रेवणसिध्दांच्या पासून चालत आलेल्या सिध्द संप्रदायाचे भूषण होऊन राहिलेले भगवान सद्गुरू श्रीनिंबरगीकरमहाराज हे साक्षात् श्रीतुकाराममहाराजांचे अवतार होते. प्रत्यक्ष तुकाराममहाराजांनी आपल्या अवताराचे भाकीत करून ठेवले आहे, ''तुका म्हणे संत सज्जनी नारायण सरदार... नामाचा बाजार पंढरी नामाचा बाजार'' श्रीनारायणराव उर्फ श्रीनिंबरगीकरमहाराजांनी या साधन संप्रदायाचा विस्तार केला. श्रीनिंबरगीमहाराजांनी श्रीतुकाराममहाराजांचे निर्याणाचे अभंग म्हणून देह ठेवला. याच कारणामुळे नित्यपाठातील या अभंगांना निंबरगीसंप्रदायात विशेष महत्त्व आहे. आजही निंबाळ, उमदी, कन्नूर व सांगली येथील रामनिकेतन येथे नित्यपाठातील हे बारा अभंग नित्यनेमाने म्हटले जातात. हरिभक्तीचा कळस होऊन राहिलेले श्रीदासराममहाराजांचे पितृदेव श्रीमामामहाराज हे साधनेचेवेळी संध्येप्रमाणे ह्या अभंगांचे पठण करीत असत. श्रीदासरामहाराजांच्या मातोश्री श्रीइंदिराबाई केळकर, हे बारा अभंग दररोज तेरा वेळा म्हणत असत. आयुष्याच्या शेवटच्या दिवसापर्यंत त्यांनी हे अभंग म्हटले. आजही चिमड संप्रदायात श्रीतुकाराममहाराजांचे निर्याणाचे अभंग संतांचे पुण्यतिथी आराधनेच्यावेळी म्हटले जातात.

'नित्यपाठाचे बारा अभंग' या नावाने श्रीतुकाराममहाराजांचा हा नित्यपाठ



ओळखला जातो. परंतु फलश्रुतीच्या शेवटच्या चार अभंगांसह एकूण सोळा अभंग होत असल्याने या ग्रंथास 'श्रीतुकाराममहाराज नित्यपाठ (१६ अभंग)' असे नाव दिले आहे. श्रीदासराममहाराजांनी लिहिलेल्या ह्या सोळा अभंगांच्या विवरणापैकी खालील अभंगांचे विवरण, खालील नमूद केलेल्या 'दासरामलेखन वह्यांचे' मध्ये लिखित आहे.

| अभंग | वही क्रमांक |
| --- | --- |
| ८ | २८३ |
| ९ व १० | १३५ |
| ११ व १२ | २८२ |
| १३ व १४ | २१४ व २८२ |
| १५ | २८२ |
| १६ | ७२ |

अभंग क्रमांक १ ते ७ मधील अभंगांचे विवरण सध्या दासरामलेखन वह्यांमध्ये उपलब्ध नाही. तथापी या सात अभंगांचे व पुढील ९ अभंगांचे विवरण, ''अध्यात्म भांडार, शांती कुटीर, कन्नूर'' यांचेमार्फत 'शांती कुटीर संदेश' या त्रैमासिकात लेखमालेमधून प्रकाशित झाले आहे. त्यानंतर 'शांती कुटीर' कन्नूर यांचेमार्फत ही समग्र लेखमाला (१६ अभंगांचे विवरण), श्रीतुकाराममहाराज नित्यपाठ या नावाने, श्री. एस. एस. वैद्य यांनी दिनांक १८/०२/२००३ रोजी, पुस्तकरूपाने प्रकाशित केली आहे. या पुस्तकाच्या 'प्रकाशकाचे मनोगतात'– श्री. एस. एस. वैद्य लिहितात की, श्रीतुकाराममहाराज यांच्या नित्यपाठाच्या अभंगांवरील लेखमालेसाठी श्रीदासराममहाराज यांना विनंती केली. त्याप्रमाणे श्रीदासराममहाराजांनी श्रीतुकाराममहाराजांच्या नित्यपाठाच्या १६ अभंगांचे विवरण लिहून दिले. अभंग क्रमांक १ ते ७ या अभंगांचे विवरण 'दासराम लेखन' वह्यांमध्ये

उपलब्ध नसल्याने सदर विवरण, 'शांती कुटीर', प्रकाशित 'श्रीतुकाराममहाराज नित्यपाठ' या पुस्तकाप्रमाणे घेतले आहे.

तसेच श्रीदासराममहाराज यांनी श्रीतुकाराममहाराज यांच्या नित्यपाठाची आरती रचली आहे. त्याचेही विवरण श्रीदासराममहाराजांनी वरील पुस्तकासाठी लिहून दिले होते. तेही 'दासरामलेखन वही'मध्ये उपलब्ध नसल्याने या पुस्तकाप्रमाणे प्रस्तुत केले आहे.

श्रीदासराममहाराज यांनी श्रीतुकाराममहाराज यांच्या नित्यपाठाच्या १६ अभंगांचा तात्पर्यार्थ, दासरामलेखन वही क्रमांक ५७, ६१ व २०१ मध्ये लिहिला आहे. तोही यापुढे प्रस्तुत केला आहे. श्रीतुकाराममहाराजांचा मूळ अभंग, त्यावर श्रीदासराममहाराजांनी लिहिलेले विवेचन व शेवटी तात्पर्यार्थ असा अनुक्रम ठेवला आहे.

श्रीदासराममहाराजांनी लिहिलेले नित्यपाठावरील हे विवेचन पारमार्थिक जनांसाठी अत्यंत उपयोगी पडणारे आहे. त्यातही साधकांच्या दृष्टीने हे विवेचन म्हणजे एक अनमोल ठेवाच ठरणार आहे. यामध्ये पारमार्थिक जीवन जगण्यासाठी करावी लागणारी तयारी, पाळावी लागणारी पथ्ये तसेच आचरणात आणावा लागणारा साधनमार्ग, याविषयी विस्तृत मार्गदर्शन आलेले आहे. मनुष्य आयुष्यभर सुखाचा शोध घेतो परंतु अखेरीस त्याच्या हातामध्ये दु:खाशिवाय काही पडत नाही. नित्यपाठातील पहिल्याच अभंगात म्हटले आहे की, 'जन्माचे ते मूळ पाहिले शोधून। दु:खासी कारण जन्म घ्यावा ।।' येथे मानवी जीवनाच्या दु:खाचे मूळ कारण शोधताना अखेरीस 'जन्म घ्यावा लागणे' हेच सर्व दु:खाचे मूळ कारण कसे आहे, याचे स्पष्टीकरण आलेले आहे. या दु:खाचा निरास झाला असता आत्मसुख प्राप्त होते. हे 'आत्मसुख' म्हणजे सुखाचेही सुख असते. असे आत्मसुख प्राप्त होण्यासाठी सद्गुरूंनी सांगितल्याप्रमाणे साधन करावे लागते. असे साधन करताना योग्य ती पथ्ये साधकांनी पाळावयास हवी. हा सर्व विषय येथे विस्ताराने मांडलेला आहे.



नित्यपाठावरील विवेचनामध्ये श्रीदासराममहाराज सांगतात की, स्वरूप साक्षात्काराच्या अंगाने प्राप्त होणारी भक्ती हीच 'अद्वैत' भक्ती होय. 'ज्ञानोत्तर अद्वैत' भक्ती ही सर्वश्रेष्ठ मानली जाते. सद्गुरुकृपेने 'ज्ञानदृष्टी' उघडली असता स्वरूपाचा साक्षात्कार होतो व अखेरीस 'अद्वैत भक्तीची' अवस्था प्राप्त होते.

'साक्षात्कार झालीया सहज समाधी । तुका म्हणे उपाधी गेली त्याची ।।' स्वरूप साक्षात्कार झाला असता, जीवाच्या सर्व उपाधींचा निरास होतो व त्या साधकाला 'सहज समाधी' ची अवस्था प्राप्त होते. उपाधीरहित साक्षात्कारातून सहजतेत येणे हीच खरी समाधी होय, असे तात्पर्य श्रीदासराममहाराजांनी काढले आहे. या अभंगांचे महत्त्व असे आहे की हे अभंग 'स्वर्गलोकीहून' आलेले आहेत. त्यामुळे जो कोणी या अभंगांचे नित्यनेमाने पठण करेल, मनन व चिंतन करेल, त्याच्या बुध्दीचा पालट होईल, त्याची जन्मांतरीची पापे नाहिशी होतील व त्याला सद्गती प्राप्त होईल, असे श्रीतुकाराममहाराज सांगतात.

नित्यपाठातील हे अभंग अत्यंत नादमय व सूत्ररूपाने लिहिलेले आहेत. अत्यंत थोडक्या शब्दामधून येथे पारमार्थिक विषयांचे मर्म उलगडून दाखविले आहे म्हणून श्रीदासराममहाराज श्रीतुकाराममहाराजांच्या समग्र अभंग वाङ्मयाला 'तुकोपनिषद' म्हणून संबोधतात.

या नित्यपाठाचे बारा अभंग व फलश्रुतीचे चार असे एकूण सोळा अभंग आहेत. यातील चौदाव्या अभंगामध्ये – जो साधक या अभंगांचे जीवेभावे पठण करेल, त्याचे भवपाश कर्म चुकतील व त्याला प्रत्यक्ष भगवंताचे सगुणदर्शन होईल, अशी फलश्रुती श्रीतुकाराममहाराजांनी, विठोबाची आण घेऊन सांगून ठेवली आहे. याही पुढे जाऊन सोळाव्या व शेवटच्या अभंगात, श्रीतुकाराममहाराज नव्हे तर प्रत्यक्ष सगुण ब्रह्म विठ्ठल, या बारा अभंगांचे महत्त्व सांगत आहेत.

''दूर होय विघ्न विठ्ठल म्हणे तुकया । शेवटी निजठाया नेईन मी ।।'' ही गोष्ट अध्यात्माच्यादृष्टीने विलक्षण व संतश्रेष्ठ तुकाराममहाराजांच्या परमार्थिक

अधिकाराची साक्ष देणारी आहे. या अभंगांच्या नित्यपठणाने अनेक साधक व संत महात्म्यांना अध्यात्मिक स्वरूपाचा लाभ झाला आहे व तशी विशेष अनुभूतीही आलेली आहे. याचे समग्र वर्णन श्रीदासराममहाराज यांनी फलश्रुतीच्या अभंगांच्या विवरणामध्ये केलेले आहे.

या ग्रंथाच्या मनन व चिंतनाने त्यातील दिव्यत्त्वाचा स्पर्श सर्वांना व्हावा अशी श्रीतुकाराममहाराजांच्या चरणी प्रार्थना करतो. माझ्या हातून ही वाङ्मयीन सेवा घडावी ही केवळ माझे सद्गुरू श्रीदासराममहाराजांची इच्छा होय. त्यांचे चरणी शतश: दंडवत घालून येथेच पूर्णविराम देतो.

– नारायण देशपांडे

सांगली

दि.२२/१२/२०१८



## माझ्या मनातले....

सुश्लोक वामनाचा । अभंगवाणी प्रसिध्द तुकयाची ।
ओवी ज्ञानेशाची । किंवा आर्या मयूरपंतांची ।।

या उक्तीमध्ये श्रीतुकाराममहाराज यांच्या अभंगाचे महत्व स्पष्ट केले आहे. जगद्गुरु श्रीतुकाराममहाराज यांनी असंख्य असे अभंग लिहिले आहेत. 'राघवे सागरात पाषाण तारीले । तैसे या तुकोबाचे अभंग रक्षीले ।' असे त्यांचे वैशिष्ठ्य आहे. त्या अभंगापैकीच श्रीतुकाराममहाराज नित्यपाठ म्हणून म्हणले जाणारे सोळा अभंग फारच फलदायी आहेत. त्यांचे नित्यपठण आमचे श्रीरामनिकेतन मध्ये होते. या अभंगांचा विस्तृत गद्यअर्थ व तात्पयार्थ माझे सद्गुरु प.पू.श्रीदाराममहाराज यांनी अत्यंत अधिकार वाणीने व अनुभवजन्य प्रकारे लिहिला आहे.

तेच पुस्तक 'श्रीतुकाराममहाराज नित्यपाठ' या नावाने प्रकाशित करण्याची संधी मला प्राप्त झाली हे मी माझे परमभाग्य समजतो. हे पुस्तक पूर्ण होणेकामी श्रीदासरामहाराज यांचे कृपेतील ज्येष्ठ श्री.नारायणराव देशपांडे यांनी मोलाचे सहाय्य केले आहे त्यांचा मी ऋणी आहे.

अक्षर जुळवणीचे काम साई कॉम्प्युग्राफीक्स यांनी केले असून मुद्रणे तपासणे काम श्री. रमेश लाळे यांनी केले आहे. त्यांचे ही आभार. छपाईचे काम श्रीकृष्ण मुद्रणालयाचे श्री.खाडिलकर यांनी केले आहे. ह्या सर्वांचे मी मनापासून आभार मानतो.

विशेष म्हणजे या पुस्तकासाठी प.पू.श्रीआण्णामहाराज यांचे आशीर्वाद लाभले. श्री. दीपक चं. केळकर तथा नाना यांचे मोलाचे चार शब्द आणि नारायण देशपांडे यांची प्रस्तावना लाभली आहे आणि माझे मित्र श्री. प्रसन्न गोखले या सर्वांचा मी अत्यंत ऋणी आहे.

सद्गुरु श्रीदासराममहाराज यांच्या कृपेने अशीच सेवा माझेकडून व्हावी अशी प्रार्थना करून इथेच थांबतो.

।। राजाधिराज सद्गुरुनाथ महाराज की जय ।।

दि. २७/०६/२०१९

**श्रीसद्गुरु सेवक,**

गुरुप्रसाद सुरेश कुलकर्णी

# अनुक्रमणिका


| अ.नं. | अभंग क्र. | अभंग | पान नं. |
|---|---|---|---|
| ०१) | – | विषय प्रवेश करण्यापूर्वी | १ |
| ०२) | १ | जन्माचे ते मूळ पाहिले शोधून | ४ |
| ०३) | २ | अहर्निशी सदा परमार्थ करावा | ९ |
| ०४) | ३ | उध्दरीले कुळ आपण तरला | १४ |
| ०५) | ४ | जैसी गंगा वाहे तैसे ज्याचे मन | १७ |
| ०६) | ५ | ज्याची त्याला पदवी येराला न साजे | २२ |
| ०७) | ६ | दोष ते जातील अनंता जन्मीचे | २७ |
| ०८) | ७ | वस्तू ते ओळखा सांडा रे कल्पना | ३१ |
| ०९) | ८ | भूती लीन व्हावे सांगावे न लगेची | ३६ |
| १०) | ९ | मायाजाळ नासे या नामे करोनी | ४१ |
| ११) | १० | गेली त्याची जाणा तोचि | ४७ |
| १२) | ११ | दुजियाला भ्रांती भाविकाला | ५५ |
| १३) | १२ | स्वर्गलोकीहूनी आहे हे अभंग | ६० |
| १४) | १३ | सत्य सत्य जाणा त्रिवाचा | ६६ |
| १५) | १४ | पाच कोटी एक लक्षाचा | ७१ |
| १६) | १५ | वेदाचे अभंग केले श्रुतीपर | ७४ |
| १७) | १६ | सगुण हे ब्रह्म विठ्ठलचि | ७६ |
| १८) | – | श्रीतुकाराममहाराज नित्यपाठावरील आरती (विवरणासह) | ८१ |
| १९) | – | श्रीतुकाराममहाराज नित्यपाठ तात्पर्यार्थ | ८६ ते ९५ |
| २०) | – | श्रीदासराममहाराजकृत श्रीतुकाराममहाराज निर्याण प्रसंग आरती | ९६ |




# ।। श्री तुकाराममहाराज नित्यपाठ ।।

### (बारा अभंग)

## विषय प्रवेश करण्यापूर्वी

हे नित्यपाठ (बारा अभंग) भगवान श्रीसद्गुरू श्रीतुकाराममहाराज यांचे असून श्रीतुकाराममहाराजांचे अवतार भगवान सद्गुरू श्रीनिंबरगीकरमहाराज यांचेपासून या निंबरगी संप्रदायांत म्हणजे हिंचगेरी, चिम्मड संप्रदायात नित्य पठण केले जाते आहेत. हे अभंग अध्यात्मदृष्टीने फारच महत्वाचे असून यातील मौलिक विचार म्हणजे तो एक अध्यात्माचा गाभाच आहे.

मनुष्य आज सुखाकडे चालला आहे, पण सुखमात्र त्याचेकडे येत नाही अशी अवस्था आहे. मनाची तळमळ जर गेली नाही तर सुख हेच दु:खाला कारणीभूत होते. सुख म्हणून जर कवटाळावे तर पदरी दु:खच येते. श्रीसमर्थ म्हणतात,'सुख सुख म्हणता हे दु:ख ठाकोनि आले । भजन सकळ गेले चित्त दुश्चित झाले ।। भ्रमित मन कळेना हीत ते आकळेना । परम कठिण देहो देहबुध्दी गळेना ।।१।।' 'कुठे जाशील भोगा, तर माझ्या पुढे उभा' म्हटल्यापैकी सुख म्हणावे तर दु:खच उभे राहते. याचे कारण चित्त हे व्यग्र असल्याने आपण संपादिलेल्या विषयातून सुखाची निष्पत्तीच होत नाही. कुठल्याही विषयातून सुख घेत असताना आपण जर सूक्ष्म दृष्टीने पाहिले तर त्यावेळी चित्ताची एकाग्रता झालेली असते. म्हणून त्यातून सुखसंवेदना उठते असे आपणास प्रयोगाने दिसून येईल. चित्ताची एकाग्रता म्हणजेच समाधान किंवा सुख असे म्हणता येईल. 'समाधानं किं चितैकाग्रता' असेच श्रीशंकराचार्य म्हणतात तर 'समाधान त्यांची इंद्रिये सकळ । जया तो गोपाळ

ध्यानी मनी ।।' असे श्रीतुकाराममहाराज सांगतात. म्हणजे सुखाचे वर्म खरे कांही वेगळेच आहे हे स्पष्ट होते. श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी याचा खुलासा आपल्या एका अभंगात केला आहे ते म्हणतात –

**जवळी असता जगज्जीवन । का धांडोळीसी वन ।।**

**एकाग्र करी मन । तेणे होईल समाधान ।।**

श्रीभाऊसाहेबमहाराज उमदीकर यांचे नेमावलीपैकी हा अभंग आहे. त्यात त्यांनी एकाग्र मनाने समाधान होईल असेच कथन केले आहे. मुळाला पाजलेले पाणी शेंड्याला येते, पण शेंड्याला मारलेले पाणी मुळाकडे जात नाही.

**म्हणोनी जाणतेनी गुरु भजिजे । तेणेचि कृतकार्य होईजे ।।**

**जैसे मूळ सिंचने सहजे । शाखा पल्लव संतोषती ।।१।। श्रीज्ञानेश्वरी**

या सर्व दृष्टीने चित्त हे दुश्चित्त झाल्याकारणाने सुख म्हणून दु:खच हाती येते हे निष्पन्न झाले. चित्त दुश्चित्त झाल्याने सुख प्राप्त होत नाही. भजन सकळ गेल्याने चित्त हे दुश्चित होते. या विचारे पाहाता भजन हेच खरे महत्वाचे आहे. 'तुका म्हणे गुरुभजनी । देव भेटे जनी वनी ।।' असे भजनाचे महत्व आहे. भजनाने देव भेटतो तर सुख कोठे जाईल असा प्रश्न आहे. श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात 'सर्व सुखाचे आगर । बाप रखुमादेवीवर ।।' गंमत अशी आहे की, या भजनातील जर सकाराची कळ गेली तर चित्त हे ठिकाणावर राहत नाही व मग कोणताही विषय दु:खालाच कारणीभूत होतो. चित्त गडबडले तर मन गडबडलेच. 'मनाच्या तळमळे । चंदनेही अंग पोळे ।।' श्रीतुकाराममहाराज म्हणतात, मनाला तळमळ असेल तर चंदनाची उटी करूनही अंगाची आगच होणार आहे. तालीम गेली आणि आखाडे राहिले व भजन गेले आणि अड्डे राहिले. चित्त हे एकाग्र झाले तरच भजनाला अर्थ आहे आणि भजनाने त्यातील वर्म जर सापडले तर चित्त एकाग्र होते. मन जर भ्रमले तर चित्त हे दुश्चित्त होते



आणि जग हे तर भ्रममूलच आहे. श्रीदासबोधात श्रीसमर्थांनीच आधार दिला आहे, त्यात ते म्हणतात –

**भ्रमेणाऽहं भ्रमेण त्वं भ्रमेणोऽपासको जन: ।।**

**भ्रमेणेश्वर भावश्च भ्रममूलमिदं जगत् ।।**

भ्रमलेल्या मनाला खरे खोटे कळत नाही आणि भ्रमण हा एक सृष्टीचा नियमच असल्याने मन स्थिर होत नाही. हे सारे यथाक्रम पाहू.

मनुष्य अस्वस्थ का ? तर स्वस्थ नाही म्हणून हेच त्याचे उत्तर आहे. अर्थात् या स्थितीत तो आपले हीत तरी काय साधणार आहे ? हा प्रश्नच आहे. तात्पर्य काय, हा देह कठीण तत्त्वांचा असल्याने या जीवाची कठीण असणारी देहबुध्दी जोपर्यंत नाहीशी होत नाही तोवर हे जीवन अस्थिर असल्याने त्याला खरे कळणारही नाही व खरे सुख होणारही नाही, हे तितकेच खरे आहे. कोलीत फिरती ठेवली की सोन्याचे कडे दिसते व ती स्थिर केली की तेथे स्फुल्लिंगाचा साक्षात्कार होतो. खरे ज्ञान, खरे सुख याचे वर्मही कांहीसे असेच आहे. ज्या बैठकीवर मन आहे ती अस्थिर आहे तोवर हे असेच चालणार. 'स्थिरविल्ल संसार नरजन्मदोल बंदु' असेच आमचे श्रीनिंबरगीकरमहाराज यांनी म्हटले आहे. ते म्हणतात संसार म्हणजे एक तिवई आहे आणि तिचा एक पाय लंगडा आहे.

या सर्व दृष्टीने ज्या अर्थी मनुष्य हा वाटेल ते करूनही यावज्जन्म सुखी होत नाही त्या अर्थी त्याचे मूळच काय आहे हा प्रश्न श्रीतुकाराममहाराज यांचे पुढे निर्माण झाला व त्याचा त्यांनी शोध घेतला म्हणून श्रीतुकाराममहाराज पहिल्या अभंगात म्हणतात –

## अभंग १ ला

**जन्माचे ते मूळ पाहिले शोधून । दु:खासी कारण जन्म घ्यावा ।।१।।**
**पापपुण्य करूनी जन्मा येतो प्राणी । नरदेहा येवोनी हानी केली ।।२।।**
**रजतमसत्व आहे ज्याचे अंगी । याच गुणे जगी वाया गेला ।।३।।**
**तम म्हणजे काय नरकचि केवळ । रज तो सबळ मायाजाळ ।।४।।**
**तुका म्हणे ऐका सत्वाचे सामर्थ्य । करवी परमार्थ अहर्निशी ।।५।।**

मौज अशी आहे की जे खरे शोधावयास पाहिजे आहे ते मनुष्य शोधीत नाही व ज्याची फारशी जरूरी नाही त्याच्या शोधातच तो असतो. झाडाचे मूळ व ऋषीचे कूळ शोधू नये असे म्हणतात पण जीव हा त्याचे मागेच हात धुवून लागलेला दिसतो. श्रीतुकाराममहाराज म्हणतात –

**देवाचे ते मूळ शोधू नका कोणी । ऐसी वेदवाणी गर्जीन्नली ।।**

देवाचे मूळ कोणी शोधू नये असे वेदाने गर्जना करून सांगीतले आहे. त्याचीही पाळेमुळे खणून काढणेचा मानवी प्रयत्न असतो. किंबहुना सर्व काही आपणच करीत आहो, निसर्गावर आपण मात केली आहे या भ्रमातच तो असतो. आमचे श्रीमामा म्हणतात –

**कळे ऐसे नाम कोणी न शोधिती । प्रारब्धाची गती शोधिताती।।१।।**
**कळोनिया काय चुकविता नये । ऐसे बळ आहे प्रारब्धाचे ।।२।।**

जे नाम कळणे सारखे आहे किंवा कळवून घ्यावे असे आहे त्याचा शोध तर कोणीच घेत नाही. पण आमचे कुंडलीत पुढे काय आहे ही जिज्ञासा बाळगून त्यामागे जीव धावतात. श्रीनाथमहाराज म्हणतात,

**सर्वही पुसताती जातक । परी रहातक कोणीच पुसेना ।।**

जो उठतो तो जातक विचारतो. पण जे राहणारे आहे त्याकडे कोणी



पहात नाही, हे केवढे आश्चर्य आहे ?

श्रीज्ञानेश्वर महाराज म्हणतात –

**उपजे ते नासे । नासिले पुनरपी दिसे । हे घटिकायंत्र जैसे । परीभ्रमेगा ।।**

या वरून मला काय म्हणावयाचे आहे, याची कल्पना येईल. बरे अगदी आपले प्रारब्ध आपल्याला कळले, पुढे काय ? पुन: ते चुकविता येत नाहीच. मग त्यामागे लागण्यात काय तात्पर्य आहे ? प्रारब्ध हा शब्द प्रारंभ या शब्दापासून बनला आहे. कर्माचा आरंभ जेथे होतो तेथेच अध्यात्माचा गाभा आहे. 'कर्मसु अमृतम्' असे उपनिषदात सांगितले आहे. जेथे दृष्टी ठेवली तर मनुष्य देहातीत होऊन पूर्ण सुखी होईल तेथे दृष्टी न ठेवता पुढे काय होणार आहे या आशेवर मनुष्य झुलत असतो आणि शेवटी जेथे दृष्टी ठेवावयाची ते तत्व न जाणलेने तेथे बोट ठेवतो व प्रारब्धाचा संकेत करतो. यालाच अदृष्ट असे म्हणतात. गुरुकृपेशिवाय तेथे दृष्टी पोचत नाही, म्हणून अदृष्ट म्हणतात. श्रीतुकाराममहाराज म्हणतात –

**पुढे जे होईल जाणे हा विठ्ठल । लोकासी कळेल काय येथे ।।**

केव्हाही राशिभविष्य पहा व त्यात कांही ग्रह अनुकूल असले तर कोणीतरी डोळे वटारलेले असतात व शेवटी 'जपून रहा' हेच सांगितलेले असते. मग आपण जपूनच रहावे. भविष्याचा उपयोग काय ? व्यवहारात 'जप' व परमार्थात 'जप' हेच खरे. या सर्व दृष्टीने श्रीतुकाराममहाराज म्हणतात –

**जन्माचे ते मूळ पाहिले शोधून । दु:खासी कारण जन्म घ्यावा।।१।।**

प्रपंच सुखाचा नाही अगर प्रपंचात सुख नाही हे समजणेत सुख आहे. सुखाची किंमत दु:खामुळेच कळते. शेडींग शिवाय फोटो उठत नाही, उन्हाने त्रस्त झालेल्यालाच सावलीचा आनंद, भुकेलेल्याच अन्नाचे सुख, कष्ट केले तरच विश्रांतीचे महत्व तसेच येथे असल्याने, जन्माचे मूळ कारण जे दु:ख त्याचा शोध घेतला तर तेथेच सुखसागर परमात्मा भेटणार आहे. पण हे जाणून

घेतले पाहिजे. देह बाजूला केला की आत्मा दिसतो. श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात –

'सुखाचा सुखनिधी सुखसागर जोडिला' या दृष्टीने जन्म हा संकेत विचारात घ्यावा असा आहे. कोणी म्हणतात ईश्वराने आमची योजना या काळात काय म्हणून केली ? पण निसर्गाशी मुकाबला करावयास आम्ही गणंगच खरे योग्य आहो, हे आपण जाणिले पाहिजे. 'हरिविण जन्म नरकची पै जाणा' हरिविण जो जन्म हाच नरक असून येथेच विशिष्ठ वर्माने स्वर्ग उभा करावयाचा आहे.श्रीतुकाराममहाराज यांनी केलेल्या शोधाचे महत्व फार मोठे आहे.

म्हणून 'दुःखासी कारण जन्म घ्यावा' असे महाराजानी म्हटले आहे. श्रीशंकराचार्य याच दृष्टीने म्हणतात –

**जन्म दुःखं जरा दुःखं जाया दुःखं पुनः पुनः ।**

**संसार सागरे दुःखं तस्मात् जाग्रहि जाग्रहि ।।१।।**

बरे, हा जो जन्म प्राप्त झाला, हा कसा झाला हा प्रश्न येथे महत्वाचा आहे. श्रीतुकाराममहाराज म्हणतात –

**पापपुण्य करूनी जन्मा येतो प्राणी।नरदेहा येवोनी हानी केली।।२।।**

ज्याला प्राण आहे तो प्राणी, ज्याला मन आहे तो मनुष्य, जीव आहे तो जंतू हेही पाहणेसारखे आहे. मग हा जो प्राणी जन्माला आला तो पाप आणि पुण्यामुळे. ऋण आणि धन तारा एकत्र आल्या की प्रकाश पडतो. तसेच येथे आहे. 'चैतन्याचा विसरू ते हे जग' अशापैकीच हे शरीरही आहे. चैतन्याची विस्मृती म्हणजे देहाची स्मृती व देहाची विस्मृती हीच चैतन्याची स्मृती. 'पर्वताप्रमाणे पातक करणे' आत्मा हा परवत् म्हणजे परक्याप्रमाणे झाला की ते पापच आहे. तृणवत्प्रमाणे हा शब्द आहे. देहाने आत्म्याचा विसर पडतो आणि ईश्वराबद्दलही संशय बळावतो, हेच पाप आहे. श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात –



**यया संशयाहोनी थोर । आणिक पातक नाही घोर ।**

**की जे विनाशाची वागुर । प्राणियासी ।।१।।**

आणि चैतन्य हे पुण्य आहे. 'माते जेणे पाविजे ते शुद्ध पुण्य' परमात्मा ज्याने भेटतो ते शुद्धपुण्य व देहाहंकाराने घडणाऱ्या कर्मात जे पापपुण्य येते ते पुण्यही त्या पंगतीतलेच असते. श्रीज्ञानेश्वर महाराज म्हणतात –

**मजची माजी असता । जेणे मी दुरावे पंडुसूता ।**

**तया पुण्य ऐसे म्हणता । जीभ न झडे कायी ।।**

या पापपुण्याने जन्म प्राप्त होतो. हे काही माणसाचे कर्तृत्व नव्हे. आणि यात जर आत्मसाक्षात्कार झाला नाही तर नरदेहाला येऊनही हानी होते. ही हानी कशी होते हे महाराज तिसऱ्या कडव्यात सांगतात –

**रज तम सत्व आहे ज्याचे अंगी । याच गुणे जगी वाया गेला ।।३।।**

आत्म्याकरिता देह आहे हे कळलेच नाही तर हानी आहे आणि हेच त्रिगुणांचे कार्य आहे. रजोगुण, तमोगुण आणि सत्वगुण या योगानेच जीव या जगात वाया गेला आहे. आपले जे जीवन आहे त्यात जे अधोगामी जीवन आहे त्यातच हे त्रिगुण असल्याने जीव हा साहजिकच बहिर्मुख होतो. किंबहुना यामुळे नेमके भगवद्भजन तेवढे घडत नाही. देह दृश्याशी तादात्म्य असल्याने आत्मसाक्षात्कार नाही, अर्थात आत्मसमाधान नाही अशी अवस्था होते. अधोगामी जीवनात असणारे जे रजःकण, त्यांचे आकर्षण दृश्याकडे असते. यामुळे जीव अंतर्मुख होत नाही. 'संतचरणरज लागता सहज । वासनेचे बीज जळूनी जाय ।।' या श्रीतुकाराममहाराजांचे उक्तीप्रमाणे संतचरणरज स्पर्शाने वासनेचा उपशम होऊन, जीव हा आत काय आहे तेच नेमके पाहू लागतो. तमोगुण हा तर्कच आहे. मागचे आठवत नाही, पुढचे दिसत नाही व आताचे निश्चित नाही. हा जो जीवनात नकळत पसरलेला अंधार, त्याचे नाव तमोगुण. येथे वर्तमान काळातील पाऊल हेही चंद्रावरचेच पाऊल असते. सत्वगुण उत्पन्न

होत नाही व झाला तर तो टिकत नाही. विजेसारखा लख्ख होऊन जातो. त्यामुळे त्याचा उपयोग होत नाही. या सर्व दृष्टीने जीव हा या त्रिगुणाने वाया जातो. ज्यावेळेला 'तुका झाला सांडा' अशी या समाजात श्रीतुकाराममहाराज यांची स्थिती होती, जगाला त्यांचे काहीच महत्व नव्हते, त्याचवेळेला श्रीतुकाराममहाराज हे जगाला याच गुणे जगी जीव वाया चालला आहे हे खडसावून सांगत होते.

शेवटच्या कडव्यात श्रीतुकाराममहाराज सांगतात –

**तुका म्हणे ऐका सत्वाचे सामर्थ्य । करवी परमार्थ अहर्निशी ।।५।।**

ज्या तुकाराममहाराजांनी रज-तम-सत्वाने जीव वाया जातो असे म्हटले आहे, त्यांनीच लगेच या चरणात सत्वगुणाचे सामर्थ्य सांगितले आहे. अशी उलट सुलट विधाने एकाचवेळी महाराजांनी कशी केली, असे येथे वाटण्यासारखे आहे. या ठिकाणी सत्वाचे सामर्थ्य हा जो शब्द आला आहे, तो जीवनाचे अधोगामी प्रवाहात उद्भवणारा सत्वगुण या अर्थाने आला नसून येथे शुद्ध सत्वगुण अभिप्रेत आहे. आणि हा गुण जीवन उर्ध्वगामी झाले म्हणजेच प्रकर्षाला येतो व तो उत्पन्न झाला की मावळला असा असत नाही. यामुळे त्याचे सामर्थ्य विलक्षण असते यालाच चौथा गुण म्हणतात. श्री समर्थ म्हणतात –

**'एक गुण तो ब्रह्माचा । एक गुण तो विष्णूचा ।**

**एक गुण तो रुद्राचा । चौथा गुण तो वेगळा ।**

**अगम्य त्याची लीला।।'**

ब्रह्माचा रजोगुण, विष्णूचा सत्वगुण, रूद्राचा तमोगुण, पण यावर जो चौथा गुण आहे तो शुद्ध सत्वगुण असून त्याची लीला अगम्य आहे. 'त्रिगुण असार निर्गुण हे सार । सारासार विचार हरीपाठ ।।१।। सगुण निर्गुण गुणाचे अगूण । हरीवीण मन व्यर्थ जाय ।।२।।' हा जो श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे



हरीपाठातील अभंग आहे यातील गुणाचे हा शब्द चौथा गुण या अर्थानेच आहे. या गुणाचे ठिकाणी नितांत प्रेम म्हणजेच तो साधनाचा क्रम आहे. श्रीसमर्थ म्हणतात, 'गुणी प्रीती राखे क्रमू साधनाचा' यावरून श्रीतुकाराममहाराजांनी सत्वाचे सामर्थ्य का सांगितले आहे याचा बोध होईल. या गुणाचा प्रकर्ष जर आपले जीवनात झाला तर परमार्थ हा सेकंदावर, मिनिटावर, तासावर, प्रहरावर राहणार नाही. तो अहर्निश होईल. तो अहर्निश होतो म्हणजे काय हेच पुढील अभंगात श्रीतुकाराममहाराज सांगणार आहेत. अहर्निश परमार्थ म्हणजे काय ? हे आपण आता पाहू.

***

## अभंग २ रा

**अहर्निशी सदा परमार्थ करावा । पाय न ठेवावा आडमार्गी ।।१।।**

**आडमार्गी कोणी जन जे जातील । त्यातून काढील तोचि ज्ञानी ।।२।।**

**तोचि ज्ञानी खरा तरी दुजीयासी । वेळोवेळा त्यासी शरण जावे ।।३।।**

**आपण तरेल नव्हे ते नवल । कुळे उद्धरील सर्वांची तो ।।४।।**

**शरण गेलीया काय होते फळ । तुका म्हणे कुळ उद्धरिले ।।५।।**

श्रीतुकाराममहाराज यांचा परमार्थ हा तासावर, मिनिटावर, सेकंदावर विभागलेला नव्हता तर तो अहर्निश म्हणजे सदाच होता. त्यांचे परमार्थाला चकाकी व लकाकी नव्हती. 'केळीवर नारळी, घर चंद्रमौळी' अशा थाटाचे त्यांचे घर, तरी चित्तावर सदा समाधान व चेहरा नेहमी प्रसन्न अशी त्यांची अवस्था होती. श्रीतुकाराममहाराज म्हणतात –

**हेची देवाचे भजन । सदा राहे समाधान ।**

जे स्वत: त्यांनी केले तेच येथे सांगितले आहे. हातात दगडाचे टाळ व सदा 'विठ्ठल विठ्ठल' म्हणावयाचे असा त्यांचा परमार्थ होता. भगवान श्रीसद्गुरु

श्रीनिंबरगीकरमहाराज यांचे अखंड साधन तर हे ज्याचे अवतार असे श्रीतुकाराममहाराज त्यांचे अखंड कीर्तन होते.

**आयुष्याच्या या साधने । सच्चिदानंद पदवी घेणे ।**

अशी त्यांची स्थिती होती. आयुष्यभर साधन करणे हे वेगळे व आयुष्यच साधनीभूत करणे हे वेगळे. मरेपर्यंत जगणे वेगळे व जीवन जगणे हे वेगळे, खाण्याकरिता जगणे व जगण्याकरिता खाणे यात फारच अंतर आहे. जे परमार्थात जीवाला प्राप्त होते ते या वैचित्र्यपूर्ण जगातही व्यवहारात मनुष्य मिळवू शकत नाही. उलटपक्षी व्यवहारात जे वैचित्र्य आहे त्यातील काहीही आपणास परमार्थात उपलब्ध होणार नाही हे पक्के लक्षात ठेवण्यासारखे आहे. हा आग्रह कोणी धरूच नये. असणे आणि होणे यात फरक आहे. हे सारे जग बनत बनत बनले आहे. हे काही असे एकदम बनलेले नाही. होत होत सारे झाले आहे. ज्या असणेपणामुळे हे काहीतरी होतच काही झाले आहे हे काहीतरी झालेले व त्यात जे असणेपण सर्वत्र मुळात आहे की ज्या योगाने हे काही झाले आहे तेथे असणेपणाची प्रचीती येते, ते असणेपण फारच वेगळे आहे. त्यात कधी फरकच होत नाही. होण्या होण्यात मात्र फरक होतो. कोणी पी.एच.डी. होईल तर कोणी निरक्षरही राहील. पण ज्या असणेपणामुळे हे दोन्हीही घडले ते मात्र दोन्ही ठिकाणी एकच आहे. तात्पर्य काय ? जे परमार्थात आहे ते व्यवहारात नाही व जे व्यवहारात आहे ते परमार्थात नाही. परमार्थ नव्हे तो व्यवहार व व्यवहार नव्हे तो परमार्थ. दोन्हीची गफलत करून चालणार नाही. प्राणाचे अधिष्ठानाने शरीराचा होणारा व्यवहार व प्राणाचे योगाने प्राणाचाच घडणारा व्यवहार यात जमीन अस्मानाचे अंतर आहे. प्राण हा नादरूप आहे. नामानुसंधान म्हणजेच नादानुसंधान. श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात –

**'नासिकेचा प्राण कोण मार्गी येत । नाद दुमदुमत अनुहाती ।।'**



या प्राणाचे कार्य हे अहर्नीश आहे. मग तो प्राणी कोणत्याही रूपात, अवस्थेत अगर स्थितीत असो, त्याला सतत जाणून त्याचा संपर्क जर साधता आला तर त्यात, जगात न मिळणारे समाधान जीवाला प्राप्त होते. यालाच परम-अर्थ म्हणजे श्रेष्ठतत्व किंवा परमार्थ म्हणतात. श्रीसमर्थ म्हणतात –

**'आता स्तवू हा परमार्थ । जो साधकाचा निज स्वार्थ ।।**

**ना तरी समार्थामध्ये समर्थ । योग हा ।।'**

आता स्तवू हा परमार्थ म्हणजे आपण समजतो तो नव्हे. तो परमात्माच हा जीव आहे याचे ज्ञान होणे हा परमार्थ आहे. श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात – 'तो हा विठ्ठल बरवा' हा साधकांचा निजस्वार्थ आहे. देहाचा नव्हे. 'निजाचे तेज की तेजाचे निज' असे श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात. जे निजत्व आहे म्हणून चेहऱ्यावर काही रया आहे, त्यामुळे शरीरावर काही तेज आहे व ते तेज ज्या तेजामुळे आहे, हे समजून घेणे अगत्याचे आहे. श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात –

**'इडा पिंगलेचा ओघ सैरा दिसे । त्यावर प्रकाशे आत्मतेज ।।'**

इडा पिंगलेच्या ओघावर ते आत्मतेज विलसते आहे, त्यामुळेच शरीरावर काही तेज आहे. हे तेज ज्या निजत्वामुळे आहे त्याचा जो स्वार्थ आहे, त्याला योग म्हणता येईल की जो खरा समर्थानी सांगितला आहे. जो समर्थाना अभिप्रेत असा समर्थ योग आहे तेथे वियोग हा उरणारच नाही. असा परमार्थ हा साहजिकच अहर्नीश आहे. म्हणून श्रीतुकाराममहाराज या अभंगात सांगतात – 'अहर्निश सदा परमार्थ करावा.'

अहर्निश परमार्थ म्हणणेचे कारण भगवंताचे जे नाम ध्वनीयुक्त आहे ते अहर्निश आहे. 'तुका म्हणे नाम । चैतन्य निजधाम ।।' हा चरण येथे ध्यानात ठेवणे सारखा आहे. 'अहर्निश नाम गाईन मी वाचे । बीज कल्पांतीचे तुका म्हणे।।' येथे विठोबाचे नाम, केशवाचे नाम, किंवा राघवाचे नाम असे न म्हणता श्रीतुकाराममहाराज 'अहर्निश नाम' असा शब्द वापरत आहेत.

सूर्यचंद्रवाचक गतीमध्ये सतत असणारे नाम असे येथे सूचित करावयाचे आहे. मग जे नाम अहर्निश, ते आम्ही केव्हा केव्हा घेत असतो हे म्हणण्याला काय अर्थ आहे ? आम्ही केव्हा जगतो आणि केव्हा मरतो असे म्हटल्यापैकीच ते होईल. म्हणून श्रीतुकाराममहाराज म्हणतात, 'अहर्निश सदा परमार्थ करावा' अहर्निश नाम हे कल्पांतांचे बीज आहे. म्हणजे या नामाचे स्वरूप तरी काय असेल ? श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात –

**'कल्प ते कल्पना वासना निमाली । वृत्ती पै बैसली पद्मासनी ।।'**

यादृष्टीने कल्पनेचा अंत म्हणजेच कल्पांत व त्याचे बीज जे नाम ते अहर्निश असलेने अहर्निश संपर्काने त्याचे अनुसंधान सतत ठेवणे हा जो परमार्थ आहे हाच करावा असे येथे महाराजांनी सांगितले आहे. आणि असे साधण्यासाठी 'पाय न ठेवावा आडमार्गी' असे पुढे म्हटले आहे. कल्पनेचे आतील नामाशी तद्रूप झालेला जीव हा आडमार्गी जातच नाही. किंबहुना आडमार्गी पाऊल न ठेवणे हाच अहर्निश परमार्थ आहे. कल्पनेचा निरास झाला तरच हा परमार्थ साधतो व कल्पना हा तर मनाचा धर्मच आहे. मनाचे मनत्वच जर या चैतन्याशी तद्रूप झाल्याने नाहीसे झाले तर मग आडमार्ग हा उरलाच नाही. याला उत्तम मार्ग म्हणजे 'नमन' होणे हा आहे. 'एका जनार्दनी नमन । मन केले त्या आधीन' हे श्रीएकनाथमहाराज यांचे विधान किंवा 'आता कोठे धाव मन । तुमचे चरण देखिलिया' हे श्रीतुकाराममहाराज यांचे विधान येथे चिंतनीय आहे. मनाचे मनत्वच नाहीसे होणे म्हणजेच नमन. श्रीज्ञानेश्वरमहाराज आपल्या 'नमन' स्तोत्रात म्हणतात –

**'नमन हेचि तारक । नमन हाचि विवेक ।**
**नमनेवीण त्रिलोक । आडमार्गी रिघताती ।।'**

नमन हे तारक असून विचारांचे पैल होणे हाच खरा विवेक आहे. हे जर साधले नाही तर मग आडमार्ग म्हणजे परमार्थाला आड जाणारा मार्ग सुरू



झालाच म्हणून समजावे. याप्रकारे आडमार्गात पाऊल न ठेवणे हाच अहर्निश परमार्थ आहे.

या आडमार्गात जे कोणी जाणारे आहेत, त्यांना बाजूला काढून परमार्थप्रवण करणारे महात्मेच खरे ज्ञानी आहेत.

दुजेपणामध्ये जे कोणी आले त्यांची भ्रांती घालवून त्यांना स्थिरपणाने खरे ज्ञान देणारेच ज्ञानी असून त्यांना शरण जावे असे या अभंगात श्रीतुकाराममहाराज यांनी सांगितले आहे. 'दुजियाला भ्रांती ।' हे तर महाराजांचेच वचन आहे. भ्रांतीचे लक्षण, 'तुका म्हणे ऐसी भ्रांती । देव असता नाही म्हणती ।' असे आहे. भ्रांतीचा निरास हेच ज्ञान. हे ज्यांचे कृपेने होते त्यांचे पाय धरावे त्यात आपले कल्याण आहे.

असा महात्मा आपण तरेल यात काय नवल आहे. तो तर सर्वांचेच कुळाचा उद्धार करतो. याना शरण गेले तर कुळाचा उद्धार होतो असे श्रीतुकाराममहाराज यांनी या अभंगात शेवटच्या कडव्यात सांगितले आहे. असा महात्माच जगात खरी धन्यता प्राप्त करून घेतो. ते कसे ? हेच श्रीतुकाराममहाराज यांनी पुढील अभंगात असे सांगितले आहे.

***

## अभंग ३ रा

**उद्धरीले कुळ आपण तरला । तोचि धन्य झाला त्रैलोक्यात ।।१।।**
**त्रैलोक्यात भला अद्वैती निमाला । योग जो साधिला साधन बरवे।।२।।**
**बरवे साधन सुख शांत मन । क्रोध नाही जण तिळभरी ।।३।।**
**तिळभरी दोष नाही चित्त ते निर्मळ । तुका म्हणे जळ गंगेचे ते ।।४।।**

ज्याने आपल्या कुळाचा उद्धार केला तो, आपण निश्चित तरला हे काय सांगावयास पाहिजे ? आणि असा जो महात्मा तोच खरा या त्रैलोक्यात धन्य झाला. हे पहाणेसारखे आहे. ज्याने अनेकांचा उद्धार केला त्यालाच परमात्मा भेटला इथे प्रश्न नाही. श्रीतुकाराममहाराज म्हणतात, 'करोनीया उद्धार तुमचा। भेटे वैकुंठीचा मोक्षदानी ।।' जगाचा उद्धार करण्याचे सामर्थ्य जेथे आहे तेथे बाकीचे काय? अशा महात्म्याचे भांडवलच फार मोठे, म्हणूनच ते सर्व कांही निराळेच आहे. 'आला जगदोद्धार । त्याचे अनंत भांडार ।।' असे श्रीतुकाराममहाराज म्हणतात. श्रीज्ञानेश्वरमहाराज, श्रीतुकाराममहाराज, आमचे श्रीनिंबरगीकरमहाराज, हेच अशी प्रचिती देऊ शकतात. आमचे चिमडचेमहाराज श्रीनिंबरगीकरमहाराज यांना उद्देशून म्हणतात – 'जगदोद्धारासाठी अवतार धरसी । अगाध महिमा परी तो गुप्तचि रक्षिसी ।। जाणूनि शरण येती त्या पावन करिसी ।। निजरूप दावूनि तया सुखरूप करिसी।। जयदेव जयदेव जय सद्गुरूराया । आरती ओवळू महाराजया ।।धृ.।।' जगाच्या उद्धारासाठीच ज्यांचा अवतार असून, येवढी शक्ती ज्यांची पण तीही ज्यांनी गुप्तपणेच राखली, तेथे ते परपार झाले तर काय नवल ? आपल्या कुळाचा उद्धार करणे व इतरांचे कुळाचा उद्धार करणे यात कांही समजून घेता येईल. पण जगाचा उद्धार कसा काय होतो ? हा प्रश्न आहे. श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात, – 'तो जेऊती वास पाहे । तेउती सुखाची सृष्टी होये ।। तो म्हणे तेथ राहे । महाबोधु ।।' त्या महात्म्याची दृष्टी जिकडे जाईल ते सर्व जीव व ते ज्या अवस्थेत असतील त्यातून उत्क्रांत होतात. त्या त्या मानाने त्यांना सुखाचा मार्ग सापडतो आणि तो महात्मा जिथे मनात आणिल तेथे महाबोध स्थिर होतो. मग स्वत:चे कुळ उद्धरले तर त्यात आश्चर्य कसले ? कुळाला तिलांजली देऊन ज्यांचा ब्रह्मभाव जागृत झाला तेथेच कुळाचा उद्धार होतो. 'नको सोडू देठीच्या मुळा । सोड अंजुळी आपुल्या कुळा ।।' असे जे श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात ते या दृष्टीने म्हणतात. सर्व पहाणे संपले म्हणजे आत्म निरीक्षण होते. सर्व बोलणे संपले तरच नामस्मरण चालू राहते. सर्व करणे संपले म्हणजेच परमार्थाची क्रिया सुरू होते. जेव्हा आपले जीवन हे आत्मनिरिक्षण करता करता उर्ध्वगामी होते तेव्हा या शरीराची माती वर उचलली जाते. हाच खरा कुळाचा उद्धार आहे. 'औटपीठ त्रिकुट घाट दावी अर्धचंद्र ।। मातीस माती मिळूनी गेली कैचे ब्रह्मरंध ।' हे या दृष्टीनेच श्रीगहिनीनाथांनी म्हटले आहे, 'माती अससी मातीत मिळसी' हे श्री.राम जोशींनी स्पष्ट केले आहे. श्रीकबीर महाराज म्हणतात, 'इस तन धनकी कोन बढाई । देखत नयनोमें मट्टी मिलाई।।' ज्या अणू रेणू पासून आकाश झाले, ज्या पोकळीत आत्मसाक्षात्कार होतो, त्यात जे आहे ते या जगात कोठेच मिळणार नाही. या शरीराची माती जर त्यात मिसळली तर तोच कुळाचा उद्धार आहे. उत् = वर व धृ =धारण करणे यापासून हा उद्धार शब्द बनला आहे. शरीरालाच कुळ असे संतांनी म्हटले आहे. पंचतत्त्वेच जर आत्मतत्त्वात विलीन झाली तर तो जीव परपार झाला हे सूर्यप्रकाशाइतके स्पष्ट आहे. म्हणून श्रीतुकाराममहाराज म्हणतात 'उद्धरीले कुळ आपण तरला । तोचि धन्य झाला त्रैलोक्यात ।।' श्रीतुकाराममहाराज म्हणतात 'धन्य तो एक संसारी । रामनाम जो उच्चारी।।' यावरून मला येथे काय म्हणावयाचे आहे ते स्पष्ट होईल असे वाटते.



अभंगाच्या दुसऱ्या कडव्यात श्रीतुकाराम महाराज सांगतात, ''त्रैलोक्यात भला अद्वैती निमाला । योग जो साधिला साधन बरवे ।।'' ज्या आत्म्यानें आपल्या आत्मत्त्वानेच आत्मानुभूति घेणेचा योग साधला, या

आत्मयोग साधनाने अद्वैतातच जो बुडून गेला, तो भला पुरूष या त्रैलोक्यात धन्य आहे. आत्मा-देह यांचा जो संबंध आहे तसाच परमार्थासाठी प्रपंच आहे. आत्म्यासाठी देह आहे तसाच परमार्थासाठी प्रपंच आहे. या दोन्ही गोष्टी समन्वयाने ज्याला साधता आल्या तोच भला असे, आपणास विचारांती दिसून येईल. एक सत्पुरूष म्हणतात, 'प्रपंच साधुनि परमार्थाचा लाहो केला ।। तो नर भला ।।' येथे परमार्थाबरोबरच प्रपंच हाही एक आत्मविलासच आहे. 'निश्चलाचे अंगावरी । उठती चंचलाच्या लहरी ।।' या संतोक्तीप्रमाणे ही अवस्था आहे. पण मौज ही आहे, की निश्चलाच्या अंगावर चंचलाच्या लहरी उठल्या तरी निश्चल ते निश्चलच रहाते. निश्चल ब्रह्म चंचल माया, निश्चल आत्मा चंचल देह, निश्चल परमार्थ चंचल प्रपंच, हे आपण जाणले पाहिजे. श्रीतुकाराममहाराज म्हणतात - 'न करी रे संग । राही रे निश्चल ।। लागो नेदी मळ अहंतेचा ।।१।। या नाव अद्वैत खरे ब्रह्मज्ञान । अनुभवावाचून बडबड ते।।२।।' संग न करणे हीच निश्चलता. अहंकाराचा मळ नाही तो निर्मळच आहे. हेच अद्वैत असून या अनुभवाशिवाय राहिली ती बडबडच आहे. हे योग साधन कसे, तर महाराज सांगतात - 'बरवे साधन सुख शांत मन । क्रोध नाही जाण तिळभरी ।।' मन सुखी शांत राहून तिळाएवढाही राग जर कोठे आला नाही तर तेच खरे योगसाधन आहे. हा आत्मयोगच आहे, तेथे रागावणेचा प्रश्नच येत नाही. श्रीमुक्ताबाई म्हणतात : 'जीभ दातानी चावली । कोणी बत्तिशी पाडली ।।१।।' यावरूनही हा साधन योग स्पष्ट होईल. साधनयोग व आत्मयोगसाधन हे दोन्ही शब्द एकवाचीच आहेत, हे येथे महत्वाचे आहे.

**तिळभरी दोष नाही चित्त हे निर्मळ ।। तुका म्हणे जळ गंगेचे ते ।।**

तिळाएवढाही जेथे राग नाही ते चित्त अहंकाररहित, मळरहित अर्थात् निर्मळ आहे. नव्हे नव्हे श्रीतुकाराममहाराज म्हणतात, ते गंगाजळच आहे. यावरून असे दिसून येईल, जे आहे ते निश्चल आहे, जे निश्चल आहे ते निर्मळ आहे आणि तेच खरे निर्गुणरूप असून साधकाने शोधून पहावयाचे आहे. ही



अवस्था गुरूकृपेने संपादन करणे हेच आपले खरे काम आहे. श्रीचिमडचेमहाराज म्हणतात - 'एक आहे बाबा तेथे द्वैत कांही नाही ।। अद्वैताचे सुख ते निश्चल निर्गुण शोधुनि पाही ।।' अर्थात या प्रकारे हे मन गंगाजळासारखे होते म्हणजे काय तेच आता पुढील अभंगात आहे.

***

## अभंग ४

**जैसी गंगा वाहे तैसे ज्याचे मन । भगवंत जाण तया जवळी ।।१।।**
**तयाजवळी देव भक्ती भावे उभा । स्वानंदाचा गाभा तया दिसे।।२।।**
**तया दिसे रूप अंगुष्ठ प्रमाण । अनुभवी खूण जाणती ते ।।३।।**
**जाणती ते खूण स्वात्मानुभवी । तुका म्हणे पदवी ज्याची त्याला।।४।।**

आपले मन हे गंगेसारखे शुद्ध, पवित्र आणि स्वच्छ झाले पाहिजे. असे झाले तर त्याचेजवळच भगवंताचे वास्तव्य असते. मनाचे किंवा चित्ताचे शुद्धीने अपवित्र देह देखील शुद्ध होतो, असे त्यांचे सामर्थ्य आहे. 'सर्वांग निर्मळ । चित्त जैसे गंगाजळ' असे श्रीतुकाराममहाराजांनी या दृष्टीनेच म्हटले आहे. चित्त निर्मळ असेल तर सर्व अंगही तसेच होते. चित्तशुद्ध नसेल तर सद्गुरुंचे बोधाचा काही उपयोगच होत नाही. पाणी स्वच्छ नसेल तर तेथे साबण काय करणार ? व मग कपडा तरी स्वच्छ कसा होणार ? श्रीतुकाराममहाराज म्हणतात - 'नाही निर्मळ जीवन । काय करील साबण।।१।। तैसे चित्त शुद्ध नाही । तरी बोध करील काई ।।२।।' पाणी स्वच्छ असेल की साबणाने कपडा स्वच्छ होतो. त्याप्रमाणे चित्त शुद्ध असेल तर गुरुबोधाने देह हाही पवित्र होतो. 'देह देवाचे देऊळ । आत बाहेरी निर्मळ ।।' आतबाहेर निर्मळ असणारा देहच देवाचे देऊळ आहे. महाकारण देह हा अंतर्बाह्य शुद्ध असलेने तेथे देवाचा साक्षात्कार होत असतो. या अनुभूतीने

पवित्र असा स्थूल देहही पवित्र होतो. अशा महात्म्याला पाहिले तरी देवाला पाहिल्याचे समाधान होते. ज्या देवाला संतांनी पाहिले अशा संतांना पाहणेचे भाग्य जरी आपल्याला लाभले तरी देवत्वाची प्रचीती तेथेच येत असते. 'तैसे हारपले आपण पे पावे । जे संताते पाहता गिवसावे । म्हणोनि वानावे ऐकावे । तेचि सदा ।।' असे जे श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी म्हटले आहे त्याचे हेच मर्म आहे. 'गंगाजळ ह्रदय करा । ताटी उघडा ज्ञानेश्वरा ।।' असे श्रीमुक्ताबाईनी श्रीज्ञानेश्वरांना म्हटले आहे. त्या वचनात हा विषय स्पष्ट होत आहे. श्रीतुकाराममहाराज या अभंगाचे पहिल्या कडव्यात या करताच सांगत आहेत. 'जैसी गंगा वाहे तैसे ज्याचे मन' येथे असा प्रश्न निर्माण होतो की जशी गंगा वाहते तसेच ज्याचे मन आहे याचा नेमका अर्थ काय ? श्रीतुकाराममहाराज यांना येथे काय म्हणावयाचे आहे ? याचा बोध होणे जरूरीचे आहे. गंगा तर प्रत्यक्ष चर्मचक्षुंना दिसणारी आहे आणि मन जरी प्रत्ययकारी असले तरी ते अदृष्य आहे, या दोन्हीचा मेळ कसा घालावयाचा ? हाच खरा प्रश्न आहे. हे काय काव्य आहे ? का यात खरोखरीच या दोन्हीचा मेळ व्हावा असा काही तात्विक भाग आहे का ? हेच पहाणे जरूरीचे आहे. श्रीतुकाराममहाराज म्हणतात – 'षडचक्रावरी । त्रिकुटाभीतरी ।। त्रिवेणी सुंदरी गंगा वाहे ।।१।। तेथे नित्य स्नान करिताती संत ।। रजतम द्वैत संहारोनी ।।२।।' गंगेप्रमाणे आपले मन तसेच प्रवाही होणे अगत्याचे आहे. ती गंगा आपले शरीरातच आहे आणि ती ही अदृश्य आहे. यामुळे गंगेचा व मनाचा येथे मेळच आहे. या त्रिवेणी संगमी अनहत रात्रंदिवस होत असून, मनाचा जर जेथे लय झाला तर गंगेसारखे मन आपोआपच होते. श्रीतुकाराममहाराज म्हणतात, 'त्रिवेणी संगमी अनहतध्वनी।। आहे निशीदिनी वाद्य गजरे ।।१।।' श्रीमुक्ताबाईनी असेच म्हटले आहे, 'त्रिवेणीचा ओघ तेथे अंग धुतले । अनहत झणझणाट नाद ऐकिले ।।' यावरून हाच विषय स्पष्ट होत आहे. इडा, पिंगला आणि सुषुम्ना यांचा पवित्र संगम म्हणजे त्रिवेणी. श्रीचिमडचेमहाराज म्हणतात – 'इडा पिंगला सुषुम्ना मार्ग आहे कठीण । त्रिकुट संगम मार्जन महालिंग दर्शन।' मनपवनाचा ओघ



जेथे स्थिर होतो त्यालाच त्रिकूट म्हणतात. 'त्रिकुटी स्थीरावला मन पवन वारु ।।' असे श्रीमुकुन्दराजांनी यासंबंधी म्हटले आहे. म्हणून या अदृश्य गंगेबरोबरच जर अदृश्य मन हे प्रवाही झाले तर येथे प्रगट आत्मसाक्षात्कार होत असतो. हाच येथे अत्यंत महत्वाचा भाग आहे. विजेच्या ऋण आणि धन या ज्या शक्ती त्या अदृश्यच असतात. पण त्या दोन्ही तारातून वाहणारा विजेचा प्रवाह एकत्रित आला की तेथे प्रकाश होतो व त्यात आपणास सर्व पदार्थांचे ज्ञान होते. तसे येथे कांही घडत असते. बाहेर गंगा यमुना प्रगट पण सरस्वती गुप्त असते.

'इडा पिंगलेचा ओघ सैरा दिसे । त्यावरी प्रकाशे आत्मतेज ।।१।।' या श्रीज्ञानेश्वरांचे चरणात मला जे कांही म्हणावयाचे आहे ते स्पष्ट होत आहे. आत्मप्रकाश हेच भगवंतांचे स्वरूप आहे. साधकाला सारखा आत्मप्रकाश दिसावा व मगच दृश्य हे दृश्यमान व्हावे असे आमचे श्रीनिंबरगीचेमहाराज म्हणत असत. भगवंतांचे दर्शन ते हेच. हा आत्मप्रकाश अशा महात्म्याजवळ सततच असतो आणि म्हणूनच 'भगवंत जाण तयाजवळी' असे श्रीतुकाराममहाराज यांनी येथे म्हटले आहे.

अभंगाच्या दुसऱ्या कडव्यात श्रीतुकाराममहाराज म्हणतात, 'तयाजवळी देव भक्ती भावे उभा । स्वानंदाचा गाभा तया दिसे ।।' गंगेसारखे मन प्रवाही झाले, ते कोठेच उपाधीला चिकटून बसले नाही, तरच ही अनुभूती येते. पाणी अडले की त्यात किडा झालाच, ते अशुद्ध बनलेच म्हणून समजावे. पण ते प्रवाही असले तर ते पाणी बिघडूच शकत नाही. असे ज्या जीवाचे जीवन आहे तेथे देवच त्याचेजवळ भक्तीभावाने उभा राहतो. काय साधना असेल ही ? सामान्य माणूसदेखील आपले जवळ येणेची पंचाईत, मग उभे रहाणे तर दूरच. पण येथे अनंत ब्रह्मांडाचा आधीश परमात्मा मोठ्या प्रेमाने आपले भक्ताजवळ भक्तीभावे उभा रहातो. केवढे आश्चर्य आहे. 'कोठेही चित्तासी नसावे बंधन । ह्रदयी नारायण साठवावा ।' हे जे श्रीतुकाराम

महाराजांनी म्हटले आहे ते मोठे विचारात घेणेसारखे आहे. यात 'कोठेहि' हा शब्द फार महत्वाचा आहे. 'आत्मनिवेदन भरीत रोडगा जिव्हे हारोहारी । एका जनार्दनी धन्य खंडेराव त्यावरी कुंचा वारी ।।' असे जे श्रीएकनाथमहाराज यांनी आपले एका अभंगात म्हटले आहे, त्याचाही आशय हाच आहे. आत्मनिवेदन भक्ती जर साधली तर खंडेराव आपल्या भक्तावर कुंचा वारतो. त्या भक्ताची योग्यता कोणत्या शब्दात सांगता येईल व ज्या भक्तीने तो जीव असा देवाचा भक्त झाला, त्या भक्तीचे विवेचन पुरे होईल काय असा प्रश्न आहे ? आणि मौज अशी, आत्मप्रकाशच सारखा दृष्टीसमोर राहिलेने 'स्व'चा जो काही आनंद आहे, त्याचा गाभाच तेथे प्रगट होतो. या आनंदाला खरी सीमाच नाही. आनंदाची जाणीव आनंदानेच होते. आनंदानेच आनंद होतो. विषय तर नाही आणि आनंद तर होतो आहे हा आनंदच वेगळा. नाहीतर सारा आनंदच आहे झालं ! असे माणसे म्हणतातच. तात्पर्य काय ? हा आनंद वेगळा. 'आनंदाचे डोही आनंद तरंग । आनंदची अंग आनंदाचे ।।१।।' अशीच ती श्रीतुकारामांचे उक्तीप्रमाणे अवस्था आहे.

यापुढे श्रीतुकाराममहाराज या रूपाची प्रचिती कशी येते ते सांगत आहेत. ते म्हणतात, 'तया दिसे रूप अंगुष्ठ प्रमाण । अनुभवी खूण जाणती ते।।३।।' 'अंगुष्ठमात्र पुरुष:' असे श्रुती वचनच आहे. आपले सहस्रदलस्थानात म्हणजे मेंदूत एक पोकळी आहे व ती ज्याचे त्याचे अंगठ्याएवढीच आहे. त्यात जे काही आहे, ते जगात नाही व जगात जे आहे, ते त्यात नाही. आकाशातच आत्मानुभव येतो. कारण आत्म्यापासूनच हे आकाश झालेले आहे. याला 'मुर्ध्नी आकाश' किंवा चिदाकाश असे म्हणतात. यातच स्वरूपाची अनुभूती येते. 'आत्मन: आकाश: संभूत:' हे श्रुतीवचन तर येथे स्पष्टच आहे. या आकाशासरिसाच तो येणारा अनुभव आहे की जेथे पहाणारा हा वेगळेपणाने मग शिल्लकच रहात नाही. श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात, 'स्वरूपाचा पूर गगना सरिसा आला । देखणा बुडाला देखाताची ।।१।। चैतन्याचा लोट धावे एकसरा । प्रलयीच्या नीरा सारिखेची ।।२।। ना तरी



मोतीये विखुरली अंबरी । दिसती परी करी येतीच ना।।३।। गुरुकृपे खूण ओळखोनी घ्यावी । देहीच पावावी मुक्त दशा ।।४।। ज्ञानदेव म्हणे निवृत्ती दातारे । चोजविले सारे माझे मज ।।५।।' या अभंगात सर्व काही आले आहे. या अंगुष्ठमय आकाशात प्रलयकाळाचे जलाप्रमाणे चैतन्याचे लोट आकाशाचे माध्यमातून येत असतात. डोळ्याला साक्षात्कार होतो पण तो हाताला येत नाही. देहीच विदेही होवून साधक गुरुकृपेने मुक्त होतो. अशा प्रकारची अनुभूती श्रीनिवृत्तीनाथानी श्रीज्ञानेश्वरमहाराज यांना दिली. 'आम' म्हणजे प्राण 'गु' म्हणजे गुप्तरूपाने 'स्थ' म्हणजे स्थित आहे, म्हणून हे रूप अंगुष्ठ प्रमाण आहे असे आपणास दिसून येईल.

ही खूण जाणणारा स्वात्मानुभवी असून ही पदवी ज्याची त्यालाच शोभून दिसते. येथे गबाळ्याचे कामच नाही म्हणून श्रीतुकाराममहाराज हे शेवटल्या कडव्यात सांगतात, 'जाणती ते खूण स्वात्मानुभवी । तुका म्हणे पदवी ज्याची त्याला ।।४।।' ही खूण स्वात्मानुभवी आपल्या अनुभवानेच जाणतात. 'ज्ञानदेव म्हणे अनुभवी जाणे । अनुभवावाचूनी काहीच नेणे ।।' अनुभव असेल तरच हे तत्व जाणता येते. अनुभव नाही तेथे काहीच नाही अशी अवस्था आहे. ही खूण जर प्राप्त झाली तरच संतांना आनंद होतो. म्हणून श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात, 'ज्ञानदेव म्हणे अनुभवी जाणे । संत ये खुणे पारूषले ।।१।।' अर्थात् ही खूण पिंडातील षट्चक्रे उल्लंघन करून जर साधक ऊर्ध्वगामी झाला तरच प्राप्त होते. यासाठी श्रीमुकुंदराज म्हणतात, 'ही खूण अनुभवाची पिंडी परतुनी पाहे ।' अर्थात येथे नुसता प्रकाश आहे व तो पहात असताना त्यातच एक मोठा आनंद आहे म्हणून 'आपेआप प्रकाशले तेणे आनंदे राहे ।' गुरूकृपा असेल तरच हे सारे घडते. ज्यांना गुरूकृपा नाही ते हे ऐकूनही चकित होतात. त्यांना याचा काहीच बोध होत नाही. 'हे खूण गुरु जाणे । येरा टकमक वाणे ।।' अशीच त्यांची स्थिती होते. ही अवस्था ज्यानी भोगली ती पदवीच आगळी. ती इतरांना प्राप्त होत नाही हेच पुढील अभंगात सांगतात.

***

## अभंग ५ वा

**ज्याची त्याला पदवी इतरा न साजे । संताला उमजे आत्मसुख ।।१।।**
**आत्मसुख घ्यारे उघडा ज्ञानदृष्टी । वाऊगी चाऊटी नका करू ।।२।।**
**नका करू काही संतसंग धरा । पूर्वीचा हा दोरा उगवेल ।।३।।**
**उगवेल प्रारब्ध संतसंगे करुनी । प्रत्यक्ष पुराणी वर्णीयेले ।।४।।**
**वर्णीयेली किर्ती नामरूप घोष । जातील ते दोष तुका म्हणे ।।५।।**

ज्याची पदवी त्यालाच शोभून दिसते. इतरांना ती शोभत नाही. 'जेनो काम तेनो ठाय । बीजा करेसो गोता खाय ।।'असे जे म्हणतात, ते काही खोटे नाही. डोळ्याचे काम कान करत नाही. कानाचे काम तोंड करत नाही, असेच ते आहे. आपल्या हाताची बोटे सारखी आहेत काय ? नाही. अर्थात ज्याचे जे महत्त्व ते त्यालाच दिले पाहिजे, हे निश्चित आहे. आत्म्याचे काम शरीर करत नाही व शरीराचे काम आत्मा करीत नाही. ज्या आत्म्याच्या योगाने शरीराची जाणीव जीवाला होते, पण ज्या शरीराच्या जाणीवेने आत्म्याची जाणीव मात्र जीवाला रहात नाही, तेथे एकाची पदवी एकाला शोभेलच कशी ? असा प्रश्न आहे. जे संत महात्मे आत्मरूपी स्थिर होऊन आत्मसुखाने सुखरूप झाले, ज्यामुळे त्यांचे जीवन खऱ्या अर्थाने सुखी झाले, त्यांची बरोबरी कोण करू शकेल ? श्रीतुकाराममहाराज म्हणतात, 'समाधान त्यांची इंद्रिये सकळ । जया तो गोपाळ ध्यानी मनी ।।' ज्याच्या ध्यानी मनी एक गोपाळ आहे, त्यांची इंद्रिये ही वखवखलेली असणारी, पण सुखी झाली. मुळाला पाणी दिले तर ते शेंड्यापर्यंत येते हेच खरे. 'राम म्हणता रामचि होईजे । पदी बैसोनी पदवी घेईजे।।१।।' या श्रीतुकाराममहाराजांच्या उक्तीप्रमाणे राम म्हणता म्हणता ते रामच झाले व त्या पदावर आरूढ होऊन, ज्यानी ही परमार्थातील परमोच्च पदवी संपादन केली, त्याचे वर्णन कोठवर करावे ? जी पदवी बहाल केलेली असते ती काढून घेता येते. पण जी पदवी पदावर आरूढ होऊन संपादन केलेली



असते, ती ब्रह्मदेवालाही काढून घेता येत नाही. ''अगा सर्व जीवांचे शरीरी । परमात्म हंस पदाची थोरी । अखंड असतसे गोचरी । परी नेणती अज्ञान।।१।।'' ही श्रीज्ञानेश्वरमहाराज यांची उत्तरगीतेतील टीकेतील ओवी येथे विचारात घेणेसारखी आहे. या हंसपदी स्थिर होऊन ज्यांचे जीवन शांत झाले ती पदवी सर्व श्रेष्ठच आहे. 'बरवे साधन सुख शांत मन' म्हणजे सुख शांत मन हेच खरे बरवे साधन आहे. 'शांती नाही रे बरवी । तोवरी कैची तुज पदवी ।। आशा पापीणी हीत बुडवी । प्रपंचाते गोवी।।' असे श्रीकेशवस्वामी म्हणतात. जोपर्यंत जीवनात शांती लाभली नाही तोपर्यंत परमार्थात त्या पदवीला काही अर्थ नाही. ज्याने शांती मिळविली त्याने आत्मसुख मिळविले. श्रीतुकाराममहाराज म्हणतात, 'शांती परते नाही सुख । येर अवघेची दुःख ।।' श्रीवसिष्ठांनी वेदातील एक चरणच आत्मसात केला पण त्यायोगे त्यानी 'ब्रह्मर्षी' पदवी संपादन केली. एखादा मनुष्य एम.ए. झाला व तो एम.ए.डी. सारखा वागला तरी त्याची डिग्री ही तशीच राहते. परमार्थात तसे नाही. तो क्रियाशील असल्याने नुसते तोंडाने उत्तम बोलणे किंवा तो उत्कृष्ट लेखक आहे, येवढ्यानेच त्याला संत ही पदवी प्राप्त होत नाही. 'एथ प्रत्ययोची प्रमाण प्रत्ययो पहावा' असे जे समर्थ म्हणतात त्याला महत्व आहे. 'आधी राखावा आचार। मग पहावा विचार । आचरे विचारे पैलपार । पाविजेल ।।१।।' श्रीसमर्थ म्हणतात. मुख्य आचार मागोमाग विचार असे झाले तर तो प्राणी परपार होतो. विचार तसा आचार हा व्यवहार असून आचार तसा विचार हा परमार्थ आहे. म्हणून ही पदवी आचाराधिष्ठित आहे, हे लक्षात घेणे आवश्यक आहे. 'एका चरणाचा अर्थ । मुनी वसिष्ठ जाणत । तेणे शांतीच्या सदनात । स्वात्मसुखी पहुडला।।' श्रीतुकाराममहाराज म्हणतात, 'ॐ शांति शांति शांतिः' हा वेदातील एक चरण वसिष्ठानी आत्मसात केला, शांति मिळविली. पण विश्वामित्रानी आश्रम जाळला, शंभर मुले मारली तरी वसिष्ठांची शांती ढळली नाही. ही जी वसिष्ठानी मिळवलेली पदवी त्याची बरोबरी कोण करणार? जो या अवस्थेत आला तो संत या पदवीला पोहोचलाच. पण जेथे ही

अवस्था नाही तेथे तो मग कितीही असू दे त्याला, ही पदवी शोभेलच कशी ? असे श्रीतुकाराममहाराज यांना येथे म्हणावयाचे आहे. म्हणून श्रीतुकाराममहाराज म्हणतात – 'ज्याची त्याला पदवी इतराना न साजे । संताला उमजे आत्मसुख ।।' 'जो आत्मलाभासारखे । गोमटे काहीच न देखे । म्हणोनी भोग विशेखे । हरिखे ना जो।।' या श्रीज्ञानेश्वरमहाराज यांचे उक्तीप्रमाणे आत्मलाभापरता ज्याला लाभच नाही आणि भोगादि विषयात ज्याला आनंद नाही, हे जे संतानी आत्मसुख संपादन केले ती पदवी सर्वश्रेष्ठ आहे. येथे जीव प्रतिशंकराचे तोडीलाच जातो. श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात – 'रकारा पुढे मकार मांडी का । तेणे तुकसी सम शुंभुचिया।।' किंवा 'तो जीवूचि परी तुके महेशेसी' अशी ज्याची स्थिती झाली.

ही स्थिती जर प्राप्त व्हावी असे वाटत असेल तर श्रीतुकाराममहाराज म्हणतात 'आत्मसुख घ्यारे उघडा ज्ञानदृष्टी । वाऊगी चाऊटी नका करू ।।२।।' येथे ज्ञानदृष्टी म्हणजे काय याचा विचार महत्वाचा असून, दृष्टीमुळे ज्ञान आहे का ज्ञानामुळे दृष्टी आहे हा प्रश्नही विचारात घेणेसारखा आहे. याशिवाय आत्मसुख होणारच नाही. श्रीनाथमहाराज म्हणतात 'जे जे दृष्टी दिसे ते ते ब्रह्मरूप ।' दृष्टी ही नेहमी डोळ्याच्या मागे असते. दृष्टीनेच डोळा तल्लख बनतो. डोळा आहे तेवढेच दृश्य दाखवतो. दृश्याचे पलिकडे काय आहे हे दाखवण्याचे काम दृष्टी करते. दृष्टीने काही दाखवले तर जे दाखवले त्याचे ज्ञान जीवाला होते. म्हणून दृष्टीमुळे ज्ञान आहे हे नि:श्चित झाले तर त्याचे परिणामही दृग्गोचार होऊ लागतात. दृष्टी ही स्थूल झाली की त्यालाच डोळा म्हणतात. डोळा सूक्ष्म झाला तर तेथे दृष्टी प्राप्त होते. आपल्याला डोळा आहे पण दृष्टी नाही असे श्रीतुकाराममहाराज यांचे म्हणणे आहे. ते म्हणतात, 'आपणासी डोळे, दृष्टी नाही।' ही दृष्टी प्राप्त झाली आणि ज्ञान झाले तर त्याचे परिणाम हे साक्षात्कारी जीवन घडविणेत होतात. श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात 'हे असो दिठी जयावरी झळके । की पद्मकरू माथा ठाके । तो जीऊची परी तुके । महेशेसी।।' किंवा श्रीतुकाराममहाराज म्हणतात, 'उफराटी दृष्टी लावोनीया दिली । प्रकाशाची केली भेटी तेणे।।' दृष्टीचा प्रकाश पडला की प्रकाशाने मग ज्ञान होते. श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात, 'ऐसे ज्ञान प्रकाशे पाहेल । तै मोहांधकारू जाईल । जै गुरूकृपा होईल । पार्था गा।।' ज्ञान प्रकाशे पाहेल म्हणजे प्रकाशे ज्ञान पाहेल असाच अर्थ येथे अभिप्रेत आहे. याचा परिणाम मोहाची निवृत्ती असा आहे आणि याचे नाव ज्ञानदृष्टी. ही उघडणेसाठी एक विशिष्ट क्रिया साधावी लागते की जी क्रिया साधली तर चैतन्याची क्रिया स्पष्ट होते. या क्रियेशिवाय जे उरले, ती वाचाळता आहे. म्हणून श्रीसमर्थ म्हणतात, 'क्रियेवीण वाचाळता व्यर्थ आहे' यादृष्टीने श्रीतुकाराममहाराज यानी या अभंगाचे दुसऱ्या कडव्यात ही ज्ञानदृष्टी उघडणेसाठी नेमके काय केले पाहिजे तेच सांगितले आहे. ते म्हणतात, 'आत्मसुख घ्यारे उघडा ज्ञानदृष्टी । वाऊगी चाऊटी नका करू ।।' येथे चाऊटी म्हणजे चावटपणा नव्हे. चाऊटी याचा अर्थ चेष्टा आणि चेष्टा म्हणजे चेष्टा-कुचेष्टा अर्थाने हा शब्द नव्हे. चेष्टा याचा अर्थ येथे हालचाल असा आहे. शरीराच्या चेष्टा म्हणजे हालचाल. उदाहरणार्थ श्रीतुकाराममहाराज आपल्या एका अभंगात म्हणतात, 'फावल्या त्या करू चेष्टा । निश्चळ द्रष्टा होवोनी ।।' शरीराची हालचाल थांबली की चैतन्याची हालचाल सुरू होते. त्यातून साधकाला दृष्टी येते. दृष्टीने साक्षात्कार होतो. साक्षात्काराने ज्ञान होते. त्याला मग ज्ञानदृष्टी म्हणतात. आत्मसुखासाठी ज्ञानदृष्टी उघडली पाहिजे व त्यासाठी शरीराची वाऊगी चाऊटी म्हणजे अनावश्यक हालचाल ही थांबली पाहिजे.



अभंगाच्या तिसऱ्या कडव्यात श्रीतुकाराममहाराज म्हणतात,'नका करू काही संतसंग धरा । पूर्वीचा हा दोरा उगवेल ।।३।।' वाऊगी चाऊटी थांबून ज्ञानदृष्टी उघडणेसाठी काय व्हावे लागेल ते येथे सांगितले आहे. काही करणेचे खटपटीत आम्ही आहो तोपर्यंत यातील काहीच जमणार नाही. 'काही केल्या तुम्हा उमजेना वाट' असे श्रीतुकाराममहाराजांनी एके ठिकाणी बजावून

सांगितले आहे. तर श्रीसमर्थ असेच कांही सांगून गेले आहेत. ते म्हणतात, ‘काहीच न करोनी प्राणी । रामनाम जपे वाणी । तेणे संतुष्ट चक्रपाणी । भक्तालागी सांभाळी ।।’ काही न करणेचे स्थितीत आले तर मग रामनाम घेता येते. ज्याचे बोलणे संपले तोच नाम घेतो, ज्याचे करणे संपले त्यालाच चैतन्याच्या क्रियेचे ज्ञान होते. मुलाचे हसणे आणि रडणे यालाही शास्त्राने करणेच म्हटले आहे. भांड्यात पाणी आहे, त्या भांड्यात वायू साठवणेचा आहे तर पाणी ओतलेच पाहिजे. भांडे मोकळे झाले तर त्यात वायू साठेल. तसेच काही न करण्याच्या अवस्थेत गुरूकृपेने जर जीव आला तर सत् स्वरूप जे आत आहे, त्याचा संग धरता येईल. सत् स्वरूपाला जाणणारे संत. सत् स्वरूपाचा संग हा संतसंगच आहे. संताचे संगतीत अगर सत्संगतीत जीव आला की, ‘पूर्वीचा हा दोरा उगवल’ असे होते. प्रवासाची साधने बदलली तरी प्रवासी तोच आहे, मणी हजार पण ज्या दोऱ्यात ते गुंफले आहेत तो दोराच एकच आहे. शरीरे भिन्न पण ज्या सूत्राने ती बांधली ते सूत्र एकच आहे. मणी ओघळले की दोरा दिसतो, त्याप्रमाणे शरीराला विकलता आणि इंद्रियांना साधनेने शैथील्य आले की जो दोरा पूर्वी होता व पुढे असणार आहे, नव्हे नव्हे, आताही तो शरीरात आहे पण दिसून येत नाही तो दिसू लागतो. सूर्य उगवला असे म्हटले तर तो गेला होता कुठे ? तो होताच पण दिसत नव्हता. दिसल्यावर मग त्याला उगवला असे म्हणतात. जीवनाचे सूत्र म्हणजे दोरा संतसंगाने स्पष्ट जाणवतो. असे हे सारे घडले तर मग तो पूर्वीचा पण आत्ताही आपल्या जीवनात प्रत्ययास येणारा असा हा दोरा, काही न करणेचे स्थितीत संतसंगाने उगवेल असे श्रीतुकाराममहाराजांना म्हणावयाचे आहे. असा जर हा दोरा उगवला तर प्रारब्धरेषा उदयास आली असे म्हणणेस काहीच हरकत नाही.

यादृष्टीने अभंगाच्या चौथ्या कडव्यात श्रीतुकाराममहाराज म्हणतात, ‘उगवेल प्रारब्ध संतस्ंगे करूनी । प्रत्यक्ष पुराणी वर्णियेले ।।४।।’ प्रारंभ म्हणजे आरंभ होणे. कर्माचा आरंभ जेथे झालेला आहे असे जे ललाट स्थान आहे,



तेथेच चैतन्याचे सूत्र संतसंगतीने प्रकर्षाला आल्याने, म्हणजे त्याची जाणीव प्रकर्षाने होऊ लागल्याने, पुराणांतरी सांगितल्याप्रमाणे संतसंगतीने प्रारब्ध रेषा उदयाला निश्चितच येणार यात प्रश्नच नाही आणि एवढ्याच करता नामरूपाची कीर्ति मोठ्या उद्घोषाने वर्णन करून सांगितली आहे की ज्याचे नुसते श्रवण जरी घडले तरी सर्व दोषांची निवृत्ती झाल्यावाचून रहाणार नाही. येवढ्यासाठी तर श्रीतुकाराममहाराज या अभंगाचे शेवटल्या कडव्यात सांगतात, ‘वर्णियेली किर्ती नामरूप घोष । जातील ते दोष तुका म्हणे ।।५।।’

आता हे दोष कसे जातात, त्यासाठी काय करावयास हवे हे श्रीतुकाराममहाराज पुढील अभंगात सांगतात.

***

## अभंग ६ वा

**दोष ते जातील अनंता जन्मीचे । पाय ते देवाचे न सोडावे ।।१।।**
**न सोडावे पाय ऐसा निश्चय करा । आळवा शारंगधरा भावबळे ।।२।।**
**धरोनी केशव आणा भावबळे । पापीया न कळे काही केल्या ।।३।।**
**न कळे तो देव सत्संगावाचुनी । वासना जाळोनी शुद्ध करा ।।४।।**
**शुद्ध करा मन व्हारे देहातीत । ओळखा वस्तुते तुका म्हणे ।।५।।**

मागे अभंगात शेवटी ‘वर्णियेली किर्ती नामरूप घोष । जातील ते दोष तुका म्हणे’ असेच श्रीतुकाराममहाराज यांनी सांगितले आहे. तो थोडा भाग येथे पाहिल्याशिवाय पुढे जाता येत नाही. नामाचा घोष म्हटले असते तर प्रश्नच नव्हता आणि श्रीतुकाराममहाराज तसे एका ठिकाणी म्हणतही आहेत. ते म्हणतात, ‘तुका म्हणे नुपजे दोष । करा घोष आनंदे।।’ किंवा ‘लावुनी मृदंग श्रुती टाळ घोष । सेवू ब्रह्मरस आवडीने।।’ आणि ‘हा रस आनंदाचा । घोष करा हरिनामाचा । पार या भाग्याचा। कोण पावे येथील ।।’ अशी किती अवतरणे

द्यावीत पण महाराजांनी येथे मात्र तसे म्हटले नाही. येथे त्यानी 'नाम रूप घोष' असेच म्हटले आहे. त्याचा विचार होणे आवश्यक आहे. आत्मा किंवा चैतन्य हे ध्वनीप्रकाशयुक्त आहे. म्हणून आपले खरे जीवन हे ध्वनीप्रकाशयुक्त आहे. त्यावर शरीराचे आवरण आहे. तो विषय आता आपणास पहावयाचा नाही. येथे ध्वनी म्हणजे नाम व प्रकाश हे रूप आहे. सोऽहंध्वनी बरोबरच तेथे संघर्षाने सारखा प्रकाशही होत असतो. श्रीज्ञानेश्वर महाराजांनी, 'जव या वायूचा प्रकाशू । तव या भांडीयाचा विश्वासू ।।' हे या दृष्टीनेच म्हटले आहे. नादप्रकाशयुक्त असे हे नाम आहे. येथे नाम व रूप हे दोन्ही एकच आहे. 'नाम तेचि रूप रूप तेची नाम । ऐसे ते निगम गर्जताती ।' असे श्रीनाथमहाराज आपले अभंगात सांगतात, तेही या करताच. आणि म्हणून या नामरूपाचा जर घोष झाला तर तीच खरी भगवंताची किर्ती आहे. श्रीनिळोबाराय म्हणतात, 'नाम वाचे श्रवण किर्ती । पाऊले चित्ती समान।।' नामाचे श्रवण म्हणजे प्रकाशयुक्त नादानुसंधान किंवा नामानुसंधान, ही जी किर्ती आहे याने जीवाचे जन्मांतरीचे दोष खचितच जातात आणि म्हणून या अभंगात श्रीतुकाराममहाराज म्हणतात– 'दोष ते जातील अनंता जन्मीचे । पाय ते देवाचे न सोडावे ।।१।।'

ज्या पायाने देव ही वाटचाल करतो की ज्यामुळे आपल्या पायाने आपल्याला कुठल्याही रस्त्याने जाता येते हे ओळखून, त्याचे पाय धरले पाहिजेत. हाच आशय वेगळ्या शब्दात श्रीतुकाराममहाराज स्वानुभवाने सांगत आहेत. ते म्हणतात, 'जेथे जातो तेथे तू माझा सांगाती । चालविसी हाती धरोनिया ।।' आपले चित्त हे देवाच्या पायाशी खिळून राहिले पाहिजे. अर्थात त्याचीच आवड असेल तर हे घडणार, श्रीतुकाराममहाराज म्हणतात, ''चित्त बैसे पायी रूप बैसे डोळा । जीवी कळवळा आवडीचा ।।'' देवाचे पाय घट्ट धरले व ते सोडलेच नाहीत तर ही खरी शरणागती झाली. मग अनंत जन्मातील दोषांचीही काळजी करण्याचे कारणच नाही. श्रीतुकाराममहाराज तरी मी भगवंतांचे पाय रात्रंदिवस आठवीन, त्याला विसंबणार नाही, हाच माझा नवस



आहे असे सांगतात. 'आठवीन पाय हा माझा नवस । रात्र आणि दिवस पांडुरंगा।।'

श्रीतुकाराममहाराज या अभंगाचे दुसऱ्या कडव्यात सांगतात, 'न सोडावे पाय ऐसा निश्चय करा । आळवा शारंगधरा भावबळे ।।२।।' देवाचे पाय सोडणार नाही असा निश्चय करून, भावबळाने त्याला सारखे आळवले पाहिजे. निश्चय असेल तर फळ अगदी ठेवल्यासारखे आहे, 'निश्चयाचे बळ । तुका म्हणे तेची फळ ।।' या उक्तीवरून हे स्ष्ट होत आहे. भावबळाने त्याची आळवणी करावयाची म्हणजे काय हाही प्रश्नच आहे. भाव म्हणजे, आपले अस्तित्त्व ज्याचेवर आहे, तो जो अस्तिभाव तोच खरा भाव आहे. जो कळला तरच देव कळतो 'भाव म्हणजे काय ज्यावीण सर्व वाव । जयाचा प्रभाव देही दिसे ।। 'भाव कळो येता देव कळो येई । अन्यत्र उपायी शिणतसे ।।' असे आमचे वडील ती.प.पू. श्रीमामा केळकर यानी आपल्या श्रीरामपाठाचे अभंगात सांगितले आहे. ज्याचे अभावी सारे जीवन फुकट आहे, की ज्याला काही अर्थच रहात नाही तो भाव, प्राण गेला तर आयुष्यच संपले, हा जो भाव की ज्याला जाणले तर त्या प्राणोपासनेने देवाची ओळख होते. त्या भावानेच देवाला आळविता येते. 'रामकृष्ण वाचा भाव हा जीवाचा' असेच श्रीज्ञानेश्वरमहाराजानी हरिपाठात सांगितले आहे. इडा आणि पिंगला या जीवनाच्या दोन नाड्या आहेत. पिंगला = राम, इडा = कृष्ण, हेच रामकृष्ण वाचेचे स्वरूप आहे. याला धरून जर नाम घेतले तर देवाची आळवणी झाल्याने त्याचा साक्षात्कार होतो.

यादृष्टीने श्रीतुकाराममहाराज या अभंगाचे तिसऱ्या कडव्यात म्हणतात, 'धरोनि केशव आणा भावबळे । पापीया न कळे काही केल्या ।।' हा केशव भावबळाने धरून आणला पाहिजे. पाप्याला मात्र काही केले तरी याचा बोध होत नाही. श्रीनामदेवमहाराजांनी भगवंताला हाताला धरून आपले घरी आणले होते. नामदेवाचे प्रेम तर विलक्षणच होते. 'नामदेवा ठायी प्रेम । मार्गी

आडविले ब्रह्म।।' नामदेवाचे प्रेम असे की त्यांनी मार्गावरच ब्रह्माला आडवून धरले मग ते जाईल कोठे. 'हाती धरूनी देवासी । चाल आमुच्या घरासी ।।' देवाला हाती धरून घरी आणले व त्या महात्म्याने आपल्या जीवनाची दिवाळी केली. 'साधु या संतानी देव धरला मनगटी । काय झाले म्हणोनी दचकले जगजेठी।।' संतांनी देवाचे मनगटाला धरताच काय झाले म्हणून देवही दचकले. काय त्यांचा अधिकार असेल याची कल्पना करूया.जो नामाला विन्मुख असणारा पापी, त्याला हे ज्ञान कसे व्हावे ? श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात, 'नामासी विन्मुख तो नर पापीया ।' आणि म्हणून 'पापीया न कळे काही केल्या' असे श्रीतुकाराममहाराज ठणकावून सांगतात.

अभंगाचे चौथ्या कडव्यात श्रीतुकाराममहाराज म्हणतात, 'न कळे तो देव संतसंगा वाचोनी । वासना जाळोनी शुद्ध करा ।।' हा जो देव आहे तो संतसंगावाचून कळत नाही. श्रीसमर्थ म्हणतात, 'संताचेनी संगे देवपाठी लागे । सांडू जाता मागे सांडवेना ।।' तर श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात, 'संतांचे संगती मनोमार्गे गती। आकळावा श्रीपती येणे पंथे।। ' हाच आशय 'संतनकी संग लगी। तेरी अच्छी बनेगी।।' या शब्दांत कबीरानी व्यक्त केला आहे. 'सदा संगती सज्जनाची धरावी' हे श्रीसमर्थानी याकरताच म्हटले आहे. 'संतसंगतीत सर्व भावे हरी । न सांगता करी सर्व काम' या अभंगात संतसंगाचे महत्व श्रीतुकाराममहाराज यांनी व्यक्त केले आहे. संतसंगाने वासना नष्ट होते. वासना म्हणजे परमात्म्याचे स्वरूपी वास किंवा जीवाची वस्ती नसणे हीच वासना. संताचे चरणरज जर मस्तकी लागले तर वासना जळून जाते. श्रीतुकाराममहाराज म्हणतात, 'संतचरणरज लागता सहज । वासनेचे बीज जळोनी जाय।।' सकार व हकार जेथे जन्माला येतात, तेथे जर ज्या चरणाने संत आपला भक्तीमार्ग चोखाळतात ते रज:कण लागले तर वासना उतरच नाही. 'मना वासना वासुदेवी वसो दे' असे समर्थांनी यासाठीच सांगून, 'मना वासना दुष्ट कामा नये रे' असे बजाविले आहे. वासना उरली नाही तर मन शुद्ध होते व तो जीव देहातीत झाल्याने देहातीत वस्तुची प्राप्ती होते आणि म्हणूनच शेवटी



या अभंगात श्रीतुकाराममहाराज म्हणतात, 'शुद्ध करा मन व्हारे देहातीत । ओळखा वस्तू ते तुका म्हणे ।।' मोकळे मन असेल तर ते शुद्ध राहते. त्यात संकल्प विकल्पाचे जाळी-जळमट रहात नाही. 'सदा सर्वदा मोकळी वृत्ती राहे' असे श्रीसमर्थांनी म्हटल्याप्रमाणे त्या जीवाची अवस्था आहे. ही अवस्था म्हणजे एक महत् पुण्य आहे. शुद्ध पुण्य आहे. 'तुका म्हणे मोकळे मन । शुद्ध पुण्य या नाव ।।' मन शुद्ध झाले की ते साहजिकच कर्मातीत झालेने देहातीत होते. बंध, मोक्षाला कारण मनच आहे. 'मन एव मनुष्याणां कारणं बंधमोक्षयो:।' येथे विषयासक्ती न राहिल्याने मुक्तता म्हणजे देहातीत स्थिती त्या जीवाला प्राप्त होते. 'मुक्तं निर्विषयं स्मृतं' या स्थितीने कोणताही विषय नाहीसा व्हावा असा विषय डोळ्यासमोर आल्याने त्यास वस्तुदर्शन होते. शुद्ध मनाने देहातीत झाल्यावर वस्तूची ओळख कशी होते तेच आता श्रीतुकाराममहाराज या पुढील अभंगात सांगतात

***.

## अभंग ७ वा

**वस्तु ते ओळखा सांडा रे कल्पना । नका आडराना जाऊ झणी ।।१।।**

**झणी जाल कोठे बुडवाल हीत । विचारी मनांत आपुलीया ।।२।।**

**आपुलीया जीवे शिवासी पहावे । आत्मसुख घ्यावे वेळोवेळा ।।३।।**

**घ्यावे आत्मसुख स्वरूपी मिळावे । भूती लीन व्हावे तुका म्हणे ।।४।।**

कल्पनेचा निरास म्हणजेच वस्तूची ओळख हे खरे परमार्थातील एक सूत्रच आहे. ज्याला आत्मसाक्षात्कार व्हावा, त्याला निर्विकल्प अवस्थेमध्ये येणे हे आवश्यक आहे. कल्पना हीच एक मुळात उपाधी आहे. त्यातूनच जीवाची उत्पत्ती आणि परिभ्रमण आहे. कल्पनेने कल्पनाच वाढत जातात आणि साक्षात्कार ही एक मग कल्पनाच होते. कल्पांतापर्यंतही कल्पना जात

नाही. कल्पना ही एक काजळी आहे. जी कल्पना करावी त्यालाच हा जीव चिकटून बसतो आणि खरा देव हा दूरच राहतो. निर्विकल्पाची नुसती कल्पना केली तरी कल्पनेचा निरास क्षणभर का होईना होतो. मग गुरूकृपेने ती जर अवस्थाच प्राप्त झाली तर बोलावयासच नको. श्रीसमर्थ म्हणतात, 'मना कल्पना कल्पिता कल्प कोटी । नव्हे रे नव्हे सर्वथा राम भेटी । मनी कामना रामनामी जयाला । अती आदरे प्रीती नाही तयाला ।।' कोट्यावधी कल्प जरी कल्पना करीत हा प्राणी बसला तरी, आत्मारामाचा साक्षात्कार होणार नाही. कामना पूर्तीसाठी कल्पना निर्माण होते. काम आणि राम यांचे तर मुळातच वाकडे आहे. 'जहाँ काम तहाँ राम नही । जहा राम तहाँ काम नही ।।' असे तुलसीदासजी यासाठीच म्हणतात. काम असेल तर राम नाही व राम असेल तर काम म्हणजे इच्छा नाही असेच हे आहे. आत्मारामाची जर उत्कट इच्छा झाली तरच काम नाहीसा होतो. श्रीसमर्थ म्हणतात, 'करी काम निष्काम या राघवाचे । करी रूप स्वरूप सर्वा जीवांचे । करी छंद निर्द्वंद्व हे गुण गाता । हरीकिर्तनी वृत्ती विश्वास होता।।' या राघवाचे काम निष्काम करी असेच येथे श्रीसमर्थांना म्हणावयाचे आहे.

'सांडी कल्पना उपाधी । तीच साधुला समाधी।' असे मुक्ताबाईनी म्हटले आहे. कल्पना ही एक उपाधी असून त्याचे पलिकडेच साधुला प्राप्त होणारी समाधी अवस्था आहे. मणी बाजूला केले म्हणजेच सूत दिसते. यादृष्टीने या उपाधीत जे गुप्त असे चैतन्य आहे, त्याचा स्वीकार ही उपाधी बाजूला करूनच संतानी केला यातच त्याचे वर्म आहे. 'उपाधी माजी गुप्त । चैतन्य जे सर्वगत । ते तत्वज्ञ संत । स्वीकारती।।' असे श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात, 'एकोऽहं बहुस्याम्' या कल्पनेतूनच जीवाची निर्मिती आहे. हिलाच अविद्यात्मक माया असे म्हणतात. 'कल्पना अविद्या तेणे झाला जीव । मायोपाधी शिव बोलिजे ती ।।' असे श्रीनाथ महाराज यांनी सांगितले आहे. विषयांची कल्पना जेथे स्फूरते ती अविद्या आणि जेथे ब्रह्माचे स्फुरणच स्फुरण



रहाते ती सुविद्या. एक अविद्यात्मक माया, एक शुद्धात्मक माया. एका ठिकाणी जीव आणि एका ठिकाणी शिव असतो. ज्या स्फूरद्रुपात ब्रह्मभाव स्फुरतो तोच शिवभाव जागृत करतो, म्हणून 'मायोपाधी शिव बोलिजे ती' असे म्हटले आहे. श्रीसमर्थ म्हणतात, 'स्फुरे विषयी कल्पना ते अविद्या । स्फुरे ब्रह्म रे जाण माया सुविद्या । मूळी कल्पना दो रूपे तेचि झाली । विवेके तरी स्वस्वरूपी मिळाली ।।' 'स्वरूपी उदेला अहंकार राहो । तेणे सर्व आच्छादिले व्योम पाहो ।' अशीच या स्वरूपाचे ठिकाणी कल्पनेच्या विलासाने मोठी गंमत होत रहाते, मग येथे जीव आंधळा होतो व नाही नाही तेच पहावयास लागतो. स्वरूपाला आचवतो. नाही नाही तेच पहातो म्हणूनच आंधळा. येथे त्यात असणेपणाचा प्रत्ययच येत नाही. यातून आणि काय होते हेच तो पहात असतो. असणे आणि होणे यात अंतर आहे. या दृष्टीने पाहाण्यामध्ये हे एक जे अंतर पडत चालले आणि आत्मानुभव तर कोठेच येईना, हाच तो आंधळ्या कोशिंबीरीचा खेळ आहे. स्वप्नात जशी कल्पना साकार होते तसेच दृष्यात आहे. कल्पनाविस्तार हा प्रपंच असून मध्यवर्ती कल्पना हा परमार्थ आहे. काट्याने काटा काढला जातो. शब्दाने शब्दाचा परिणाम नाहीसा करता येतो. तसेच कल्पनेनेच कल्पनेचा निरास होतो. 'निर्विकल्पासी कल्पीत जावे।' असे येथे श्रीसमर्थांनी सांगितले आहे. आणि जर का साधले तर 'कल्पनेच्या नावे शून्याकार ।' असे होते. शून्यातून जे पुढे दृश्याकार झाले त्याचा लय शून्यात होऊन, त्याचे आंत साक्षात्कार होतो. श्रीकबीरसाहेब म्हणतात, 'शून्य महलमें दीप विराजे । बाजे अनुहत ढोल ।'. 'कल्पना काजळी कल्पिले कवळी । कैसेनि जवळी देव होय ।।' असे पंचरत्नी हरिपाठात म्हटले आहे. मनुष्य जर सदैव कल्पनाच कवटाळीत बसला तर त्या शेवटी कल्पनाच ठरतात आणि हाती काही ठरत नाही. मग त्याला देव कसा भेटणार ? म्हणून श्रीतुकाराममहाराज या अभंगाच्या पहिल्या कडव्यात म्हणतात, 'वस्तू ते ओळखा सांडा रे कल्पना।'.

आता या ठिकाणी आपणास जर कल्पनातीत अवस्थेत जाणेचे आहे तर

आडरानात शिरून हे नक्कीच जमणार नाही. दृश्य नव्हे तो देव. देवाचे आड जे दृश्य आले आहे तेच आडरान आहे. याचे पलिकडेच नेण्यासाठी संतांचे अवतार आहेत. किंबहुना तेच एक त्यांचे मोठे कार्य आहे. श्रीतुकाराममहाराज म्हणतात, 'झाडू संताचे मारग । आडरानी भरले जग । उच्छिष्टाचा भाग । शेष उरला तो सेवू ।' हे जग सारे आडरानीच भ्रमण करीत आहे. 'रोमरंध्री ब्रह्मांडे । सकळ विराटमय खडे । ऐसे महत् ब्रह्मे प्रचंडे । तुझ्या अंगी दातारा ।' असे श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात. हे अनंत विश्व सारखे परिभ्रमण करीत आहे. त्यात जीवांचाही प्रवास चालूच आहे. श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात, 'उपजे ते नासे । नासिले पुनरपि दिसे । हे घटिका यंत्र जैसे । परिभ्रमेगा ।।' मनाचे मनत्व जर नाहीसे झाले तरच हे कोष्टक जमणार आहे. न-मन असे होणे जरूरीचे आहे. नाहीतर हे विश्वाचे परिभ्रमण आणि त्यातून होणारे जीवांचे गमनागमन हे चालूच आहे. श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात, 'नमन हेची थोर दिसे । एरवी तरंगाकार भासे । देखिले तितुके नासे । नैश्वर्य ऐसे श्रुती बोले ।।' नमनेविण जर मनाचे परिभ्रमण सुरू झाले तर तोच आडमार्ग आहे. त्यालाच येथे आडरान असे म्हटले आहे. 'नमन हेची तारक । नमन हाचि विवेक । नमनेविण त्रिलोक। आडमार्गे रिघताती ।।' या दृष्टीने मनाचे मनत्व नाहीसे होऊन जर नमन झाले तरच वस्तुची गाठ पडणारी आहे. नमनाने विवेक आणि विवेकाने वस्तूची ओळख अशी या विषयाची संगती आहे. विवेकाने कल्पना ही वेगळी रहातच नाही. ती स्वरूपाकार होते व त्यामुळे तेथे स्वरूपाचा व वस्तूचा साक्षात्कार होतो. 'विवेके तरी स्वरूपी मिळावे' असे श्रीसमर्थ या दृष्टीनेच सांगतात. एवढ्याच करता श्रीतुकाराममहाराज म्हणतात, 'वस्तु ते ओळखा सांडा रे कल्पना । नका आडराना जाऊ झणी'।।१।।

श्रीतुकाराममहाराज या अभंगाचे दुसऱ्या कडव्यात म्हणतात, 'झणी जाल कोठे बुडवाल हीत । विचारी मनांत आपुलीया ।।' या आडरानी एकदा का जीवाचा प्रवास चालू झाला तर त्याचे हीत साधणारच नाही. हीत व्हावे तर हा दंभाचार उपयोगाचा नाही. देहाचा अहंकार म्हटला की, दंभ आलाच.



श्रीतुकाराममहाराज म्हणतात, 'हीत व्हावे तरी दंभ दुरी ठेवा । चित्त शुद्धी सेवा देवाची ते।' दंभविरहित चित्तशुद्धी ही देवाची सेवा आहे. त्यानेच त्याची प्राप्ती होते. म्हणून 'हीत ते एक राम कंठी राहे । नाठाविती देहे देहभाव ।' असे श्रीतुकाराममहाराज यासाठीच सांगत आहेत. ही अवस्था गुरूकृपेने, नामसाधनेनेच साधते. वृत्ती जर नाममय झाली तर सहजच निर्विकल्प स्थिती प्राप्त होते. श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात, 'नामापरते तत्त्व नाही रे अन्यथा । वाया आणिका पंथा जाशी झणी ।।' नामावेगळे जे अन्य मार्ग आहेत ते जर वायाच आहेत, तर तेथे जाऊन तरी काय उपयोग ? हा प्रश्नच येथे महत्त्वाचा आहे, याचा विचार होणे हे जरूरीचे आहे.

आपल्या जीवाने शिवाला पहाणे हेच आत्मसुख अशी स्थिती असल्याने जीव तर आपला झाला आणि त्याने जर शिवाला पाहिले तर अखंड आत्मसुखच मिळविता येईल. दृष्टीसमोर असणारे जे दृष्य जर का लयाला गेले आणि जीव अंतर्मुख झाला तरच जीवा-शिवाचे ऐक्य दृष्टीद्वारा होते आणि परमार्थातील मुख्य अनुभव घेता येतो. 'तुका म्हणे जीवी शिव । हाचि येथीचा अनुभव।।' येथे मनाचे उन्मन झालेले असते. श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात, 'नमन हाचि अनुभव । नमन हाचि मुख्य भाव । नमन हाचि पै देव । देवाधिदेव तू पावसी।।' ज्याच्यामुळे ही सारी उपाधी त्या उपाधीचा अनुभव न घेता, त्या उपाधीतील आत्म्याचाच निखळ अनुभव घेणे हेच आत्मसुख असल्याने श्रीतुकाराममहाराज म्हणतात, 'आपुलीया जीवे शिवासी पहावे । आत्मसुख घ्यावे वेळोवेळा ।।' जीव हा देहाचा, मनाचा, दृष्याचा न होता, आपल्या स्वरूपाच्या अनुभवाकरिता जर तो आपला झाला आणि शिवाकडे जर तो पाहू लागला तर निरतीशय सुख प्राप्त होते. तेच आत्मसुख आहे. श्रीसिध्दरामेश्वरमहाराज यांचे एक निष्ठावंत शिष्य श्रीभवानीमहाराज हे डोक्यावर पागोटे ठेवून, हातांत विणा, चिपळ्या घेऊन कीर्तन करीत. श्रीतुकाराममहाराज यांच्याप्रमाणेच ते दिसायचे. कीर्तनात एकदा ते म्हणाले, 'आपल्या जीवाने शिवाला पहावे म्हणजे काय ? हे तुम्हाला पहायचे आहे

काय ?' श्रोते म्हणाले, 'होय ! पहायचे आहे' लगेच श्रीभवानीमहाराज आसन घालून बसले व पहा म्हणाले, तास झाला दोन तास झाले, तीन तास झाले, महाराजांच्या शरीराची काहीच हालचाल दिसेना, तेव्हा काय झाले पहावे म्हणून श्रोते जवळ गेले तर त्यांना महाराज शिवरूपच झालेले दिसले. अशा तोलामोलाचा आपला संप्रदाय आहे, श्रीनिंबरगीकरमहाराज हे चालते बोलते ब्रह्म ! त्यांनी आपल्या भक्तजनांना सांगितलेली साधना व श्रीतुकाराममहाराज यांचे अभंगातून प्रगट रहस्यमय ज्ञान, याची कल्पना यावरून निश्चित येईल असे वाटते.

स्वरूपाकार होणे हेच आत्मसुख, भूतमात्री लीन झाल्याने प्राप्त होते. म्हणून श्रीतुकाराममहाराज या अभंगाच्या शेवटच्या कडव्यात म्हणतात, 'घ्यावे आत्मसुख स्वरूपी मिळावे । भूती लीन व्हावे तुका म्हणे ।।४।।' आता या भूतमात्री लीन व्हावयाचे म्हणजे काय ? हे श्रीतुकाराममहाराज पुढील अभंगात स्पष्ट करणार आहेत.

***

## अभंग ८ वा

**भूती लीन व्हावे सांगावे नलगेची । आता अहंकाराची शांती करा।।१।।**
**शांती करा तुम्ही ममता नसावी । अंतरी असावी भूतदया ।।२।।**
**भूतदया ठेवी तया काय उणे । प्रथम साधन हेची असे ।।३।।**
**असे जे साधन जया चित्ती वसे । मायाजाळ नासे तुका म्हणे ।।४।।**

श्रीतुकाराममहाराज या अभंगात भूती लीन व्हावे असे सांगत आहेत. 'एकोविष्णूमहद्भूत: पृथक्भूतान्यनेकेश:' असे विष्णूसहस्रनामात म्हटले आहे. एक विष्णू हा महत्‌भूत असून उपाधीभूत जीवनात तो अनेक ठिकाणी सर्व व्याप्त आहे. अर्थात् तो आपल्या देहातही आहेच. या ठिकाणी जर आपल्याला



लीन होता येईल तर सर्व भूतमात्राचे ठिकाणी आपण विलीन झाल्याची प्रचिती येईल. भक्तीयोगातील तर हे रहस्यच आहे. श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात, 'जे जे भेटे भूत । ते ते मानिजे भगवंत ।। हा भक्तीयोग निश्चित । जाण माझा ।।' भू म्हणजे होणे व भूत म्हणजे झालेले. तदंगभूत ही सारी उपाधी आहे. उपाधीमध्ये हे चैतन्य खेळत आहे. 'उपाधीमाजी गुप्त । चैतन्य जे सर्वगत ।। ते तत्वज्ञ संत । स्वीकारीती ।।१।।' या श्रीज्ञानेश्वरमहाराज यांचे उक्तीप्रमाणे संतानी व तत्वज्ञानी लोकानी या चैतन्याचाच स्वीकार केला आहे. 'हे समस्त श्रीवासुदेवो । ऐसा प्रतीती रसाचा वोतला भावो ।। म्हणोनी भक्तामाजी रावो । आणि ज्ञानिया तोची।।१।।' हे सर्व वासुदेव स्वरूप आहे ही प्रचीती ज्याला आली, तोच भक्त आणि ज्ञानी आहे, असे श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात. या ठिकाणी देहभाव नाहीसा झालेला असतो. इंद्रिये विषय विसरतात. हे महद्‌भूत दर्शनाचे गमक आहे. 'तै शरीरभाव नासती । इंद्रिये विषय विसरती । जै सोहंभाव प्रतीती । प्रगट होय ।।' अशी अवस्था होते व अशा प्रकारचे जीव हे सोहंभाव पारंगत होतात. 'जे अपेक्षिजे विरक्ती । सदा अनुभविजे संती ।। सोऽहंभाव पारंगती रमिजे तेथ ।।१।।' विरक्तीचे अपेक्षेशिवाय सोऽहंभावात पारंगत होता येत नाही. विषय आणि इंद्रिये ही जड स्वभावाची आहेत. याचे ज्ञान होणे हीच खरी विरक्ती आहे. 'चिन्मय चालक आत्मा नांदे इंद्रिया व्यापारी गे।' श्रीज्ञानेश्वरमाऊलीने सांगितलेले तत्त्व ज्याचे अंतरी बिंबले तेथे सहजच आत्मप्रचीती येते. वायुस्वरूप जीव हा दृश्यांत व विषयांत घोटाळलेला खरा, पण तो अंतर्मुख झालेने आत्मरूपातच लीन होतो. 'अहं जाऊनी शांभवी झाली' अशी अवस्था होते. अहंकार हे एक वारेच आहे. चैतन्याने जडाची होणारी हालचाल अहंभाव प्रगट करते व चैतन्याने ही हालचाल होत आहे या जाणीवेच्या अभावी मीच सर्वकाही करतो आहे असा अभिमान निर्माण होतो व मग सुखदु:खादी द्वंद्वाशी जीवाला झगडा द्यावा लागतो. 'हे कर्म मी कर्ता । का आचरेन या अर्था । ऐसा अभिमान झणे चित्ता । रिघो देसी।।' या ज्ञानेशोक्तीप्रमाणे अहंकाराचे वारेच लीन होण्याला आडकाठी निर्माण करते.

'अहंकाराचा वारा न लागो राजसा।' असे श्रीनामदेवमहाराजांनी यासाठी म्हटले आहे. 'या या देवाचे भरता वारे । अंगी प्रेमाचे फेफरे ।।' या श्रीतुकोक्तीप्रमाणे देवाचे वारे आत भरले की भक्तीप्रेमाने जीवन फुलून जाते व अहंकाराचे वारे तेथे राहूच शकत नाही. काट्याने काटा काढावा याप्रमाणे वाऱ्याने वाऱ्याचा निरास होतो. सर्वाला कारण एक वारेच आहे. याचा शोध महत्वाचा आहे हे आपण नेहमीच पहात असतो, म्हणून तो विषय येथे वाढवत नाही. अहंशी तादात्म्य हाच अहंकार असलेने, अहंभावाचा अभाव झाला म्हणजे सोहंभाव जागृत होतो. 'मनाते मारूनी । इंद्रिया ते दंडुनी । मी हे सोडूनी । सोहं धरी ।।' असे श्रीचांगदेव याकरताच आवर्जून सांगत आहेत. 'देह तव पाचाचे जाले । हे कर्माचे गुणी गुंथले ।। भव तसे चाकी सूदले । जन्म मृत्यूच्या ।।१।।' हा देह पंचभूतांचा झाला असून, कर्माच्या सूत्राने गुंफलेला आहे आणि जन्ममृत्यूच्या चक्रात घातला आहे. देह अनित्य असून आत्मा तर नित्य आहे. श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात, 'या देहाची हे दशा । आणि आत्मा तो एथ ऐसा। पै नित्य सिद्ध अपैसा । अनादिपणे ।।१।।' येथे जो आत्मा आहे तो सहजत्त्वाने नित्य सिद्ध असाच आहे. मग जो ही पंचभूतांची आणि तज्जन्य भूतसृष्टीची भाषाच विसरला, तेथे महद्‌भूत परमात्म्यावाचून त्याचे दृष्टीत दुसरे तरी काय येणार आहे ? असा प्रश्न आहे. 'मग भूते हे भाष विसरला । जे दिठी मीचि आहे सूदला । म्हणोनि निर्वैर जाहला । सर्वत्र भजे ।।१।।' श्रीज्ञानेश्वरमाऊली म्हणते या स्थितीत तो निर्वैर झाल्याने, सर्वत्र असणाऱ्या एका परमात्म्याचीच भक्ती, त्यालाच पहात, करीत रहातो. आपल्यासहीत तो सर्व दृष्टी महद्‌भूत परमात्मस्वरूपातच पहात रहातो. श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात, 'ते वेळी आपणापिया सहिते । इथे अशेषही भूते । माझ्या स्वरूपी अखंडीते । देखसी तू।।' अशा या समष्टी भावात अहंकार रहाणारच कसा ? ज्याचा अहंकार गेला तोच खऱ्या अर्थाने लीन झाला. अहंकार विरून गेल्यावर तेथे क्रोधाग्नी भडकेलच कसा ? म्हणून अहंकाराची शांती हीच खरी शांती, ती संपादन करणे, हे जरूरीचे आहे. म्हणून या अभंगाच्या पहिल्या कडव्यात



श्रीतुकाराममहाराज म्हणतात, 'भूती लीन व्हावे, सांगावे नलगेची । आता अहंकाराची शांति करा ।।'

अभंगाच्या दुसऱ्या कडव्यात शांतीने काय होते व तेथे मग साधकाने काय केले पाहिजे त्याचाही विचार केलेला आहे. अहंकाराची शांती झाली तो ब्रह्मैक्य पावला. तेथे मग काही चिंता कशाचीही उरली नाही. तो आत्मतृप्तच झाला. चिंताच नाही, मग ममत्त्वाचे तरी कारण काय ? असा प्रश्न आहे. श्रीकेशवस्वामी म्हणतात, 'चिंता ममता ही तव नेणे । ब्रह्मचि एकविध होणे।।१।। आनंद केला बा गुरुराया । हरली अवघी माया' ।।धृ.।। यादृष्टीने श्रीतुकाराममहाराज येथे दुसऱ्या कडव्यात सांगतात, 'शांती करा तुम्ही ममता नसावी । अंतरी असावी भूतदया ।।' जेथे ममता नाही, तेथे देहबुद्धी नाही. आत्मबुद्धी जागरूक होऊन भूतमात्रात आत्मा पहाणारा, सर्वांचा आत्मा एकच आहे हे ओळखून, दयाशीलच राहील. श्रीतुकाराममहाराज म्हणतात, 'भूताची दया हे भांडवल संता । आपुलिया देही ममता नाही ।।' ज्यांचे ठिकाणी आपल्या देहाचे ममत्त्व नाही तेच महात्मे भूतमात्राचे ठायी असणारा महद्‌भूत परमात्मा कसा आहे ते ओळखून त्या प्रत्येक आत्म्यावर दयाच करतील आणि दया हे तर संतांचे अध्यात्मदृष्ट्या मोठे भांडवलच आहे. यावरच अध्यात्म हे आधारलेले आहे. आत्म्याचे रक्षण याचे नावच दया. 'दया तिचे नाव भूताचे पालन। आणिक निर्दळण कंटकाचे ।।१।।' कामक्रोधादि कंटकांचे निर्दळण हीच भूतदया हे ज्यामुळे जाणता येते तेच भूताचे रक्षण होय. श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात, 'तरी हे काम क्रोधू पाही । जयाते कृपेची साठवण नाही । हे कृतांताचे ठायी । मानिजती।।१।।' काम क्रोधाचे जवळ कृपा हा शब्दच नाही. विध्वंसकच ज्यांचे कार्य आहे, त्याना दूर केले तर त्याचे नावच भूतदया. भूत काय आहे हे जाणून त्यावर दया करणे हेच यातील खरे वर्म आहे.

असा जो कोणी भूतदया ठेवतो त्याला या जगात खरे काही कमीच नाही. किंबहुना परमार्थातील हेच एक पहिले साधन आहे. श्रीतुकाराममहाराज

म्हणतात, 'भूतदया ठेवी तया काय उणे । प्रथम साधन हेचि असे।।' ज्याने भूतमात्रावर दया केली तेथे काय म्हणजे शरीर, हे उणे म्हणजे, वजा होते. श्रीतुकाराममहाराज यांनी आणि एके ठिकाणी असेच म्हटले आहे, 'तुका म्हणे तेथे सुखा काय उणे । राहे समाधाने चित्ताचिया।।' श्रीज्ञानेश्वरमाऊलीचे पायाजवळ गेल्यानंतर ते सुख मिळवताना काय म्हणजे देहभाव हा उणाच होतो. तो रहातच नाही. मग चित्तच समाधानाला येते. असेच श्रीतुकाराममहाराज येथेही तिसऱ्या कडव्यात विशिष्ट वर्मच सांगत आहेत. आत्म्याला पुन: पुन: गर्भवासाला येणे भाग पाडणे ही आत्महत्या असून तो पुन: गर्भवासाला येणार नाही अशी व्यवस्था देहाला विसरून, कंटकाना बाजूला सारून, आत्मा कोण आहे हे जाणून त्यावर प्रेम करतो, दया ठेवतो, आपले चारित्र्य विशुद्ध राखतो, ते खरे सर्वश्रेष्ठ असे पहिल्या दर्जाचे साधनच आहे.

या साधनाचे महत्व सांगताना या अभंगाचे शेवटच्या कडव्यात श्रीतुकाराममहाराज सांगतात, 'असे जे साधन जया चित्ती वसे । मायाजाळ नासे तुका म्हणे।।४।।'

अशा प्रकारचे हे भूतदयेचे उत्कृष्ट साधन ज्याचे चित्तात पूर्णपणे ठसून राहिले आहे त्याने मायाजाळ हे उरणारच नाही. आत्मा पहात तो आत्मरूपच होणार हे त्याचे महत्व आहे. 'अवकाश महातेजी। अलक्ष मुद्रा लागली सहजी। स्वरूपी मिळाला जीऊजी । सद्गुरु कृपे ।।१।।' गगनाचा गाभा जो परमात्मा पांडुरंग, त्याचे महान् प्रकाशात सहजत्त्वाने अलक्ष मुद्रा लागल्याने जीव हा गुरुकृपेने स्वरूपाकारच होतो, असे श्रीज्ञानेश्वरमहाराज यांनी 'श्रीज्ञानदेव तेहत्तीशी' या ग्रंथात म्हटले आहे. परपार झाला, स्वरूपाकार झाला याचा अर्थच असा की तेथे माया उरलीच नाही. हे कसे तेच आता श्रीतुकाराममहाराज पुढील अभंगात सांगणार आहेत. ते आपणही पुढेच पाहू.

***



## अभंग ९ वा

**मायाजाळ नासे या नामेकरूनी । प्रीती चक्रपाणी असो द्यावी ।।१।।**
**असो द्यावी प्रीती साधूंचे पायासी । कदा कीर्तनासी सोडू नये ।।२।।**
**सोडू नये कीर्तन पुराणश्रवण । मनन निजध्यासन साक्षात्कार ।।३।।**
**साक्षात्कार झालीया सहज समाधी । तुका म्हणे उपाधी गेली त्याची।।४।।**

मायाजाळ हे मोठे विलक्षण आहे. मा म्हणजे काही नाही व या म्हणणे जाणे. कशात काही अर्थ नाही. हे उद्गार प्रत्येक माणसाच्या तोंडून केव्हा ना केव्हा निघत असतातच. कुठे गळावयाचे तर मीठाच्या डेऱ्यावर, आमच्या हातचे मीठ अळणी, घरोघर मातीच्या चुली, दिव्याखाली अंधार, कुठेही गेलेतरी गुडघाभर पाणी या पद्धतीने आपले विचार प्रसंगोपात व्यक्त होत असतात. कितीही खा जीभ पुन: कोरडीच, कितीही पहा डोळ्यांना ते अपुरेच पडेल, कितीही कमवा मिळवा ते पुरे पडतच नाही. मनुष्य हा क्षणभर सुखी होतो, जावत्काळ तावत्काळ. खऱ्या अर्थाने नव्हे. बरोबर तर काहीच नेता येत नाही. कितीही मिळाले तरी पुढे काय ? आणि जे मिळाले ते कुठे पोचले काही पत्ता लागत नाही, तरी देवाण घेवाण आणि व्यवहार हा प्रत्यक्ष तर सुटतच नाही. आणि यातूनही शेवटी खरे काय व आपल्या बरोबर येणारे काय ? हा प्रश्न रहातोच व त्याचे उत्तर नेमके ज्ञात झाले तर जे उरले ते मायाजाळ, हे अगदी स्पष्ट होते. म्हणजे शेवटी असे निष्पन्न होते. दृश्यापेक्षा खरे काही वेगळेच आहे. ते आहे त्याला धरूनच मग दृश्य पहाता येते व ते पहात असताना ज्याने दृश्य पहाता येते ते दृश्य नव्हे, दृश्यापेक्षा वेगळेच आहे, हे तितकेच प्रतीत होते. म्हणजे हे ज्याला प्रतीत होते ते खरे व जे प्रतीत होते ते दृश्य. जे आज आहे आणि उद्या नाही ही जी माया आणि तिचा जो एक वैचारिक पाश, हे जे मायाजाळ ते या नामाने नाहीसे होते, असे येथे श्रीतुकाराममहाराज यांना म्हणावयाचे आहे. हे शरीर माझे आहे असे म्हणत

त्याला चिकटलेले ते माझे असे होत हे एक जाळेच गुंफले व त्यात जीव सापडला, हे मायाजाळ. जे माझे ते मला शिवले आहे असेही नाही किंवा शरीर देखील आपल्याला तसे चिकटलेले नाही. तेही आपल्यास शेवटी सोडूनच जाणारे आहे. म्हणजे मग झाले असे काय राहिले ? हे जरी झाले तरी आहे तोवर त्याचा पूर्ण उपभोग घ्यावा हा जी एक जीवाची सहज प्रवृत्ती. हे मायाजाळ या नामाने नाहीसे होते. आता येथे या नामाने म्हणणेचे प्रयोजन काय? हेच मुख्यत: पाहिले पाहिजे.

**या रामनामे पातकी पतीत । जीव असंख्यात उद्धरीले ।।**

या ठिकाणी श्रीनाथमहाराजांनी 'या रामनामे', असे जे म्हटले आहे ते कोणत्या अर्थाने असा येथे प्रश्न आहे. हाच आशय श्रीसमर्थानी एका श्लोकात प्रकट केला आहे. ते म्हणतात, 'बहू नाम या रामानामी तुळेना । अभाग्य नरा पामरा हे कळेना ।। विषा औषधा घेतले पार्वतीशे । जीवा मानवा किंकरा कोण पुसे ।।१।।' बहू नाम या रामनामाशी तुळत नाही असे येथे श्रीसमर्थांना म्हणावयाचे आहे. अनेक असे सर्व ढंगांनी विश्व भरले आहे. नाना रूपांनी गोचर होत आहे. ही जी अनेकांची अनेक नामे, ती ज्या चैतन्यामुळे वैचारिक पातळीवर वापरली जातात, ते जे चैतन्य नाम आहे, जे चैतन्य मात्र सर्वच सारखेच आहे आणि त्यातून ध्वनीत होणारे स्वयंसिद्ध नाम एकच आहे. या रामनामाशी इतरांची तुलनाच करणा येणार नाही. चैतन्याचा ध्वनी घुमतो आहे तोपर्यंतच दृश्यरूपाचे व ज्या नामाने ते ओळखले जाते त्या नामाचे अस्तित्व संभवते. चैतन्य ध्वनी लुप्त झाला की ते गोचर होणारे रूप व ज्या नावे ते ओळखले होते ते नाम दोन्हीही रहात नाहीत. हे तर सूर्यप्रकाशाएवढे सत्य आहे. ज्यात काही राम आहे त्यात काही राम आहे हेच शेवटी खरे आहे. अर्थात हे जे रामनाम आहे, ते सर्वश्रेष्ठ आहे येथे दुमत होणारच नाही. या रामनामाने असंख्यात प्राण्यांचा उद्धार झाला. तरी जो अभागी आहे तो दृश्य नामरूपावरच झुलत रहातो. त्याला हे नाम कळतच नाही. हे नाम जर गुरूकृपेने घेता आले तर त्याचे कामक्रोधच नाहीसे होतात. मग तेथे मायाजाळ राहीलच



कोठून ? 'राम म्हणता काम क्रोधाचे दहन' या श्रीतुकाराममहाराजांच्या उक्तीप्रमाणे काम क्रोधाचे दहन, एक जीवनाचे सूत्र जाणल्यानेच होते व तेच खरेखुरे रामनामाचे स्वरूप आहे. ध्वनी आहे म्हणून नाम आहे व प्रकाश आहे म्हणून रूप आहे. ज्यामुळे बाह्य आकाराला व नामाला महत्त्व येते असे जे नाम त्याला अनुसरूनच 'या नामे करोनी' असे श्रीतुकाराममहाराज यांनी म्हटले आहे. श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात, 'एथ एकचि लीला तरले । जे सर्व भावे माते भजले । तया ऐलीच थडीये सरले । मायाजाळ ।।१।।' किंवा 'जे मरणाचिया ऐलिकडे । मज मिळोनी गेले पुढे । ते मरणी आणिकीकडे । जातील केवी ।।' मला वाटते या दोन ओव्यांचा विचार करता मला येथे काय म्हणावयाचे आहे ते स्पष्ट होत आहे. आता एक आहे या नामाने मायाजाळ नाहीसे होते, या दृष्टीने हे नाम आकलन होणे जरूर आहे. आणि हे तर आपल्या जीवनाचेच सूत्र आहे पण सूत्र आत आणि आपण बाहेर असल्याने त्या सूत्राची ओळख होणे हेही कठीणच जाते. म्हणून लगेच पुढे याच कडव्यात श्रीतुकाराम महाराज म्हणतात, 'प्रीती चक्रपाणि असो द्यावी ।।१।।' या नामाचे महत्त्व जाणून घेणेसाठी आपले प्रेम चक्रपाणिवर सतत पाहिजे आहे. जे प्रेम गटारगंगा वहात चालले आहे, ते एका ठिकाणी केंद्रित झाले पाहिजे. आता 'चक्रपाणिवर' प्रेम करावे तर चक्रपाणि आधी पाहिला आहे कुणी, हा प्रश्न येतो आणि तो जर पाहिलाच नाही तर त्यावर प्रेम करायचे म्हणजे काय ? हाही प्रश्न उभा राहतो. ज्याच्या हातात चक्र आहे तो चक्रपाणि असा येथे बहुव्रिही समास न धरता चक्राचक्रातून ज्याची अनुभूती येते असे जे चैतन्यस्वरूप तोच चक्रपाणि आपण जाणून घेतला पाहिजे. 'सोऽहं सोऽहं चौदा चक्रे दावी अनुहात' असे श्रीगहिनीनाथ म्हणतात, पिंडात सात व ब्रह्माडांत सात अशी चौदा चक्रे असून त्यातून सतत सोहंध्वनी निनादीत होत आहे. हा जो सोहंस्वरूप चक्रपाणी हा जाणून त्याचेवर प्रेम करणे हे आवश्यक आहे. येथे प्रीती जडली तर नामाचे अनुसंधान रहाते व या रामनामाने मायाजाळ नाहीसे होते, असे श्रीतुकाराममहाराज यांना येथे सांगावयाचे आहे.

अहो हे सारे बोलून झाले, पण चक्रपाणि तरी आम्हाला लगेच थोडाच सापडणार आहे. बरे सापडला तर त्यावर प्रेम करायचे म्हणजे तरी काय करावयाचे हे तरी सांगा, असे कोणी म्हणेल तर जेथे आपले प्रेम आहे तेथे लक्ष ठेवा असे सांगावे लागत नाही आणि जेथे लक्ष आहे तेथे प्रेम आहे, तेथेही संशय रहात नाही. सोहं स्वरूपी लक्ष लागले तर त्यातूनच नामानुसंधान सहज साधते. पण हे तरी कसे शक्य आहे ? यावर श्रीतुकाराममहाराज म्हणतात, 'असो द्यावी प्रीती साधूचे पायासी । कदा कीर्तनासी सोडू नये ।।२।।'

ज्या साधूनी चक्रपाणि प्रत्यक्ष पाहिला आहे, अशा साधूवर जरी प्रेम केले तरी ही गोष्ट निश्चित साधणार आहे. आमचे श्रीचिमडचेमहाराज म्हणतात, 'धन्य हा रघुनाथप्रिय साधू । सद्गुरुवचने करी बोधू । करी कृपा हीन। दीनावरी बाप । हरूनीया भयभयांतक ताप ।।१।।' श्रीरघुनाथप्रिय साधुमहाराज, चिमड यांचा अधिकारच विलक्षण होता. प्रत्यक्ष देव दाखविण्याचे सामर्थ्य त्यांच्यात होते. श्रीचिमडचेमहाराज म्हणतात, 'असा सद्गुरू तो मला कोणी दावा । जगी दृष्टीला दावि जो देव देवा । प्रसादेची जो हीनदीनासी तारी । असा तो जगी दाखवा ब्रह्मचारी।।१।।' यावरून साधूचे महत्व ध्यानी येईल. 'जो जनामध्ये वागे । परी जगावेगळी गोष्टी सांगे ।। ज्याचे अंतरी ज्ञान जागे । तोचि साधू।।१।।' साधूचे स्वरूप सांगताना श्रीसमर्थ म्हणतात, जगात रहात असूनही जगावेगळे जो बोलतो, वागताना जनासारखाच वागतो पण ज्यांच्या अंतरात ज्ञान जागृत असते तो साधू. ज्ञानाने जागृती होणे आणि ज्ञानच जागृत रहाणे या गोष्टी भिन्न आहेत. जेथे ज्ञानच जागृत आहे, धगधगीत चैतन्य आहे, प्रकाशामुळे अंधार जेथे अस्तित्वच धरत नाही असा महात्माच साधू.

आता मौज अशी आहे या साधूचे पायाशी प्रेम करावयाचे म्हणजे काय व तसे आमचे प्रेम आहेही. मग आम्हाला अनुभव का येऊ नये ? हा प्रश्नच आहे. नुसते कोरडे प्रेम काय करावयाचे ? साधूला जे प्रिय ते आपल्याला प्रिय झाले तर मग ते खरे प्रेम झाले. ज्याला जे आवडते ते केले तरच त्याचे प्रेम



किंवा कृपा संपादन करता येते. श्रीब्रह्मचैतन्यमहाराज यांचे आम्ही अनुयायी आणि हातात जपाची माळही नाही. मग त्याचा काय उपयोग ? भगवान श्रीसद्गुरू श्रीनिरंबगीकरमहाराज यांचे आम्ही सांप्रदायिक आणि झोपतानाच डोळे मिटतो, याला काय अर्थ आहे ? माळकरी आणि माळ तुटली तरी, वारकरी आणि वारी केव्हा तरी करी, टाळकरी आणि टाळाटाळ करी याला अर्थच नाही. भगवान श्रीसद्गुरू श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस यांचेवर आमची अनन्य निष्ठा आहे. आमची ती प.पू.श्रीमामा केळकर यांचेवर दृढ श्रध्दा आहे आणि आम्ही कीर्तन कधी कधी ऐकतो, याला किंमत आहे? ज्या महात्म्यांचा अवतारच मुळी भगवंताचे नामसंकीर्तनाकरता, त्यांना ते कीर्तन जर आपण केले तर ती खरी साधूची प्रीती होईल आणि साधूची जर कृपा झाली तर ईश्वरी साक्षात्काराने मायाजाळ नाहीसे होईल. आणि म्हणूनच श्रीतुकाराममहाराज म्हणतात, 'असो द्यावी प्रीती साधूंचे पायासी । कदा कीर्तनासी सोडू नये ।।२।।'

श्रीतुकाराममहाराज यांनी उभे आयुष्य कीर्तनातच घालविले. श्रीतुकाराममहाराज म्हणतात, 'तुका उतरला तुकी । नवल झाले तिही लोकी ।।, नित्य करी तो कीर्तन । हेचि माझे अनुष्ठान ।।, तुका बैसला विमानी । संत पाहता लोचनी।।, रामकृष्ण विठ्ठल बोला । तुका जातो वैकुंठाला ।।' श्रीतुकाराममहाराज हे भागवत धर्माचे कळस झाले. त्यांनी जे केले तेच जगाला सांगितले. 'साता दिवसाचा झाला उपवासी । तरी कीर्तनासी सोडू नये ।।' ही महात्म्याची जीवननिष्ठा ते श्रीतुकाराममहाराज म्हणतात, 'कदा किर्तनासी सोडू नये' या किर्तनावरचे आपले प्रेम, तेच खरे साधूवरचे प्रेम आहे. साक्षात्काराचे खरेखुरे वर्म यातच साठविले आहे. यादृष्टीने श्रीतुकाराममहाराज हे पुढे सांगत आहेत.

'सोडू नये कीर्तन पुराण श्रवण । मनन निदिध्यासन साक्षात्कार ।।३।।' कीर्तन पुराण श्रवण मनन निदिध्यास हे सारे म्हणजे साक्षात्कार. अन्न खाल्ले तरी ते पचले पाहिजे. त्याचे रक्त बनून शक्तीत रूपांतर झालेच तरच ते आत्मसात

झाले असे म्हणता येते. तसेच या ठिकाणी आहे. ‘श्रवणाचा झाला विज्ञान डोहो’ अशीच येथे अवस्था आहे. ‘श्रवणी पेरले नयनी उगवले’ अशी येथे अनुभूती आहे. आणि असे झाले तर त्याचा परिणाम तर फारच मोठा आहे. ‘श्रवणी पेरले नयनी उगविले नानारूपे जसे । जिकडे पहावे तिकडे अवघे ब्रह्मची भरले असे ।।’ श्रीकेशवस्वामी म्हणतात, जिकडे पहावे तिकडे ब्रह्म. ‘तरी कीर्तनाचेनि नटनाचे’ या श्रीज्ञानेश्वर माऊलीच्या उक्तीप्रमाणे नट नाम परमात्म्याचा देहामध्ये होणारा नाच हेच कीर्तन असून त्याचे श्रवण मनन निजध्यासपूर्वक झाले तर ‘सर्व खल्विदं ब्रह्म’ असे होऊन, माया ही माया म्हणून कोणी निराळी राहतच नाही. मग मायाजाळ उरणारच कोठून?

शेवटच्या कडव्यात श्रीतुकाराममहाराज म्हणतात, ‘साक्षात्कार झालीया सहज समाधी । तुका म्हणे उपाधी गेली त्याची ।।४।।’ ‘गुप्त ना प्रगट आहे हा साक्षात । लक्षीता प्रचित वेडावली ।।’ या श्रीनिवृत्तीनाथांच्या उक्तीप्रमाणे गुप्त वा प्रगट या सापेक्षापलिकडे जी वस्तू साक्षात्, स्वयंसिद्ध, स्वयंपूर्ण, स्वयंचलित, स्वसंवेद्य, स्वानुभव देणारी आहे, तो आकार जर जीवाला प्राप्त झाला आणि जीव हा परमात्मरूपच झाला तर त्या निर्गुण स्वरूपाचे ठिकाणी त्याला सहज समाधी प्राप्त होते आणि तेथे कोणतीही उपाधी शिल्लकच रहात नाही. श्रीमुक्ताबाई म्हणतात, ‘सहज समाधी लागली निर्गुणी । खुंटलीसे वाणी बोलवेना ।।’ चार वाचेच्या पलिकडे सकार आणि हकार जेथे जन्माला येतात त्या निर्गुण स्वरूपाचे ठिकाणी, ही सहज समाधी अवस्था प्राप्त होते. सहज म्हणजे मुद्दाम नव्हे ते. कोणताही हेतू तर नाही, वाऱ्यासारखी सहजावस्था. तेथे होणारा परमोच्च आनंद ही समाधी. या ठिकाणी उपाधी राहीलच कशी ? आणि म्हणूनच श्रीतुकाराममहाराज शेवटी म्हणतात, ‘‘तुका म्हणे उपाधी गेली त्यांची ।।’’

***



## अभंग १० वा

**गेली त्याची जाणा तोचि ब्रह्म झाला । अंतरी निवाला पूर्णपणे ।।१।।**
**पूर्णपणे धाला रहातो कैशा रीती । त्याची आता स्थिती सांगतो मी।।२।।**
**सांगतो मी तुम्हा ऐका मनोगत । राहतो मुर्खवत जगामाजी ।।३।।**
**जगांत पिशाच्च अंतरी शहाणा । सदा ब्रह्मी जाणा निमग्न तो ।।४।।**
**निमग्न तो सदा जैसा मकरंद । अंतर्बाह्य भेद वेगळाले ।।५।।**
**वेगळाले भेद क्लृप्ती त्या असती । हृद्‌गद त्याची गती न कळे कवणा।।६।।**
**न कळे कवणाला तयाचे ते वर्म । योगी जाणे मर्म खूण त्याची ।।७।।**
**खूण त्याची जाणे जे का तैसे असती । तुका म्हणे भ्रांती दुजियाला।।८।।**

ज्याची कल्पनेची उपाधी गेली तोच ब्रह्म असून पूर्णत्वाने तो अंतरात थंड होतो. श्रीसमर्थ म्हणतात, ‘निर्विकल्पासी कल्पावे । कल्पना मोडे स्वभावे। एथ कल्पनेच्या नावे । शून्याकार ।।१।।’ निर्विकल्पाची कल्पना करता करता काट्याने काटा काढावा, त्याप्रमाणे कल्पना ही स्व चा भाव जागृत झाल्याने नाहिशी होते. आणि कल्पनाही शून्याकार होऊन बसते. तिचे अस्तित्त्वच रहात नाही. ज्याला खरेपणा नाही किंवा अस्तित्त्व नाही, त्यालाच कल्पना म्हणतात आणि कल्पनेने जे अस्तित्वातच नाही त्याला खरेपणा येतो व या योगाने खऱ्याबद्दलच भ्रांती निर्माण होते. थोडक्यात म्हणजे ‘वाजे पाऊल आपुले । म्हणे मागे कोण आले ।।’ या समर्थोक्तीप्रमाणे त्या जीवाची अवस्था होते. या दृष्टीने कल्पनाच उरी कवटाळावयाची नसेल तर श्रीसमर्थांनी मनाचे श्लोकांत, ‘तया निर्विकल्पासी कल्पीत जावे’ असेच सांगितले आहे. उरी बाळगलेली कल्पना ही देहबंधातून निर्माण होते आणि ती जीवाची दुर्दशा करते. दशा म्हणजे अवस्था. दूरावस्था ही दुर्दशा जीवाला चैतन्यापासून दूर लोटत असते. म्हणून देहजनित संकल्प हाच आपल्याला विघातक आहे. देह

म्हणजेच मूर्तीमंत पाप. दु:खांचे बीज हा देहभाव आहे. म्हणून जीवाला दु:ख हे अटळच रहाते. या दृष्टीने पाप संकल्पातून कल्पना, त्यातून विकार आणि त्या मागोमाग दु:ख व त्यातील तीव्रता कमी झाली तर सुखाभास आणि सुख आहे, या समजुतीने पुन: त्या विषयांचे मागे लागण्याचाच जीवाचा अट्टाहास, हे चक्र कोठे संपतच नाही आणि हे रहाटगाडगे सारखे फिरतच रहाते. एवढ्यासाठी श्रीसमर्थ मनाचे श्लोकात तळमळीने मनाला बोध करतात. ते म्हणतात, 'मना पापसंकल्प सोडोनी द्यावा । मना सत्यसंकल्प जीवी धरावा । मना कल्पना ते नको विषयांची । विकारे घडे हो जनी सर्व छी छी ।।१।।' देह म्हणजे पाप, देह म्हणजे मी. हा जो तेथे उठणारा संकल्प, म्हणजेच पापसंकल्प, 'संकल्पाही वरी न ये मन' ही जी श्रीतुकोक्ती आहे हा परमार्थ. याप्रमाणे संकल्प म्हणजेच पाप. कारण संकल्प हे मनाचे गढूळ रूप आहे. यासाठी 'मन: संकल्प शुद्ध पै नोहे' हे श्रीचांगदेव म्हणतात. संकल्पातून उठणारा विकल्प हा कार्याचा नाश करतो. येथे कार्यानुभव येत नाही. संकल्प आणि विकल्प या मनाच्या दोन बाजू आहेत. हे दोन्ही मिळून मन, असे श्रीशंकराचार्य म्हणतात. 'संकल्पविकल्पात्मकं मन:।' अशीच त्यानी व्याख्या केली आहे. हा जर पापसंकल्प सुटला तर उरला तो सत्यसंकल्प, जीवाने जीव आहे तोपर्यंत दृढ धरावयाचा आहे. असे झाले तर विषयांच्या कल्पना किंवा कल्पनेने दृढ केलेले विषय हे तेथे त्या जीवास सतावत नाहीत. आणि मग तेथे छी छी होण्याचे कारणच रहात नाही. 'हे विषय जयाते नाकळिती । तया सुखदु:खे दोन्ही न पवती । आणि गर्भवासु संगती । नाही तया ।।' हे जे श्रीज्ञानेश्वरमहाराज यांनी सांगितले आहे ते या करताच सांगितले आहे, असे आपणांस दिसून येईल.

नि:संकल्प का एकदा जीव झाला की तो नि:संकोचपणे निर्विकल्प होतो आणि त्या अवस्थेत पहाता पहाता समाधीस्थितीचा, आत्मसुखाचा लाभ त्यास अनाहुतपणे घडतो. 'निर्विकल्प पाहे समाधी ते' अशी श्रीतुकोपनिषदाप्रमाणे त्यास अनुभूती येते. म्हणून आपण देह नाही, चैतन्य



आहोत, देहाचे गुलाम नसून त्याचे स्वामी चैतन्यरूप आहो, हेच अंतर्यामी बिंबून जाते. वेणाबाईना श्रीसमर्थांनी अनुग्रह केला. तो त्यांची अशी अवस्था झाली. त्या म्हणतात, 'अहं ब्रह्म उपदेशिले । निर्विकल्पी रत केले ।।' श्रीसमर्थानी अहंब्रह्माचा उपदेश करूनच संकल्प आणि विकल्प मावळून निर्विकल्प स्वरूपाशी ऐक्य झाले आणि तेथे विज्ञानही शिलकीला राहिले नाही. 'वेणीस्वामी अवघा भरला । विज्ञानासी अंत झाला ।।' अशी एक अनुपमेय स्थिती प्राप्त झाली. यामुळे देहोपाधी लयाला गेल्यावर, कल्पना विरल्यावर तो जीव ब्रह्मच झाला. देवादिकानी त्यास लोटांगण घालावे असा अधिकार निर्माण झाला. श्रीकेशवस्वामी म्हणतात, 'स्वयं ब्रह्म जो आपणचि झाला । देव मस्तकी वंदिती त्याला ।।१।। ब्रह्म होऊनी ब्रह्मीच खेळे । केशव त्याच्या चरणी लोळे।।२।।' 'शिवोभूत्वा शिवं जयेत्' शिव होऊनच शिवाची अखंड पूजा चालू झाली. हा आनंदच शब्दातीत आहे. याप्रमाणे तो अंतर्यामी पूर्णपणे निवाला. आता त्याला कोणता ताप, ताप देऊ शकेल ? असा प्रश्न आहे. तो तापलेल्यालाही थंड करील असा थंडच होऊन राहिला. यापेक्षा काय सांगावे ? श्रीसमर्थ यादृष्टीने एक मोठ्यातले मोठे उदाहरण देऊन हा विषय स्पष्ट करतात.

'विठोने शिरी वाहिला देवराणा । तया अंतरी ध्यास रे त्यास नेणा । निवाला स्वये तापसी चंद्रमौळी । जीवा सोडवी राम हा अंतकाळी ।।१।।' परमात्मा पांडुरंगाने ज्यास मस्तकी धारण केले, त्यास त्याचा ध्यास लागून राहिला, त्यास तुम्ही जाणत नाही काय ? अरे अशा भगवान शंकराचा विषाने होणारा दाह ज्या नामाने थंड झाला, त्याचे महत्व कोणत्या प्रकारे विषद करता येईल ? श्रीतुकाराममहाराज म्हणतात, 'शिव हालाहले तापला । तोही नामे शीतळ झाला।।'श्रीपांडुरंगमहाराज ताम्हनकर म्हणतात, 'प्याला शंकर विषय हळहळ । शांत झाला जाऊनी तळमळ।।' शंकराचे आत नामाशिवाय दुसरे आहेच काय ? आमचे तीर्थरूप प.पू. श्रीमामा केळकर म्हणतात, 'शिवाचे

अंतरी रामनाम आहे । वाचे पैल जाये तरीच कळे ।।' शिवाचे अंतरी असणारे नाम चारी वाचेचा ग्रास झाला तरच अनुभवास येते. श्रीसमर्थ म्हणतात, 'नामाचा महिमा जाणे शंकर । जना उपदेशी विश्वेश्वर । वाराणसी मुक्तीक्षेत्र। रामनामे करोनी ।।१।।' म्हणून नाम हे थंडच आहे. ते घेणाराही तसाच होतो. यादृष्टीनेच श्रीतुकाराममहाराज म्हणतात, 'नाम घेता मन निवे' तर आमचे भगवान श्रीसद्गुरु श्रीतात्यासाहेबमहाराज यांचे कीर्तनात एक संतोक्ती यावयाची, त्यात ते म्हणतात, 'निर्गुणरूपी मिळाला । जन पावन झाला ।।धृ.।। बहू काळ आला गेला । सज्जनसंगे निवाला ।।१।।' निर्गुण रूपात जे मिसळून गेले ते पावन झाले. अनंत काळ त्यातूनच आले व त्यातच मिळून गेले. सज्जनांचे संगतीत ते वेगळे राहिलेच नाहीत.

परमार्थात परिपूर्णत्त्व संपादन केल्याने हे महात्मे आत्मतृप्तच झाले. उद्या कोणीही म्हणेल, मी या अवस्थेला आलो आहे, तर तसे नाही. यालाही काही ताळा आहे. यावरून पडताळून या गोष्टी समजू शकतात. म्हणून श्रीतुकाराममहाराज या अभंगाच्या दुसऱ्या कडव्यात सांगतात, 'पूर्णपणे धाला रहातो कैशा रीती । त्याची आता स्थिती सांगतो मी ।।२।।' येथे मन पूर्णत: तृप्त झाले. आत्मारामाची अनुभूती हृदयाकाशात आली की मन हे तृप्त होते. 'हृदेशोऽर्जुन तिष्ठति।' असे खुद्द भगवंतानीच सांगून ठेवले आहे. 'मन हे धाले मन हे धाले । आत्माराम हृदयी आले।।' श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी या दृष्टीनेच म्हटले. श्रीतुकाराममहाराज यांनी आपले अगदी मनीची गोष्ट तिसऱ्या कडव्यात सांगून आपल्यास येथे नेमके काय म्हणावयाचे आहे त्याचा खुलासा केला आहे. ते म्हणतात, 'सांगतो मी तुम्हा ऐका मनोगत । रहातो मूर्खवत जगांमाजी ।।३।।' असा जो महात्मा तो जगामध्ये आपल्याला कोणी ओळखू नये, आपला परमार्थ कोणाला उघड रीतीने कळू नये, साऱ्यानाच याचे महत्व असते असे नाही म्हणून तो परमार्थ हा गुप्त राखण्याकरता मूर्खासारखाच वागतो. कारण ज्याला या गोष्टी करावयाच्या नाहीत त्याला सांगूनही उपयोग



नाही. व ज्याना हेच जीवीत कार्य करावयाचे आहे त्याना फार सांगावेही लागत नाही. खऱ्या गोष्टी सांगणाऱ्या संताना, तत्वज्ञान्याना, फार काय शास्त्रज्ञानादेखील जगाने खुळ्यात काढले आहे. मग आपले तरी काय ? हाच विचार साधूच्या मनात बळावतो व 'अति लगट तयाला प्रगट' या संतोक्तीप्रमाणे कोणी अंतरातच शिरून पाहू लागला तर त्यालाच हा महात्मा आपल्या आत्मज्ञानाचा दरवाजा उघडा करून त्याचे हाती आपले भांडार देतो. तो जगात जरी वेडा वाटला तरी आत मात्र तो पूर्ण ज्ञानी असतो आणि हे ज्ञान त्याला तो ब्रह्माशी निमग्न झाल्यानेच प्राप्त झालेले असते. म्हणून श्रीतुकाराममहाराज या अभंगाच्या चौथ्या कडव्यात सांगतात, 'जगात पिशाच्च अंतरी शहाणा । सदा ब्रह्मी जाणा निमग्न तो ।।४।।' 'सदा स्वरूपानुसंधान । हेचि साधूचे लक्षण।।' असे समर्थानी म्हटले आहे. सदा ब्रह्माशी निमग्न झाल्याने तेथे देहाचे अनुसंधान रहात नाही. यामुळे देहाशी असंबद्धपणा हाच त्यांचा वेडेपणा जगाला वाटतो व या दृष्टीने जग त्यांचेकडे पाहू लागते. हे वेडे जगाला वेड लावतील असे असतात पण याचा उमज शहाण्यानाही होत नाही. श्रीभीमानंदमहाराज म्हणून एक श्रीरामानंदमहाराज खटावकर या लिंगायत साधूंचे वडीलबंधू अधिकारी पुरूष होऊन गेले. ते म्हणतात, 'आम्ही वेडे आम्ही वेडे । जीवशिवा पलिकडे ।।१।।' आम्ही वेडे आहोत पण जीवा शिवा पलीकडे पोहोचलो आहोत. एका बाजूला लक्ष गेले की दुसरीकडे दुर्लक्ष झाले हा सिद्धांतच आहे. असेच येथे काही होत असते. तेथे ब्रह्माशी सदा निमग्न होणे हेच खरे महत्वाचे आहे. ब्रह्म हे जर सदा आहे तर तेथे निमग्न कदा होऊन कसे चालेल हाही प्रश्नच आहे. परमार्थात सदाचे फार मोठे महत्व आहे. श्रीसमर्थ म्हणतात, 'सदा देव काजी झिजे देह ज्याचा । सदा रामनाने वदे नित्य वाचा । स्वधर्मेचि चाले सदा उत्तमाचा । जगी धन्य तो दास सर्वोत्तमाचा ।।' येथे देव कसा तर सदा. म्हणून सदा त्याचे कार्यास देह झिजणे हे महत्वाचे आहे. रामनाम सदा म्हणून ते नित्यवाचेमध्ये रहाणे हे अगत्याचे आहे. जो स्वधर्मे सदा चालतो त्यासारखा पुरूष नाही. कारण स्व चा जो धर्म आहे तो सदाच आहे.

असा जो सर्वोत्तमाचा दास आहे तो जगामध्ये धन्य आहे. या सर्व दृष्टीने जो महात्मा सदा ब्रह्मी निमग्न आहे हीच त्याचे मोठेपणाची खरी साक्ष आहे. श्रीअंबूरावमहाराज हे श्रीभाऊरावमहाराज यांचे परमशिष्य, नित्यनेमाने नऊ तास नेम करणारे थोर अधिकारी पुरूष होऊन गेले. ते दासबोधावर उत्कृष्ट प्रवचन करीत. त्रिकाळ नेम, त्रिकाळ पोथी व भजन असा त्यांचा दिनक्रम चाले. एकदा त्याना एकाने प्रश्न केले, 'सदा ब्रह्मी जाणा निमग्न तो' म्हणजे काय? कारण साधनांत निमग्न होणे हे तर मोठे कठीण होते, मग निमग्न व्हावे कसे ? हे तरी सांगा. त्यावर श्रीअंबुरावमहाराज म्हणाले, अरे निंबरगीकरमहाराज जसे मग्न झाले तसे होणे म्हणजे निमग्न होणे. अशा प्रकारे ब्रह्माशी निमग्न होणे हेच खरे महत्वाचे आहे. मग त्या साधकाला या चरणाचा खऱ्या अर्थाने बोध झाला व श्रीअंबुरावमहाराज यांना शरण आला. या दृष्टीने येथे श्रीतुकाराममहाराज म्हणतात, 'सदा ब्रह्मी जाणा निमग्न तो' अर्थात् श्रीतुकाराममहाराज याना नेमके काय म्हणावयाचे आहे तेच त्यानी या अभंगाच्या पाचव्या कडव्यात सांगितले आहे. ते म्हणतात, 'निमग्न तो सदा जैसा मकरंद । अंतर्बाह्य भेद वेगळाले ।।'

असा जो महात्मा आहे तो चैतन्यरूपाशी सदाच निमग्न झालेला असतो व तो सर्वांतून वेगळा असल्याने आंत आणि बाहेर जे कांही आहे त्यातील भेद त्याला जाणवतो. 'सर्वं ब्रह्म ते नि:शब्द । भेदा भेद चिदानंद।।' ये यातील खरे इंगीत आहे. सर्व हा शब्द खरा ब्रह्माला आहे. 'सर्वं खल्विदं ब्रह्म' असे श्रुतिचे वचन आहे. ब्रह्म हे सर्वव्यापी असल्याने ते नि:शब्द आहे. त्रिपुटीचा जेथे निरास होतो तेथे शब्द रहाणारच कसा ? या ब्रह्माचे ठिकाणी जे चैतन्य आहे ते प्रवाही असल्याने तेथे शब्द निर्माण झाला. शब्द हा गुण आकाशाचा आहे. त्यातून दृश्य निर्माण झाले. आकाशातून ते निर्माण झाले. आकाश म्हणजे काही नाही. काही नाहीतून जे निर्माण झाले ते शेवटी काही नाही असे होते. आणि त्याचा गुण शब्द असलेने त्याचे वर्णन शब्दाने होते. या शब्दाचा ग्रास



झाला की तेथे आकाशाचा लय होतो व या ऐक्याने आनंद होतो. म्हणून अभेद स्थितीत आनंद प्रतीत होतो. सर्व दृश्याचे आंत आत्मस्थिती आहे. त्याचेवरील आवरण हे दृश्य आहे. दृश्य हे बनत बनत बनल्याने त्यात अनंत भेद आहेत. पण हे ज्याठिकाणी घडले असे जे अधिष्ठान ते पूर्ण असल्याने अभेद आहे. यामुळे सर्वाचे अंतर्यामी अभेदता आणि बाह्यत: भेद असे असल्याने ज्याची आंतरीक अवस्था दृढमूल झाली त्याला बाहेरील भेद जाणवत असल्याने अभेदतेचे महत्व स्पष्ट होते व त्यातून त्याला सतत आनंद मिळत रहातो व गोड मध सेवन करावा अशा प्रमाणे ते आत्मसुखानेच केवळ आत्मतृप्त होऊन रहातो. 'एकाएकी एकाएकी । तुका लोकी निराळा ।' एकाशी ऐक्य झाल्याने जे तेथे वेगळेपण आले येथे भेदाभेद स्थितीची उकल होऊन अभेदावस्थेतच समाधान स्थिर झाले आणि द्रष्टेपणाने हे भेद पहात असताना द्रष्टेपणाच स्थिर होऊन राहिला. शरीराची हालचाल ही चैतन्याचे हालचालीप्रमाणे सहज होऊ लागली. त्यात हेतू हा राहिलाच नाही. ते जीवन निर्हेतुक झाले. 'तेचि संत तेचि संत । ज्यांचा हेत विठ्ठली।।' या श्रीनिळोबारायांचे उक्तीप्रमाणे अनुभूती आली. 'मग फावल्या त्या करू चेष्टा । नि:श्चळ द्रष्टा होवोनी ।।' हे श्रीतुकाराममहाराज सांगतात तसेच झाले. आंत आहे व ते बाहेर नाही व बाहेर आहे ते आंत नाही हे स्पष्ट झाले. आंत दृश्य नाही व बाहेर आत्मा नाही; यापेक्षा काय सांगावे ? जीवमात्राचे तादात्म्य बाहेर असल्याने त्याला आत दृश्यच प्रतीत होते, यामुळे आंत खरे काय आहे याचा त्याला पत्ताच नाही. संताना आंत काय आहे तेथेच तादात्म्य असल्याने दृश्य पहातानाही त्यांना आंत जे चैतन्य ते सर्वत्र दिसते, यामुळे दृश्य हे दिसत असूनही ते गौण होते. ज्यामुळे हे दृश्य दिसते त्यालाच येथे महत्व प्राप्त झालेले असते. त्यामुळे आत आत्मानुसंधान व बाहेर त्याच्या अनुषंगाने होणारा देहाचा व्यवहार चालतो आणि तो व्यवहारही त्याच्या आत्मानूभूतीला पूरक असाच होतो. त्यात ही चैतन्याचीच देवाण-घेवाण होत रहाते.

वेगळेपणाने भेद आणि भेदातून ही अभेदता साध्य झाल्याने भेद हा भेदाकरता नसून अभेदासाठीच आहे हे निश्चित झाल्याने, आत्मत्वाने सर्वत्र अभेदता निर्माण होते. ही एक मोठी अजब अशी क्लुप्ती आहे. गुरुकृपेनेच ही क्लुप्ती कल्पकतेने कल्पक कोण आहे हे जाणल्यावर साधता येते. परंतु हृदयाला गती ज्यामुळे आली ती गतीच कळली नाही आणि आमची गतीच जर तेथे पांगळी झाली तर तेथे ज्ञानही पांगळे होऊन विज्ञानानुभव संपादन करता येतो. आणि तेथे 'न इति न इति' हेच श्रुतीवचन जाणवते व त्याचे महत्वही लक्षात येते. म्हणून श्रीतुकाराममहाराज या अभंगाच्या सहाव्या कडव्यात म्हणतात, 'वेगळाले भेद क्लुप्ती त्या असती । हृदगद् त्याची गती न कळे कवणा ।।६।।' पुढे श्रीतुकाराममहाराज म्हणतात, 'न कळे कवणाला तयाचे ते वर्म । योगी जाणे मर्म खूण त्याची ।।७।।' आणि असे सर्व काही असल्याने यातले वर्म देहाचा अहंकार बाळगून देहबुद्धीने दृश्याशी तादात्म्य झालेल्यांचे हाती येत नाही. पण योगी म्हणजे अंतर्यामी चैतन्याशी जो कोणी एकरूप झाला, देहबंधाने जो आता वियोगी राहिला नाही, त्यालाच ही खूण गवसते व आम्ही येथे काय सांगितले हे तोच एक जाणू शकतो.

शेवटी आठव्या कडव्यात श्रीतुकाराममहाराज म्हणतात, 'खूण त्याची जाणे जे कां तैसे असती । तुका म्हणे भ्रांती दुजियाला' जे कां असे देहाभिमानी न राहता, जे तसे चैतन्याशी समरस झालेले असतात, त्यानाच ही खूण अवगत होते. हे सोडून दुजेपणांत जे आले, जे दिसते आहे त्यातच जे रंगले आणि देहानुषंगाने देहसुखासाठी जे धडपडले, ते मात्र इतके सारे सत्य आपणाजवळ असूनही भ्रांतीतच पडले आणि देव नाही-देह आहे, असेच काहीसे म्हणू लागले. देहसुखापुढे कशाची मातब्बरीही नाही असे त्यांना वाटू लागले. यामुळे दुजेपणात भ्रांती कशी आहे व भावाभावाचे ज्ञान, आहे नाहीचे भान ज्या एका भावाने होते असा जो भावयुक्त भाविक त्यालाच शेवटी शांती कशी मिळते हेच आता श्रीतुकाराममहाराज पुढील अभंगात सांगणार आहेत ते आपण पुढे पाहू.



## अभंग ११ वा

**दुजीयाला भ्रांती भाविकाला शांती।साधुंचिया वृत्ती लीन झाल्या।।१।।**
**लीन झाल्या वृत्ती ब्रह्मी ते मिळाले । जळात आटले लवण जैसे ।।२।।**
**लवण जैसे पुन्हा जळाचे बाहेरी । येत नाही खरे त्यातुनीया ।।३।।**
**त्यासारखी जाणा तुम्ही साधुवृत्ती । पुन्हा न मिळती मायाजाळी ।।४।।**
**मायाजाळ त्यांना पुन्हा रे बाधेना । सत्य सत्य जाणा तुका म्हणे ।।५।।**

दुजेपणामध्ये जीव आला की भ्रांती निर्माण होते. परंतु भाव जाणून घेणारा-भाव खाणारा नव्हे - जो भावसंपन्न भाविक आहे, त्यालाच शांती प्राप्त होते. शांती ही परमार्थातील एक अत्युच्च पदवी आहे. ही पदवी ज्यांनी संपादन केली अशा साधूंच्या वृत्ती लीनच झालेल्या असतात. चैतन्याहून त्या उर्मी वेगळ्या रहातच नाहीत, हे त्यातील खरे वर्म आहे. एकाला विसरले की दुसरे दिसू लागलेच आणि दुसरे दिसणारे जे दृश्य त्यामागे जीव लागला की, त्यातून निर्माण होणारे सुख-दुःख हे मग अटळच आहे. 'चैतन्याचा विसरू । ते हे जग।' ही ज्ञानेशोक्ती येथे चिंतनीय आहे. आपण जेव्हा दुसरे पहात असतो, तेव्हा स्वत:ला विसरलेले असतो. स्वत:ला विसरतो तेव्हाच दुसरे पहात असतो. स्वत:ला तेव्हा खऱ्या अर्थाने पहात असताना येथे दुसरे पहाताच येत नाही. दुसरे पहावयास दुसरे काही उतरच नाही. काहीतरी दुसरेच आहे हे जे आमच्या डोक्यातच आहे, तेवढेच दुसरे आहे. सर्वत्र एकच भरलेले आहे. आपण जेव्हा आपले स्व-पण विसरतो तेव्हाच दुसरे स्वप्न पहात असतो. स्व-पणाचे ज्ञान होताच तेथे दुसरे शिलकीलाच रहात नाही मग तेथे वेगळे, वेगळेपणाने पहाणारच काय ? असा प्रश्न आहे. वेगळे झाले तरच वेगळे दृश्य पहाता येते आणि दृश्यापासून वेगळे झाले तरच दृश्यावेगळे आत्मदर्शन होते. दुजेपणाने भ्रांती निर्माण होते. आहे ते नाही आणि नाही ते आहे असे होणारे विपरीत ज्ञान म्हणजेच भ्रांती. परिभ्रमणाने असे होते. बराच प्रवास करून

गाडीतून स्टेशनवर उतरले की सारे गरगर फिरत असल्याचा साक्षात्कार जीवाला होतो. पण ज्ञानी माणूस त्याला भ्रमच म्हणतो. ते खरे नव्हे. विश्वपरिभ्रमणाचा साक्षात्कार जीवाच्या जीवनात होणाऱ्या परिभ्रमणातून निवासासाठी जगाचे उंबरठ्यावर येताच घडत असतो. स्थिरत्वाने ज्ञान झाले तर हे असत्य आहे याचे ज्ञान सत्यपणाने होते, हे असत्य नव्हे हे सत्य जाणून घेणे आवश्यक आहे. 'बारा सोळा जणी हरीसी नेणती । म्हणोनी फिरती रात्रंदिवस ।' हे जीवनाचे परिभ्रमण आहे. त्यामुळे हे विश्वचक्र अव्याहत चक्रवत् चालले आहे आणि ते सत्य धरून जे जे या जगाचे उंबरठ्यावर आले ते ते चालले आहेत. याच्याच मागे ते धांवत आहेत आणि धावून, मूलभूत काय हे निष्पन्न होत नाही असाच ज्यांचा आतापर्यंतचा निष्कर्ष आहे, ते भौतिक शास्त्र. जीवनाच्या परिभ्रमणातून विश्वाच्या परिभ्रमणाचा साक्षात्कार सारेच जीव भोगत आहेत, तर त्याला असत्य म्हणणेचे धाडस कोण करणार ? तर ज्याचे जीवनांत स्थिरपणाने ज्ञान ठामपणे त्याचेसमोर उभे आहे तोच करणार. नाही तर, हे सारे सत्य आहे हेच सारे अहंकाराने म्हणत रहाणार हे उघड आहे. 'तुका म्हणे ऐसी भ्रांती । देव असता नाही म्हणती ।' यातील वर्म मागील विवेचनावरून ध्यानी येईल असा विश्वास बाळगून आहे. ही भ्रांती गुरुकृपेनेच जाईल असा निर्वाळा, 'ऐसी भ्रांती जाईल केंव्हा । गुरूकृपा होईल तेव्हा ।' या शब्दात श्रीतुकाराममहाराज यांनी दिला आहे. बरे! ही गुरूकृपा झाली तर काय होते ती अनुभूतीही, 'गुरूकृपा झाल्यावरी । ब्रह्मरूप सृष्टी सारी।' या शब्दांत व्यक्त केली आहे. येथे सृष्टी ही ब्रह्मापेक्षा वेगळी न रहाता चैतन्यरूपानेच सारे कांही चालले आहे. जड हे जडच आहे. त्याला चेतना देणारे चैतन्य आहे आणि ते चैतन्य एकच असल्याने या विविध विश्वांत चैतन्याचा येणारा खरा अनुभव लक्षणीय आहे. हे लक्षणीय होते. भ्रांतीने अहंकार निर्माण होतो. अहंकाराने साक्षात्कार हा काहीतरीच आहे असे वाटू लागते. बरे, साक्षात्कार झाला तर अहंकार टिकत नाही. अहंकाराने साक्षात्कार होत नाही यामुळे चैतन्यवाद व जडवाद या प्रकारचे दोन प्रवादच या



दोन प्रकारानी टिकून राहिले आहेत. झोपलेले झोपेचा अनुभव घेतात व जागे असलेले जागेपणाचा अनुभव घेतात हेच खरे. शेवटी आपले ध्येय आपणच ठरवायचे आणि गाठायचे व आपली आपण आपल्या ठिकाणी भेट घेऊन आत्मानंदात, आत्मानंदाने आत्मानंदी लीन व्हायचे हेच खरे. ज्याचा त्याचा प्रश्न ज्याचा त्याने सोडवावा, असाच हा एक जीवनाचा प्रश्न आहे. जीवननिष्ठा स्पष्ट होण्यासाठी आणि जीवन काय आहे हे समजून उमजण्यासाठी अध्यात्माची नितांत गरज आहे. 'भ्रांतीकी बडी नदीयाँ बिचमें । अहंकार की लाट ।' हे कबीर साहेबांचे वचन डोळ्यासमोर ठेवावे इतके ते महत्वाचे आहे. भावाभावाचे म्हणजे अस्तिभावाचे व नास्तिभावाचे ज्ञान ज्या भावामुळे होते असा जो भाव आहे, त्याने जो संपन्न आहे असा जो भावसंपन्न भाविक आहे, त्याला शांती प्राप्त होते. शांती ही एक जीवनातील उच्च, अती उंच स्तरातील एक रहस्यमय अवस्था आहे. हेच एक जीवनातील पदवी दर्शविणारे महनीय असे सूत्र आहे. कोणत्या भावाने जागेपणी या जगाचे ज्ञान होते व कोणत्या भावाने या जगाचे ज्ञान अगर आपण कोणी आहे हेही ज्ञान होत नाही ? हा प्रश्न येथे महत्वाचा आहे. जन्माला आल्यावर कोणत्या भावाने या सृष्टीची जाणीव होते आणि मेल्यावर ती कोणत्या भावाने होत नाही ? कोणत्या भावाने दृष्यसृष्टी, स्वप्नसृष्टी आणि परलोक सृष्टी प्रतीत होते आणि कोणत्या भावाने हेच सारे जीवनातील प्रश्न वादग्रस्त होतात आणि संघर्ष निर्माण करतात, तो चैतन्यभाव येथे अभिप्रेत आहे. जे कांही आहे म्हणून नाही आणि जे नाही म्हणून आहे. जे आहे ते नाही होते, आणि जे नाही ते आहे होते. त्याला आहे आणि नाही म्हणण्यात तरी काय स्वारस्य आहे ? पण हे स्वारस्य ज्या भावाने प्रतीत होते, हा भाव जाणणारा जो भावसंपन्न भावीक, येथे आहे-नाहीचे छेद गेल्याने त्याच्या जीवनातील अशांतता साहजिकच नाहीशी होते. त्यांचे जवळ जाणारा जीव ही डोक्यातील वावटळ पार नाहीसे होऊन क्षणभर शांत होतो. असा दृक् प्रत्यय देणारी शांतीच खरी महत्वाची आहे. 'शांती परते नाही सुख । येर अवघेची दुःख ।' हे श्रीतुकोपनिषद सांगते. 'शांती नाही रे बरवी । तोवरि

कैची तुज पदवी । आशा पापीणी हीत बुडवी ।' असे हृद्‌गत श्रीकेशवस्वामी आपल्या पद्यात प्रगट करतात. तर 'एका चरणाचा अर्थ मुनी वसिष्ठ जाणत । तेणे शांतीच्या सदनात । स्वात्मसुखी पहुडला ।।' असा शांतीसागर महात्मा, त्याचे महात्म्य श्रीतुकाराममहाराज आपले अभंगात सोदाहरण दाखवून देतात. 'ॐ शांति: शांति:' हे तर साऱ्या वेदाचे सार म्हणता येईल. यातील हे सूत्र प्रत्येकाने विचारात घेतले तर विश्वातील कितीतरी कोडी अगदी शांततेने, सहजपणे सुटतील. इतके याचे महत्त्व आहे. ब्रह्मसागरात साऱ्या वृत्ती लीन होऊन गेल्या कारणाने, ही शांती ज्याने संपादन केली असा साधू दृष्टीला पडणे ही देखील परमभाग्याची गोष्ट आहे. ज्याच्या वृत्ती लीन झाल्या तो साधू. श्रीचिमडचेमहाराज म्हणतात, 'धन्य हा रघुनाथप्रिय साधू । सद्‌गुरुवचने करि बोधु । करि कृपा हीनदीनावरी बाप । हरूनिया भवभयांतक ताप ।' अशा प्रकारचे महान श्रेष्ठ साधू आपले सांप्रदायात होऊन गेले. असा महत्वाचा ईश्वरी साक्षात्काराचा मार्ग हा आपोआप खुला होतो. इतके त्यात सामर्थ्य आहे. म्हणून श्रीतुकाराममहाराज या अभंगाचे पहिल्या कडव्यात म्हणतात, **'दुजीयाला भ्रांती भाविकाला शांती । साधूंचिया वृत्ती लीन झाल्या।।'**

या वृत्ती लीन झाल्याने असे हे महात्म्ये ब्रह्मात मिसळूनच गेले. पाण्यात जसे मीठ पडले तर ते आता वेगळे करून दाखविता येणार नाही, ते पाण्यात विरूनच जाते अशी येथे अवस्था झाली आहे. मीठाची बाहुली समुद्राचा तळ शोधावयास जी गेली ती पुन: समुद्राची खोली सांगावयास काही वरती आलीच नाही. यापेक्षा काय सांगावे? 'लवण समुद्री जागा मागे । तव ते समुद्रीच झाले अंगे' असे श्रीनामदेवमहाराज यांनी म्हटले आहे. 'गगनी भासले अगणित तारे। तेथे मन मुरे वृत्तीसहीत।' या ज्ञानेशोक्तीप्रमाणे येथे होऊन राहिले, हे याचे महत्व आहे. म्हणून श्रीतुकाराममहाराज या अभंगाचे दुसऱ्या आणि तिसऱ्या कडव्यात म्हणतात, 'लीन झाल्या वृत्ती ब्रह्मी ते मिळाले । जळात आटले लवण जैसे ।।२।। लवण जैसे पुन्हा जळाचे बाहेर । येत नाही खरे त्यातोनिया।।३।।' तर



चिमडचेमहाराज म्हणतात, 'समुद्राचा बिंदू रे । बिंदू पहाता सिंधू रे । सिंधू माजी मिळोनी जाता । पुढे सुखाचा कंदू रे ।।' 'दिवसा पहाव्या तारा रे । रात्री रविचा फेरा रे । सुरा सरवरा दुर्लभ जे का । ते सुख गुरुच्या पोरा रे ।' या पदातील अनुभूती अत्यंत महत्वाची आहे. ही अवस्था जेथे झाली असे महात्मे पुन्हा आता मायाजाळात सापडतील काय ? छे ! मुळीच नाही. यादृष्टीने श्रीतुकाराममहाराज या अभंगाच्या चौथ्या कडव्यात म्हणतात, 'या सारखी जाणा तुम्ही साधूवृत्ती । पुन्हा न मिळती मायाजाळी ।।' आणि लगेच 'मायाजाळ त्यांना पुन्हा रे बाधेना । सत्य सत्य जाणा तुका म्हणे।' असा निर्वाळा शेवटच्या कडव्यात देतात. 'एथ एकची लीला तरले । जे सर्वभावे माते भजले । जया ऐलिच थडिये सरले। मायाजाळ ।।'या ज्ञानेश्वरमहाराज यांचे उक्तीप्रमाणे अशा कोटीतले महात्मे मायेच्या परपार होतात आणि त्यामुळे ब्रह्मरूपच होतात. 'जे मरणाचिया ऐलिकडे । मज मिळोन गेले पुढे । ते मरणी आणिकीकडे । जातील केवी ।' या श्री ज्ञानोशोक्तीप्रमाणे त्यांची अवस्था होते.

आमचे भगवान श्रीसद्‌गुरू श्रीनिंबरगीकरमहाराज यांचे सद्‌गुरू श्रीकाडसिद्ध यांनी मायेवर पूर्णत: विजय मिळविला. 'माई गे काडिदा' मायेला त्रास दिला छळले आणि माया त्यांना शरण आली म्हणून त्यांना 'काडसिद्ध' हे नाव प्राप्त झाले. हे प्रचंड हिमालयासारखे आपल्या सांप्रदायात मूर्तीमंत उदाहरण आहे. मायेची कवटी काढून तिची किनरी करून ते वाजवू लागले व विचारले, 'माये कसे काय?' माया लबाडच ! ती म्हणाली, 'आतांपर्यंत तुमच्यापासून दूर होते. पण आता तुमच्या छाताडावर नाचते आहे.' मग ती किनरी काडसिध्दांनी भिरकावून दिली आणि पुन्हा तिला जिवंत केले. ती काडसिध्दांना शरण आली आणि अशा प्रकारे श्रीकाडसिध्दांनी मायेवर विजय मिळविला, असा हा आपला संप्रदाय आहे. सिद्धगिरी हे तर आपल्या सांप्रदायाचे मूळपीठ आहे आणि श्रीसिद्धरामेश्वरमहाराज यांनी हेच ज्ञान हल्ली सिद्धगीरीस असलेल्या श्रीकाडसिद्धेश्वरमहाराज यांना देऊन या सांप्रदायाचे

महत्व वाढवले आहे. श्रीगणपतरावमहाराज कन्नूर व श्रीकाडसिद्धेश्वरमहाराज हे तर गुरूबंधू आहेत. या दृष्टीने अशा महात्म्यांना मायाजाळ बाधक होत नाही, हे स्पष्ट आहे. बीज भाजून लाही झाली आता त्याचे पुन्हा बीज होणार नाही. ऊसाची साखर झाली आता साखरेचा ऊस कसा होणार ? असा प्रश्न आहे. 'बीज भाजून केली लाही । आम्हां जन्ममरण नाही ।।', 'साखरेचा नोहे ऊस । आम्हां कैचा गर्भवास ।।' हे श्रीतुकोपनिषद अत्यंत बोलके आहे. यावर निराळे भाष्य करणेची आवश्यकताच नाही म्हणून. 'मायाजाळ त्यांना पुन: रे बाधेना' हे कदाचित आपल्याला पटणार नाही म्हणून येथे 'सत्य सत्य जाणा तुका म्हणे' या शब्दात एकदा नव्हे दोनदा आपला विश्वास बसावा म्हणून आवर्जून सांगितले आहे. आतां यापेक्षा अधिक काय सांगावे ?

***

## अभंग १२ वा

**स्वर्गलोकीहूनी आले हे अभंग । धाडीयेले सांग तुम्हालागी ।।१।।**

**नित्य नेमे यासी पढता प्रतापे । जळतील पापे जन्मांतरीची ।।२।।**

**तया मागे पुढे रक्षी नारायण । मांडिल्या निर्वाण उडी घाली ।।३।।**

**बुद्धीचा पालट नासेल कुमती । होईल सद्‌गती येणे पंथे ।।४।।**

**सद्‌गती झालिया सहज साक्षात्कार । होईल उद्धार पूर्वजांचा ।।५।।**

**साधतील येणे इहपरलोक । सत्य सत्य भाक माझी तुम्हा ।।६।।**

**परोपकारासाठी सांगितले देवा । प्रासादिक मेवा ग्रहण करा ।।७।।**

**येणे भवव्यथा जाईल तुमची । सख्या विठ्ठलाची आण मज ।।८।।**

**टाळ आणि कंथा धाडिली निशाणी । घ्यारे ओळखोनी सज्जन हो ।।९।।**

**माझे दंडवत तुम्हा सर्व लोका । देहासहित तुका वैकुंठासी ।।१०।।**



श्रीतुकाराममहाराज या अभंगात सांगतात, स्वर्गलोकातून हे अभंग तुम्हासाठी पाठविले आहेत. आमच्या भगवान श्रीसद्‌गुरू श्रीनिंबरगीकरमहाराजानी हे स्वर्गातून अमृत आणले आहे; असे श्रीअंबुरावमहाराज म्हणत असत. श्रीनिंबरगीकरमहाराज यांचेपासून हे बारा अभंग नित्यनेमाने म्हणणेची पध्दती या निंबरगी सांप्रदायात आहे. त्यामुळे हे अभंग लक्षावधी लोकांचे तोंडी आहेत. ही एक भाविकांची संध्याच आहे. या सांप्रदायात तर याचे महत्व निश्चितच अबाधित आहे. पण विशेष हे की लोकमान्य टिळक ज्यांना गुरूस्थानी मानीत ते महर्षी आण्णासाहेब पटवर्धन हे अभंग नित्यनेमाने म्हणत असत. महर्षी आण्णासाहेब माडीवरून खाली उतरत होते, त्याचवेळी श्रीतुकाराममहाराज हातात वीणा आणि चिपळ्या घेऊन माडीवर चालले होते. आण्णासाहेबांना साक्षात् श्रीतुकाराममहाराज यांचे दर्शन झाले. असे या अभंगाचे मोठे महत्व आहे. फलटणचे विदेही साधू डॉ.उपळेकर यांचे पाठात हे अभंग असून अनेक संत सज्जन हे भक्तीभावे पठण करीत असतात. याचे खरे महत्व काय आहे हे म्हणत म्हणजेच अनुभवास येते.

श्रीतुकाराममहाराज शालीवाहन शके १५७१ मध्ये फाल्गुन वद्य द्वितीयेस सदेह वैकुंठाला गेले. ते सदेह वैकुंठाला कसे गेले हा विषय स्वतंत्र आहे. श्रीतुकाराममहाराज यांचे निर्याणाचे अभंग प्रसिद्ध आहेत. श्रीतुकाराममहाराज यांचे साक्षात अवतार श्रीनिंबरगीकरमहाराज हे होत. श्रीतुकाराममहाराज यांचे निजधाम निर्याणाचे अभंग म्हणूनच श्रीनिंबरगीकरमहाराज यांनी देह ठेवला. हे सारे अभंग मोठे बोलके आणि महत्त्वपूर्ण असून आमचे चिमड सांप्रदायात संतांचे पुण्यतिथी आराधनेचे वेळी सांप्रदायिक स्थानातून प्रतिवर्षी म्हटले जातात.

**शालिवहन शके १५७१ । विरोधी संवत्सर उत्तरायण ।।१।।**

**फाल्गुन वद्य द्वितीया आणि सोमवार । प्रथम प्रहर प्रात:काळी ।।२।।**

**तयेवेळी स्वये कीर्तन करीता । म्हणे मज आता निरोप द्यावा ।।३।।**

**तुका म्हणे नमन साधुसंत पाया । ऐसे बोलोनिया गुप्त झाला ।।४।।**

हा अभंग श्रीतुकाराममहाराजांचे निर्याणाचे अभंगातील शेवटचा अभंग आहे आणि आराधनेनंतर जो अभंग म्हणणेत येतो तो अभंगही फार महत्वाचा आहे, म्हणून तो येथे उधृत करीत आहे.

**‘भजन पूजन साधुनि बळे । जिंकीयेले कळीकाळ ।।१।।**

**गर्जताती तिन्ही । टाळ ऐकताती कानी ।।२।।**

**जड देह कैसा घेऊनी । गेला तुकाराम वाणी ।।३।।’**

ज्यावर्षी श्रीतुकाराममहाराज यांनी सदेह वैकुंठरोहण केले, ते संवत्सर देखील बोलके आहे. विरोधी संवत्सरात हे महाप्रयाण घडले. सारे आयुष्य तुकाराममहाराज यांना विरोधातच घालवावे लागले, हे तर अगदी उघडच आहे. ‘रात्रंदिन आम्हा युद्धाचा प्रसंग । अंतर्बाह्य जग आणि मन ।।’ या महाराजांचे वचनावरून हे स्पष्टच होत आहे. फाल्गुन वद्य द्वितीया हाच तो पुण्यदिवस. या दिवसाला श्रीतुकारामबीज असे म्हणतात. बीजतत्त्वाची ओळख करून घेण्यासाठीच श्रीतुकाराममहाराज यांचा अवतार होता म्हणून त्यांनी बीज साधली. श्रीतुकाराममहाराज तर, ‘अहर्निश नाम गाईन मी वाचे । बीज कल्पांतीचे तुका म्हणे ।।’ या त्यांच्या उक्तीप्रमाणे कल्पांताचे बीज जे नाम, त्याच्याशी पूर्णत: समरस झालेले होते आणि हेच तत्व त्यानी जगात प्रसृत केले. म्हणून ते म्हणतात, ‘हेचि आम्हा करणे काम । बीज वाढवावे नाम।।’.

श्रीतुकाराममहाराज आपल्या घराचे अंगणात असतानाच त्यांना भगवंतांचे बोलावणे आले. ‘अंगणी होतो तो आले बोलावणे । समस्ता कारणे सांगितले ।।’ या चरणात त्यांनी हा विषय स्पष्ट केला आहे. फणत्कार करीत तेथे गरूड आला. ‘गरूड येतो फणत्कारे । नाभी नाभी करी त्वरे ।’ नंतर कीर्तन



करीतच महाराज इंद्रायणीकडे चालले. ‘कीर्तन करीत चाललो तेथून । करीत होतो ध्यान विठोबाचे।।’ इंद्रायणीजवळ महाराज आले. तेथे इंद्रायणीवर विमान उतरले होते.‘लक्ष्मी सहीत उतरले विमान । उदकावरी येऊनी स्थिरावले ।।’ तेथे महाराजांनी कीर्तन केले. भगवंतांचे महत्व सांगितले. ‘ब्रह्मा विष्णू रूद्र आले तिघेजण । घेतले उचलोन मज विमानी।।’ तेव्हा तुमच्या नेत्रा झापड पडली । विमाने चालिली आकाशमार्गी ।। ब्रह्मा विष्णू रूद्रानी श्रीतुकाराममहाराज यांन उचलून विमानात घेतले. पण सर्वांच्या डोळ्याला, त्या विमानाच्या दिव्य तेजाने डोळे दिपल्याने, झापड पडली आणि आकाशमार्गाने महाराज वैकुंठास चालले. संतानी मात्र हे दृश्य प्रत्यक्ष आपल्या डोळ्यांनी पाहिले. ‘तुका बैसला विमानी । संत पाहती लोचनी ।। रामकृष्ण विठ्ठल बोला। तुका जातो वैकुंठाला ।।’ हे महाराजांचे शब्द मोठे बोलके आहेत. यावर भाष्य करणेची जरूरी नाही. श्रीरामेश्वरभट्टासारख्यांनी हे दृश्य आपल्या डोळ्यांनी पाहिले आहे. त्यामुळे तर त्यांची खात्रीच झाली. ते म्हणतात

**‘तुकाराम तुकाराम । नाम घेता कापे यम ।।१।।**

**धन्य तुकोबा समर्थ । तेणे केला पुरूषार्थ ।।२।।**

**तारीयेल्या वह्या । जैशा उदकावरी लाह्या ।।३।।**

**म्हणे रामेश्वर भट्ट द्विजा । तुका विष्णू नाही दुजा ।।४।।’**

श्रीरामेश्वरभट्टाना श्रीतुकाराममहाराज हे तर त्यावेळी विष्णुस्वरूपच दिसले. या दृष्टीने श्रीरामेश्वरभट्ट मोठ्या अभिमानाने म्हणतात, ‘मागे कविश्वर झाले थोर थोर। नेले कलेवर सांगा कोणी ।। म्हणे रामेश्वर सकळा पुसोनी । गेला तो विमानी बैसोनिया ।।’ श्रीतुकाराममहाराज हे जेव्हा वैकुंठास चालले तेव्हा श्रीरामेश्वरभट्ट आदि करून चौदा टाळकरी हे दृश्य पाहून मोठे तळमळले व जमिनीवर निचेष्टीत पडले. हा शिष्यांचा विलाप पाहून त्यांचे समाधानासाठी

चार कोसावर विमान थांबवून या टाळकऱ्यांच्या समाधानासाठी श्रीतुकाराममहाराज यांनी बारा अभंग लिहून ते विमानातून खाली रंगपंचमीस 'प्रसाद' म्हणून पाठविले. तेच हे बारा अभंग होत. वाघोलीचे श्रीरामेश्वर भट्ट यांचेकडे यामुळे श्रीतुकाराममहाराज यांची पुण्यतिथी रंगपंचमीस होत असते. हे अभंग या टाळकऱ्यांनी उरी बाळगले व त्याचा नित्यपाठ चालू ठेवला. असे हे मोठे चौदा टाळकरी खरे भाग्यवान होते, यात प्रश्नच नाही. यांचेसाठीच विमान थांबवून हे बारा अभंग पाठविले व मगच श्रीतुकाराममहाराज हे खरे वैकुंठास गेले अशी वस्तुस्थिती आहे. ही सारी पार्श्वभूमी पाहिली म्हणजे या अभंगाचे खरे रहस्य ध्यानी येईल. 'चहू कोसावरी स्तंभविले विमान । लिहीले हे जाण पत्र तुम्हा ।।' असे श्रीतुकाराममहाराज यांनी आपले निर्याणाचे अभंगात या दृष्टीनेच म्हटले आहे.

म्हणून श्रीतुकाराममहाराज या अभंगात म्हणतात, 'स्वर्गलोकीहून आले हे अभंग । धाडियेले सांग तुम्हा लागी ।।' केवळ या शिष्यांच्या समाधानासाठीच हे अभंग महाराजांनी स्वर्गलोकातून पाठविले आहेत. याचे महत्वच काही आगळे आहे. हे सांगणेचे आता कारणच नाही. नित्यनेमाने याचे पठण केल्यास जन्मांतरीची पातके जळून खाक होतील. मागे पुढे उभे राहून वैकुंठीचा परमात्मा श्रीनारायण त्या जीवाचे रक्षण करून निर्वाणी उडी घालून धावत येईल. बुद्धीचा पालट होईल. दुर्बुद्धी होणारच नाही. आणि या पंथांनी सत् स्वरूपाला प्राप्त करून देणारी गती म्हणजे सद्‌गती त्यास अनायासे लाभेल. या सद्‌गतीने सहजतेत तो जीव आल्याने, ज्या सहजातून हे सारे अनंत गोळा झाले आहे आणि पोटात गोळा उठेपर्यंत हे गोळा करण्याच्या नादी जीव लागला आहे आणि हे गोळा करून आपण मात्र निघून जावे अशी ज्या जीवाची खरी अवस्था होत आहे, त्या जीवाला साक्षात् जे काही सहज आहे त्याचाच केवळ उमज पडून तदाकार तो जीव होतो. अहंकार जातो आणि साक्षात्कार होतो असे येथे काही स्वारस्य आहे. आणि यामुळे या भक्तीने



पूर्वजांचाही उद्धार होतो. इहपरत्र सुखाचीच अनुभूती त्या जीवाला प्राप्त होते. अशी फलश्रुती आणि ग्वाही पण येथे महाराजांनी दिली आहे. पर परमात्म्याचे सन्निध तेच होऊन रहावे म्हणून हे सारे सांगून ठेवले आहे. हा चित्तावर प्रसन्नता निर्माण करणारा असा प्रासादिक मेवा आहे. आणि तो तुम्ही ग्रहण करून तरी पहा, असे श्रीतुकाराममहाराज येथे अगदी आवर्जुन सांगत आहेत आणि सर्वांचा येथे विश्वास बसावा म्हणून एवढेच म्हणून महाराज थांबत नाहीत तर, सख्या विठ्ठलाची शपथ घेऊन याने भवव्यथा कोठल्या कोठे निघून जाईल असे ते ठासून निश्चयाने म्हणत आहेत. अर्थात माणसे ही माणसेच आहेत. तर्क कुतर्क करत बसतील आणि खऱ्या सुखाला अंतरतील. संशयाने पछाडले जाईल म्हणून येथे कोणास शंका राहू नये म्हणून खुणेसाठी आणि सर्वांचा विश्वास बसावा म्हणून या बारा अभंगाबरोबरच श्रीतुकाराममहाराज यांनी टाळ आणि कंथाही पाठवून दिली आणि सज्जनहो ही ओळखून घ्या आणि बारा अभंग प्राण गाठी असेतो म्हणत रहा असा आदेशही द्यावयास महाराज विसरले नाहीत. म्हणून ते याच अभंगात म्हणतात, 'टाळ आणि कंथा धाडिली निशाणी। घ्यारे ओळखोनी सज्जन हो'।.

ज्या श्रीतुकाराममहाराज यांचे चरणी ब्रह्मादिक देवानी लोटांगण घालावे असे सामर्थ्यसंपन्न महाराज खरे, पण अंत:करण येवढे विशाल ज्याची कल्पनाही करणे खरे अशक्य आहे. सूर्याचा काय प्रकाश असेल असे म्हणताना, म्हणणाराचाच तेथे प्रकाश पडावयाचा. तशापैकीच येथे आहे. देहासकट वैकुंठाला जातानाही ते सर्व लोकांना ब्रह्मरूपच पहात आहेत. म्हणून ते शेवटी म्हणतात, 'माझे दंडवत तुम्हा सर्व लोका । देहासहित तुका वैकुंठासी।।' याला पूरक असेच महाराजांचे पुढे चार अभंग आहेत. हे सारे अभंग श्रीभाऊसाहेबमहाराज उमदीकर यांचे संप्रदायात म्हटले जातात. या पठणाने नेम चांगला होतो. प्रचीति चांगली येते. आत्मसमाधान लाभते. आत्मविश्वास बाणतो. या दृष्टीने हा विषय आपण यथाक्रम पाहू.

श्रीतुकाराममहाराज यांनी सारा तपशीलच पुढे दिला आहे. तोही औचित्यपूर्ण आहे. त्रिवाचा नेम जर केला तर काय होते ते त्यांनी स्पष्ट केले आहे. तो विचारच यापुढे पहावयाचा आहे.

***

## अभंग १३ वा

**सत्य सत्य जाणा त्रिवाचा नेम हा । अनुभव पहा पदोपदी ।।१।।**

**पदोपदी पहा श्रीमुख चांगले । प्रत्यक्ष पाऊले विठोबाची ।।२।।**

**विठोबाची भेटी घडेल वाचिता । तुम्हालागी आता सांगितले ।।३।।**

**सांगितले खरे विश्वाचिया हिता । अभंग वाचिता जे का नर ।।४।।**

**ते नर पठणी जीवन्मुक्त झाले । पुनः नाही आले संसारासी ।।५।।**

**संसार उडाला संदेह फिटला । पूर्ण तोचि झाला तुका म्हणे ।।६।।**

या अभंगात श्रीतुकाराममहाराज यांनी या बारा अभंगांची फलश्रुती सांगितली आहे. या अभंगांचा नेम तीन वेळा केल्यास याचा पदोपदी साधकास अनुभव येतो, हे याचे मोठे महत्व आहे. काही संत मंडळी त्रिकाल संध्येप्रमाणे किंवा त्रिकाल नेमाप्रमाणे या अभंगाचे मोठ्या भक्तीभावाने त्रिकाल पठण करीत असतात. इंचगेरीस देखील काही काळ त्रिकाल भजन सुरू होणेपूर्वी हेच अभंग तीन वेळा म्हणणेची प्रथा होती, असे ऐकिवात आहे. श्रीभाऊसाहेबमहाराज उमदीकर यांचे परमशिष्य श्रीरामरावमहाराज तिकोटेकर ब्रह्मचारी हे नित्यनेमाने या अभंगाचे नेमाबरोबरच त्रिकाल पठण करीत असत असे परमप्रिय डॉ. दा. वि. उर्फ आप्पा कुलकर्णी यांनी त्यांचे एकाध्यायी चरित्रात नमूद केले आहे. श्रीरामरावमहाराज यांनी देह ठेवल्यावर अस्थिविसर्जनादिवशी रक्षा सावरताना लोकांना एकही अस्थी त्यात मिळाली नाही, त्यांचा देह कापरासारखा ज्योतीरूप झाला होता असे दिसून आले.



विज्ञानाला आव्हान देणारी ही घटना अध्यात्म्याचे महत्व दाखवणारी आहे.

भगवान श्रीसद्गुरू श्रीतात्यासाहेबमहाराज यांनी प्रसिद्ध केलेल्या 'श्रीकैवल्य वैभव' या ग्रंथात हे अभंग समाविष्ट आहेत. कैवल्यवैभव हा ग्रंथ आमचे चिमड सांप्रदायाचा ग्रंथसाहेब आहे, हे सांगणेतही आम्हाला सात्वीक अभिमान वाटतो. या ग्रंथास गुरूदेव रानडेसाहेब यांची सुंदर प्रस्तावना असून, सुप्रसिद्ध ॲनी बेझंट बाईनी आपले धर्मजागृती मासिकात उत्कृष्ट अभिप्राय दिला होता, यावरून श्रीतात्यासाहेबांनी कैवल्यवैभवात केलेल्या संतवाङमयाच्या संकलनाचे महत्व हे नेत्रदीपक आहे हे स्पष्ट होते. श्रीतात्यासाहेबानी आपले चिरंजीव डॉ. श्री. गोविंदराव कोटणीस उर्फ आण्णा यांना हे बारा अभंग रोज पठण करीत जा असे सांगितले होते. त्यांनी हे अभंग आपले पितृदेवांचे आणि सद्गुरुंचे आज्ञेप्रमाणे आपला उत्कृष्ट असा डॉक्टरी व्यवसाय सांभाळून रोजचे साधनाबरोबर या बारा अभंगाचा पाठ चालू ठेवला होता. नित्यनेमाने ते चिमडची पंचपदी म्हणत. ज्ञानेश्वरी तर त्यांना जवळ जवळ तोंडपाठच होती. प्रपंच परमार्थ सव्यसाचित्वाने साधून त्यांना मोठे शांती समाधान लाभले. अशी त्यांची मोठी योग्यता होती. माझे पितृदेव श्रीमामा केळकर यांचे संबंधी त्यांचे मनात मोठा प्रेमभाव होता. याची प्रचीती अनेकाना प्रसंग विशेषी आलेली आहे.

माझे पितृदेव श्रीमामा केळकर हे रोज साधनाबरोबर आणि कीर्तनाबरोबर नित्याचे पंचपदीप्रमाणे हे बारा अभंग त्रिकाल साधनाचे वेळी पठण करीत. ते तर हरीभक्तीचा कळसच झाले असे उद्गार श्रीपंतमहाराज बाळेकुंद्रीकर यांचे अधिकारी शिष्य सांगलीचे प्रेमयोगी श्रीपांडुरंगमहाराज ताम्हनकर यांनी आपले पद्यात काढले आहेत. ते म्हणतात, 'पैठण क्षेत्री अतृप्त हेतू । सांगलीत पूर्णेच्छा होतू । हरिभक्तीचा कळस डोलतू । पांडुरंग मनी भरला।।१।। एकनाथ पैठणवाला । सांगली आवडली त्याला ।।ध्रु.।।'

श्रीमामांनी माझे ती.सौ. कै.आईस हे बारा अभंग म्हणणेस सांगितले

होते. ती बारा अभंग रोज तेरा वेळा म्हणत असे. श्रीतुकाराममहाराज सदेह वैकुंठास विमानात बसून चालले आहेत. श्रीजीजामाऊली वर तोंड करून पहात आहेत, त्यांना मोठे आश्चर्य वाटते आहे आणि तुळसी मंजीरीचा मोठा सुगंध दरवळला आहे, असा अनुभव हे अभंग नेमाचे वेळी म्हणत असताना आमचे सौ. आईस आला आणि आश्चर्य आमचे श्रीरामनिकेतनमध्ये हा सुगंध नेमाचे वेळी बसलेल्या साधकांनाही आला होता. देवावर तुळसी पत्र असेल पण एवढा सुगंध जाणवल्याने सर्वानाच आश्चर्य वाटले वाचून राहिले नाही. माझे सौ. आईनी (श्री. इंदिराबाई केळकर) हे अभंग आयुष्यातील शेवटच्या दिवसापर्यंत म्हटले होते. म्हणून सौ. आईचे निर्याणानंतरही लगेच सर्वांनी हे बारा अभंग म्हणूनच, तिची अंत्ययात्रा निघाली. असे या अभंगाचे फार मोठे महत्व आहे. वानगीदाखल या दोन गोष्टींचा येथे फक्त निर्देश केला आहे. असा महिमा पुण्याचे महर्षी श्री.आण्णासाहेब पटवर्धन व पुसेसावळी येथील डॉ. गोविंदमहाराज उपळेकर इ. अनेक संत सत्पुरुषांनी अनुभविला आहे. श्री.अण्णासाहेबांना या अभंगांचे पठणाने साक्षात् श्रीतुकाराममहाराज यांचे दर्शन झाले होते. डॉ. उपळेकर यांचे नित्यपाठात हे अभंग होते. म्हणून श्रीतुकाराममहाराज या अभंगाचे पहिल्या कडव्यात म्हणतात, 'सत्य सत्य जाणा त्रिवाचा नेम हा । अनुभव पहा पदोपदी ।।१।।' ही अनुभूती अनेक संतांनी या अभंगाचे पठनात घेतली आहे असे दिसून येते.

साधकांना या अभंगाचा अनुभव पदोपदी येतो हे याचे खरेखुरे महत्त्व आहे. श्रीविठ्ठल पुरंदर म्हणतात, 'पदोपदी अपार झाल्या पुण्याच्या राशी । सर्वही तीर्थे घडली आम्हा आदि करूनी काशी ।।' त्याचा साक्षात्कार या अभंगाने निश्चित येतो. पाऊलो पाऊली जर हा अनुभव आला तर मग आणि काय पाहिजे ? असा प्रश्न आहे. आमचे गुरुवर्य श्रीदादासाहेब कोटणीसमहाराज आपले कीर्तनात एक पद म्हणत, त्याची येथे प्रकर्षाने आठवण होते. 'पाऊलो पाऊली देव दिसे । जप तप त्याते कोण पुसे।।' पावला पावलाला असा अनुभव



आल्यावर तेथे इतर गोष्टींची काय मातब्बरी आहे. भगवान श्रीसद्गुरु श्रीनिंबरगीकरमहाराज यांनी हीच गोष्ट या संप्रदायात साधकांचे प्रत्ययास आणून दिली आहे. असा हा स्वरूप संप्रदाय आहे. येथे साक्षात्कारामुळे उपासना सहजच होत रहाते. किंबहुना सहज जे काही घडेल तीच येथे उपासना होते. सहज साधनाचे मोठे औचित्य आहे.

आपण देवाकडे सतत पहात राहिलो तर मग स्मरण सहजच होते. जप केला आणि तपश्चर्या झाली एवढे कष्ट कशाला घ्यावयास पाहिजेत? म्हणून श्रीतुकाराममहाराज या अभंगाचे दुसऱ्या कडव्यात म्हणतात, 'पदोपदी पहा श्रीमुख चांगले । प्रत्यक्ष पाऊले विठोबाची ।।२।।'

आता काही नाही. भगवंताला खुशाल नुसते पहात रहा. पाऊला पाऊलाला हा अनुभव घेत जा हेच महाराजांनी ठामपणे सांगितले आहे. इंचगेरी संप्रदायातील त्रिकाल भजनात एक अभंग येतो. तो या दृष्टीने फार महत्वाचा आहे. 'पहिले पहाता श्रीमुख । तहान हारपली भूक ।।' हा अभंग म्हणत असताना सांगलीस श्री. सीताराम बापू करंदीकर यांचे घरी श्रीअंबुरावमहाराज हे अक्षरश: नाचावयाचे, देहभान विसरून जायचे. हे दृश्य डोळ्यासमोर येते. प्रत्यक्ष या गोष्टी आपण पाहिलेल्या आहेत. असे या साक्षात्काराचे स्वरूप आणि महत्व आहे. भगवान श्रीसद्गुरु श्रीनिंबरगीकरमहाराज यांचे परमअधिकारसंपन्न नातू श्रीनागाप्पाण्णामहाराज हे आपल्या गोड आवाजात हे अभंग म्हणू लागले की श्रोतेही देहभान विसरून जात असत. हा साक्षात्कार आम्हास घडला आहे. आमचे घरी ते येत असत. जेथे जेथे या महात्म्याचे पाय लागले ती वास्तू पुनीत होऊन राहिली आहे.

श्रीगणपतरावमहाराज कन्नूर हे आमचेकडे आले की हाच प्रत्यय येत असतो, असा त्यांचा मोठा अधिकार आहे. बारा अभंगाचे वेड त्यांनी अनेकांना लावले आहे.

या अभंगाच्या तिसऱ्या कडव्यात महाराज म्हणतात, 'विठोबाची भेटी

घडेल वाचिता । तुम्हालागी आता सांगितले ।।३।।' हे अभंग वाचल्यावर विठोबाची भेट घडेल हे तर तुम्हाला सांगितले आहेच. 'वि चा केला ठोंबा । म्हणून नाव त्या विठोबा।।' या श्रीतुकोपनिषदाप्रमाणे येथे अनुभूती आहे. 'होता अहंकाराचा ठोंबा । उपडिला घुसळखांबा । कैचे दाविले स्वयंभा । बाई तुझिया रामाने ।।' या श्रीनाथमहाराज यांच्या उक्तीप्रमाणे अहंकाराचा घुसळखांबा उपडला गेला की तेथे स्वयंभू चैतन्य अनुभूतीला येते. हे जे विज्ञान स्वरूप तोच खरा विठोबा आहे. 'अहंभाव गेला। तुका म्हणे देव झाला।।' हे सूत्र चिंतनीय आहे.

श्रीभाऊसाहेबमहाराज यांचा एक आवडता श्लोक येथे उधृत करणे अप्रस्तुत होणार नाही असे वाटते. 'विकारो विश्वकर्ताच । ठकारो नीलकंठक:। लकारो लक्ष्मीकांतच । विठ्ठलं परिरूच्यते ।।' यावरून विठ्ठलाचे स्वरूप ध्यानी येईल.

चौथ्या कडव्यात श्रीतुकाराममहाराज म्हणतात, 'सांगितले खरे विश्वाचिया हिता । अभंग वाचिता जे का नर ।' हे सारे विश्वाचे हीत व्हावे म्हणून सांगितले आहे. यादृष्टीने हे अभंग वाचणारे जीवनमुक्त होतात, हे त्याचे खरे फलीत आहे. महाराज पाचव्या कडव्यात म्हणतात, 'ते नर पठणी जीवनमुक्त झाले । पुन: नाही आले संसारासी ।' या पठणाने जीव हा जीवनमुक्त होतो. तो पुन: संसाराला येत नाही. 'तुका पंढरीसी गेला । पुन: जन्मा नाही आला ।' हे सूत्र येथे ध्यानात घ्यावे असे आहे. तुम्हाला जर जीवन्मुक्त कोण आहे हे जर पहावयाचे असेल तर सांगलीत एक महात्मा आहे, त्याचे दर्शन घ्या असे श्रीपांडुरंगमहाराज ताम्हनकर मोठ्या कळकळीने सांगत असत. ते आपल्या एका दोहऱ्यात म्हणतात, 'जीवन्मुक्त को देखना गर है किनकी आस । जा देखो गोविंदको समज पडेगी खास ।।' माझे पितृदेवांबद्दल त्यांचे मनात असा मोठा भाव होता.

शेवटच्या कडव्यात महाराज म्हणतात, 'संसार उडाला संदेह फिटला । पूर्ण तोचि झाला तुका म्हणे ।' संसरणाच्या पलिकडे जो गेला तो नि:संदेह झाला व जो नि:संदेह झाला तो परमार्थात पूर्ण झाला. 'पौर्णिमेचा चंद्र तुका पूर्ण झाला । क्षणात निमाला पायाजवळी ।।' हे श्रीतुकोपनिषद येथे सतत डोळ्यासमोर ठेवावे असेच आहे. या बारा अंभगाचे पठणाने साधना व्यवस्थित होते आणि साधकाला पूर्णावस्था प्राप्त होते. यापेक्षा काय सांगता येईल ? संसरण हाच कोणी संसार, जर चैतन्यावर झेप घेईल तर या देहामुळे चैतन्यासंबंधी उठणारा संदेह, त्या संदेहाच संदेह निर्माण झाल्याने पूर्ण निश्चिंत होऊन, त्यात अपूर्ण असे काही रहात नाही. जीवन निष्ठेने जीवनास पूर्णत्व येते.



***

## अभंग १४ वा

**पाच कोटी एक लक्षाचा शेवट । चौतीस सहस्र स्पष्ट सांगितले ।।१।।**

**सांगितले इतुके कथोनीया गेला । बारा अभंगाला सोडू नका ।।२।।**

**सोडू नका तुम्हा सांगितले वर्म । भवपाश कर्म चुकतील ।।३।।**

**चुकती यातायाती विठोबाची आण । करा हे पठण जीवेभावे ।।४।।**

**जीवेभावे करिता होईल दर्शन । प्रत्यक्ष सगुण तुका म्हणे ।।५।।**

या अभंगाचे पहिल्या कडव्यात श्रीतुकाराममहाराजानी आपले अभंगाची वट्ट संख्या सांगितली आहे. या दृष्टीने श्रीतुकाराममहाराज यांचे ५,०१,३४,००० इतके अभंग आहेत ते स्पष्ट होते. श्रीनामदेवमहाराज यांचे शतकोट अभंगाचे प्रतिज्ञेपैकी राहिलेले अभंग पुरे करणेसाठीच श्रीतुकाराममहाराज यांचा अवतार होता. श्रीपांडुरंगासह श्रीनामदेवमहाराज यांनी श्रीतुकाराममहाराज यांचे स्वप्नात येऊन तशी आज्ञा दिली होती. ''नामदेवे केले स्वप्नामाजी जागे । सवे पांडुरंगे येवोनिया ।।१।। तुकारामा तुवा करावे कवित्त्व । वाऊगे निमित्त बोलो नये ।।२।।''

या श्रीतुकाराममहाराज यांचे वचनावरून आपणास हे दिसून येईल 'करिता करिता काही उरली होती बाकी । तीच आली मुखी तुकयाच्या।।' या वचनाप्रमाणे उरलेली बाकी पूर्ण केली असाच निष्कर्ष निघतो. श्रीतुकाराममहाराजांचे अखंड कीर्तन आणि तेही बारा बारा तास किंवा देहावर नसले की याही पुढे चाले. ते केवळ यासाठीच, हे सांगणेची जरूरीच नाही. त्यांचे कीर्तन सारखे अभंगातूनच चाले त्यात मधे बोलण्याचा प्रसंग येतच नसे, सारखे अभंगावर अभंगच होत आणि त्यांचे शिष्य जे चौदा टाळकरी प्रसिध्द झाले, ते अभंग उतरवून घेत. पूर्वी आपलेकडे छपाईची व्यवस्था नसलेने व इतके अभंग सुव्यवस्थित ठेवणे हेही त्या काळाचे दृष्टीने अवघड असलेने सर्वच्या सर्व अभंग मात्र उपलब्ध नाहीत हेही तितकेच खरे. आठ दहा हजारापर्यंत फार तर ते सापडू शकतात. गाथ्यात चार साडेचार हजार अभंग आज उपलब्ध आहेत. तथापी इतके जरी अभंग आहेत आणि हे पाठ होणे सर्वांनाच शक्य नाही हे गृहीत धरले तरी निदान बारा अंभगाला तरी सोडूच नका हे अगदी कळकळीने आणि आवर्जून श्रीतुकाराममहाराज यांनी या अभंगाच्या दुसऱ्याच कडव्यात सांगितले आहे. ते म्हणतात, 'सांगितले इतके कथोनीया गेला । बारा अभंगाला सोडू नका ।।२।।'

या अभंगाच्या दुसऱ्या कडव्यात सांगतात, इतके जरी माझे अभंग प्रचंड पर्वता एवढे आहेत तरी हे बारा अभंग हृदयी कवटाळून धरा, हे सोडू नका असे महाराजांनी म्हटले आहे. या बारा अभंगाला कोणी नित्यपाठाचे अभंग अगर साखळीचे अभंग असेही म्हणतात. पण या अभंगाचेद्वारे विचार केला तर बारा अभंग हेच नाव योग्य ठरते.

'सोडू नका तुम्हा सांगितले वर्म । भव पाश कर्म चुकतील' या अभंगाचे तिसऱ्या कडव्यात भवपाश कर्म चुकविणारे हे अभंग आहेत हे तर खरे वर्मच आहे आणि म्हणूनच हे कधी सोडू नका, हे वर्मच तुम्हाला सांगून ठेवतो असे महाराजांनी म्हटले आहे.



शिवाय याचे नित्यपठण जर कोणी अगदी जीवेभावे केले तर याची खरी यातायातच मिटली हे देखील निश्चितपणे सांगणेस महाराज विसरले नाहीत हे ध्यानात घेणेसारखे आहे. म्हणून श्रीतुकाराममहाराज या अभंगाचे चौथ्या कडव्यात म्हणतात, 'चुकती यातायाती विठोबाची आण । करा हे पठण जीवेभावे ।।' विठोबाची शपथ तर महाराज कधीच घेणारे नव्हते. जेथे बोलण्यात ठामपणा आहे तेथे शपथेचे कारणच काय ? पण आपला विश्वास बसावा, हे कांहीतरी आहे असे समजून आपण यास अंतरू, म्हणून आपले काही तरी होऊ नये या दृष्टीने काहीतरी सांगणे येथे अवश्य आहे असे वाटून महाराजांनी नुसती शपथ नव्हे तर विठोबाची शपथ घेऊन आपले म्हणणे ठासून स्पष्ट केले आहे. फक्त याचे पठण कोठे तरी बघत, एखादी गोष्ट उरकून टाकावी असे न करता जीवेभावे होणे आवश्यक आहे अशी येथे सूचनाही महाराजांनी देऊन ठेवली आहे. जीवेभावे पठण झाले पाहिजे असे महाराजांचे म्हणणे आहे. महाराजांनी उपासना केली ती जीवेच केली. ते म्हणतात, 'नाही म्या वंचिला मंत्र हा कोणासी । राहीलो जीवेसी धरोनिया ।।' येथे जिव्हेसी असे महाराजांनी म्हटले नाही, जीवेसी म्हटले आहे. यातच त्याचे खरे इंगीत आहे.

शेवटच्या कडव्यात महाराज म्हणतात, 'जीवेभावे करिता होईल दर्शन । प्रत्यक्ष सगुण तुका म्हणे ।।'. जीवेभावे जर या अभंगांचे पठण झाले तर प्रत्यक्ष भगवंताचे सगुण दर्शन साधकाला होईल अशी या बारा अभंगांची फलश्रुती सांगून ठेवली आहे. अनेक संतसज्जानांनी याची प्रचीति घेतली आहे. कोणी सांगितली असेल तर कोणी गुप्त राखली असेल, पण 'संतसज्जनानी घेतली प्रचीति' या श्रीज्ञानेशोक्ती प्रमाणे अनेक संताना ही अनुभूती आलेली आहे, हे निर्विवाद. नाहीतर वेळात वेळ काढून हे बारा अभंग नित्यनेमाने म्हणणारे लक्षावधी संतसज्जन आहेत. ते उगाच म्हणतीलच कशाला ? असा प्रश्न आहे. माणूस काय रिकामा आहे थोडाच! यातच आपण ते ओळखून घेतले पाहिजे.

भगवान श्रीसद्‌गुरू श्रीनिंबरगीकरमहाराज हे एकदा पंढरपूर येथे

श्रीविठोबाचे दर्शनास गेले वेळी प्रत्यक्ष भगवान प्रगट होऊन आपले गळ्यातील दिव्यमाळा महाराजांचे गळ्यात घातली होती. तेव्हा तेथे मोठा प्रकाश पडला. सारे वारकरी थक्क झाले. महाराज म्हणाले, तुम्ही भाग्यवान आहा. तो भगवंताचा प्रकाश होता. मग वारकऱ्यांचे बुद्धीत प्रकाश पडला व त्यांनी महाराजांचे पाय धरले. अशी गोष्ट माझे प.पू. पितृदेव श्रीमामा केळकर हे आपले कीर्तनात प्रसंगानुसार सांगत असत. श्रीभाऊसाहेबमहाराज उमदीकर हे दर्शनास गेल्यावेळी भगवंतांनी त्यांचेवर पुष्पवृष्टी केली. ही हकीकत श्री शिवलिंगव्वानी सांगितली अशी गोष्ट माझे वाचनात कोठे तरी आल्याचे स्मरते. अशाप्रकारची अनुभूती अनेक संतांनी घेतली आहे. साऱ्याच गोष्टींचा परामर्ष येथे घेणे शक्य नाही म्हणून येथेच थांबतो. या पुढील अभंगात श्रीतुकाराममहाराज यानी हे पाच कोटी एक लक्ष चौतीस हजार अभंग कसे कसे लिहिले आहेत त्याची वर्गवारी त्यांनी स्वत:च दिली आहे.

***

## अभंग १५ वा

**वेदाचे अभंग केले श्रुतीपर । द्वादश सहस्र संहितेचे ।।१।।**

**निघंट निरूक्त आणि ब्रह्मसूत्र । अवतार सहस्र उपग्रंथ ।।२।।**

**अभंग ते कोटी भक्तीपर झाले । ज्ञानपर बोलिले तितुकेचि ।।३।।**

**पंचाहत्तर लक्ष वैराग्य वर्णिले । नाम ते गाईले तितुकेचि ।।४।।**

**साठ लक्ष केला बोध या जनासी । वर्णिले रूपासी तितुकेचि ।।५।।**

**तीस लक्ष केली देवासी करुणा । कर्मकांड जाणा एक लक्ष ।।६।।**



**द्वादश सहस्र स्वात्मानुभव । एवं जाणा सर्व संख्या ऐशी ।।७।।**

**ऐसे हे अभंग झालेसे भूतळी । बारा अभंग अंतराळी पत्रिकेचे ।।८।।**

**चौतीस सहस्र लक्ष एक कोटी पाच । सांगोनिया साच गेला तुका ।।९।।**

या अभंगात श्रीतुकाराममहाराज यांनी आपल्या पर्वतप्राय वेदतुल्य अभंगांचा क्रमवार तपशील, वर्गवारी करून दिलेला असल्याने या अभंगाचे मोठे महत्व आहे. यावरून त्यांचे अभंगांची वट्ट संख्या येथे स्पष्ट होते. श्रुतीपर वेदसंहितेचे अभंग बारा हजार असून निघंट, निरूक्त, ब्रह्मसूत्र, अवतार वर्णनात्मक दहा हजार अभंग आहेत. एक कोटी अभंग हे भक्तीपर असून ज्ञानपरही अभंग तितकेच म्हणजे एक कोटी आहेत. पंचाहत्तर लक्ष वैराग्यात्मक अभंग तर नाममहिमा सांगितलेले तितकेच म्हणजे पंचाहत्तर लक्ष अभंग आहेत. तीस लक्ष अभंगात देवाची करुणा असून कर्मकांडावर एक लक्ष अभंग आहेत. स्वानुभवाचे अभंग बारा हजार असून, बारा अभंग हे पत्रिकेचे आहेत. अशी या अभंगाची संख्या पाहता पाच कोटी एक लक्ष चौतीस हजार इतके श्रीतुकाराममहाराज यांचे अभंग असून त्यातील साडेचार-पाच हजार अभंगच आज गाथ्यामध्ये उपलब्ध आहेत. इंदुप्रकाश गाथ्यात सुमारे दहा हजार अभंगाचा समावेश आहे. वेद जसे पर्वतप्राय तसेच हे तुकोपनिषद आहे. या दृष्टीनेच श्रीतुकाराममहाराज यांचे कीर्तन बारा बारा तास सतत अभंगातून होत असे. त्यात सारखे अभंगच महाराजांचे तोंडून येत असत. संताजी तेल्याचेसारखे शिष्य ते भराभरा उतरून घेत. कीर्तनाला येणारे श्रोतेही या प्रयत्नाची शिकस्त करीत पण त्यावेळी छापखाने नसल्याने आणि सर्व संग्रह एकत्र ठेवणेची शक्यता नसलेने हे अभंग विखुरले गेले. त्यामुळे हे सर्व अभंग आज उपलब्ध होऊ शकत नाहीत. या दृष्टीने हे बारा अभंग उरी बाळगावेत असे याचे महत्त्व आहे.

या अभंगात श्रीतुकारामहाराज यांनी त्यांच्या सर्व अभंगांचे वर्गीकरण व संख्या नमूद केली आहे ती खाली दिली आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| संहिता | १२,००० | बोध | ६०,००,००० |
| उपग्रंथ | १०,००० | रुप | ६०,००,००० |
| भक्ति | १००,००,००० | करुणा | ३०,००,००० |
| ज्ञान | १००,००,००० | कर्मकांड | १,००,००० |
| वैराग्य | ७५,००,००० | स्वानुभव | १२,००० |
| नाम | ७५,००,००० | | ---------- |
| | | | ५,०१,३४,००० |

***

## अभंग १६ वा

**सगुण हे ब्रह्म विठ्ठलची बोले । ऐक पां वहिले तुकाराम ।।१।।**

**तुकारामा तुवा केले जे अभंग । करिती जे का जगी नित्यपाठ ।।२।।**

**नित्यपाठ करिता आवडी सद्‌भावे । विपत्ती न होये प्राणियासी ।।३।।**

**प्राण्याचे कल्याण होईल बा पाहे । भावे वाचिता हे नित्यनेमे ।।४।।**

**नेमे संकटासी करी अकरा पाठ । विघ्न त्याचे स्पष्ट दूर होय ।।५।।**

**दूर होय विघ्न विठ्ठल म्हणे तुकया । शेवटी निजठाया नेईन मी ।।६।।**

ग्रंथाचे शेवटी फलश्रुती देणेची प्रथा ही अगदी प्राचीन अशी पूर्वापार आहे. ग्रंथकारच त्याची फलश्रुती शेवटी देतात आणि ही फलश्रुती लक्षात घेऊन भाविकजन त्याचे पठण करीत असतात. ग्रंथाचे महत्त्व वाढविण्याचे दृष्टीने कोणी ग्रंथकार अलीकडे स्वत:च प्रास्ताविक लिहितात किंवा कोणा



श्रेष्ठाकडून प्रस्तावना घेऊन ती ग्रंथात प्रविष्ट करतात. पुरस्कार, अभिप्राय, ग्रंथ परिचय इत्यादी गोष्टीनेही ग्रंथाचे महत्त्व वाढत जाते. आणि त्या तोलामोलाचा वाचक वर्ग भाविकतेने किंवा चोखंदळपणाने ग्रंथ हाताळत असतो. त्यातला येथे कोणताच प्रकार नाही, हे एक येथे लक्षात घेणेसारखे आहे. या अभंगाचे महत्व काय आहे हे येथे श्रीतुकाराममहाराज सांगत नाहीत तर त्याचे महत्व सगुणब्रह्म श्रीविठ्ठलच वर्णन करून सांगत आहेत, असे बारा अभंगांचे किंवा साखळीच्या अभंगांचे अगर नित्यपाठ म्हणून प्रसिद्धीस आलेल्या या नित्यपाठाचे अध्यात्मदृष्टीने एक आगळेच महत्व आहे असे दिसून येईल. 'भावाचे मथीले निर्गुण संचले । ते हे उभे ठेले विटेवरी।।' असे या सगुण ब्रह्माचे वर्णन खुद्द श्रीतुकाराममहाराज यांनीच आपले गाथ्यात करून ठेवले आहे. सगुण आणि निर्गुण यात तसा खरा फरकच नाही. 'तुप थिजले आणि विघुरले', पैकीच हे सगुण आणि निर्गुण ब्रह्म आहे. घट्ट वा पातळ, ते तूपच आहे. घट्ट झाले की सगुण म्हणावयाचे व पातळ झाले की निर्गुण म्हणावयाचे असाच तो संकेत आहे. 'तुज सगुण म्हणो की निर्गुण रे । सगुण निर्गुण एक गोविंदु रे।।'असे श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात आणि 'ज्ञानदेव म्हणे सगुण निर्गुण । रूप विटेवरी दाविली खूण ।।' या शब्दातच त्याचा निर्वाळा देतात. भावाचे मंथन करून जे साचले तेच सगुण ब्रह्म विठ्ठलरूपाने साकार झाले. 'नाही घडवीला नाही बैसविला । पुंडलीका आला भेटावया ।।' या श्रीतुकोक्तीप्रमाणे हा विठ्ठल आहे. तो घडविला नाही अगर बसविला नाही तर पुंडलिकाला भेटावयास आला आणि उभा राहिला तो उभाच राहिला असा आहे. या विठ्ठलाचे स्वरूप एका श्लोकात उत्कृष्ट सांगितले आहे.

**विकारो विश्वकर्ताच ठकारो नीलकंठक: ।**

**लकारो लक्ष्मीकान्तंच विठ्ठलं परिरूच्चते ।।**

असा तो श्लोक असून श्रीभाऊसाहेबमहाराज उमदीकर विठ्ठलाचे स्वरूप सांगताना हा श्लोक विशद करून सांगत. सांगलीस श्री. सीतारामबापू करंदीकर

या आपल्या शिष्याकडे श्रीअंबुरावमहाराज प्रतिवर्षी येत असत. आणि महिना महिना राहून दासबोध सांगत. ते ज्या माडीत नेमाला बसत तेथे एक सिद्धपुरूषाचा फोटो असून त्यावर हा श्लोक लिहिलेला आहे. या दृष्टीने या श्लोकाचे वेगळेच महत्त्व आहे. सृष्टी कर्ता, धर्ता आणि हर्ता असा सर्वशक्तीमान तो विठ्ठल असून त्यानेच आपल्या मुखाने श्रीतुकाराममहाराज यांना या नित्यपाठाची फलश्रुती सांगण्यास सुरवात केली आहे. या दृष्टीने पहिल्या कडव्यात म्हटले आहे. 'सगुण हे ब्रह्म विठ्ठलची बोले । ऐक पा वहिले तुकारामा ।।१।।' तुकारामा तुम्ही हे जे अभंग केले आहेत त्याचा जर कोणी नित्यपाठ करील आणि तो मोठ्या आवडीने आणि सद्भावाने करील तर त्या प्राण्याला कोणतीही विपत्ती भोगण्याचा प्रसंगच येणार नाही, असे म्हटले आहे. या दृष्टीने 'तुकारामा तुवा केले जे अभंग ।। करती जे का जगी नित्यपाठ ।।२।।' 'नित्यपाठ करिता आवडी सद्भावे । विपत्ती न होये प्राणीयासी ।।' असे अभंगाचे दुसऱ्या व तिसऱ्या कडव्यात स्पष्ट केले आहे. श्रीतुकाराममहाराज यानी ज्या वृत्तात आपले काव्य लिहिले ते अभंगवृत्तच आहे. आणि वृत्ताप्रमाणे अभंग वाणीतून प्रगट झालेले हे अभंगवृत्तात्मक अभंग हे खरे अभंगच राहिले आहेत हे याचे खरे वैशिष्ट्य आहे. एका आर्येत म्हटले आहे 'सुश्लोक वामनाचा । अभंगवाणी प्रसिद्ध तुकयाची । ओवी ज्ञानेशाची । किंवा आर्या मयुरपंतांची।' या प्रकारे विचार केला तर श्रीतुकाराममहाराज यांची अभंगवाणी ही प्रसिद्ध आहे. 'अखंड ना खंडे अभंग ना भंगे' असेच श्रीतुकोपनिषद सांगते. ज्याला भंग नाही त्यालाच अभंग म्हणतात. म्हणून हा जो बारा अभंगाचा नित्यपाठ आहे, हा नित्यपाठ जर कोणी आवडीने आणि सद्भावपूर्वक नित्यपाठात घेईल त्याला विपत्ती येणारच नाही हे निश्चित. 'आवडीने भावे हरीनाम घेसी' हे श्रीएकनाथमहाराज यांचे सूत्र येथे विचारात घ्यावे असे आहे.

अभंगाचे चौथ्या कडव्यात श्रीपांडुरंग सांगतात, 'प्राण्याचे कल्याण होईल बा पाहे । भावे वाचीता हे नित्यनेमे ।।' नित्यनेमाने जर कोणी या



नित्यपाठाचे भावयुक्त पठण करील तर त्याचे कल्याणच होईल हे या ठिकाणी स्पष्ट केले आहे. 'रामकृष्ण वाचा भाव हा जीवाचा ।' रामकृष्णवाचा हा जीवाचा भाव आहे. ज्या योगाने आपले अस्तित्त्व आपल्यास जाणवते असा तो अस्तित्त्व भाव आहे. या भावाने नित्यनेम साधणे हे अगत्याचे आहे. जे नित्य आहे त्याचा नेम न चुकता साधणे हा नित्यनेम आहे. आमचे ती.प.पू.श्रीमामा केळकर आपले अभंगात म्हणतात, 'नित्यामाजी असे नेम । म्हणोनी तो नित्यनेम ।।' हा विचार येथे चिंतनीय आहे. सर्व संतांनी नित्यनेमाचे महत्व जगापुढे ठेवले आहे. श्रीचिमडचे महाराज म्हणतात, 'ऐसा सद्गुरू महिमा । जाणुनी भजा नित्यनेमा । आवडीने तारी आम्हा समर्थ स्वामी।।' हा नित्यनेम देखील जाणून घेतला पाहिजे. नित्यनेमाशिवाय अन्न खाणे हा शीण आहे असे श्रीतुकाराममहाराज यांनी प्रतिपादन केले आहे. ते म्हणतात, 'काही नित्यनेमाविण । अन्न खाय तोची शिण ।।' 'नित्यनेम नामी तो प्राणी दुर्लभ' या श्रीज्ञानेश्वरमाऊलीचे उक्तीप्रमाणे असे प्राणी तर जगात खरे दुर्मिळच आहेत. हा 'नित्यनेम शेंडी तुटो की पारंबी तुटो' असा झाला पाहिजे. माझे पितृदेव श्रीमामा केळकर हे तर आपले कीर्तनातून आपला नेम प्राणांतापर्यंत झाला पाहिजे असे सांगावयाचे. अर्थात हा नेम त्यांनी शेवटपर्यंत केल्याने त्यांचे सांगण्याला महत्व आहे. श्रीमामा तरी 'नित्यनेम प्रात:काळी । मध्यान्हकाळी सायंकाळी।' या श्रीसमर्थोक्तीप्रमाणे रोज त्रिकाळ नेम साधन करीत. त्या प्रत्येकवेळी प्रारंभी हे श्रीतुकाराममहाराज यांचे बारा अभंग म्हणत असत. बारा अभंगाने व चिमडचे पंचपदीने साधन उत्तम होते असे ते आवर्जून सांगत.

या अभंगाचे पुढील कडव्यात म्हटले आहे, 'नेमे संकटासी करी अकरा पाठ। विघ्न त्याचे स्पष्ट दूर होय ।' संकटकाळी जर नेमाने या अभंगांचे अकरा पाठ नित्यनेमाने केले तर ते विघ्न नाहीसे होते अशी ग्वाही या कडव्यात श्रीपांडुरंगानीच दिलेली आहे. चिमडचे पंचपदीतही अशीच ग्वाही दिली आहे. 'विघ्न नासुनी सदा सुख देई । म्हणवूनी स्मर सदा लवलाही।।' यात सर्वकाही

आले असे मला वाटते. ही पंचपदी म्हणजे चिमड संप्रदायाची संध्याच आहे. इतके याचे महत्त्व आहे. बारा अभंग तीन वेळा म्हटले तर ती भाविकांची त्रिकाळ संध्याच झाली असा त्याचा सरळ सरळ अर्थ आहे. याला पाणीही लागत नाही व सोवळ्या ओवळ्याचा प्रश्नही उद्‌भवत नाही. या बारा अभंगांचे पठणाने अनेकांची विघ्ने पार कुठल्याकुठे गेली असे भाविकांचे दाखले आहेत. या पठणाने विघ्ने दूर तर होतातच पण शेवटी मी माझ्या ठायीच त्या भक्ताला आसरा देतो असे भगवंतांनी येथे शेवटच्या कडव्यात अभिवचन दिले आहे. ज्यानी ज्यानी निष्ठेने हे अभंग, आयुष्यात शेवटपर्यंत म्हटले त्यांचा मरणकाळ हा इतरांचे मरणापेक्षा काही वेगळाच घडल्याचे जाणवले आहे. त्यांच्या मरणाचा सोहळा झाला किंवा या संतसज्जनांचे मरण म्हणजे तेही एक विज्ञानाला आव्हानच ठरले. यापेक्षा याचे महत्त्व कोणत्या शब्दात स्पष्ट करावे? असा प्रश्न आहे म्हणून शेवटी येथे भगवान म्हणतात, 'दूर होय विघ्न विठ्ठल म्हणे तुकया । शेवटी निज ठाया नेईन मी ।।६।।' हा अनुभव साधकांनी कसोटीवर पडताळून घ्यावा असाच आहे. इतके सांगून भगवान श्री सद्‌गुरू श्रीनिंबरगीकरमहाराज यांचे अनन्य भावे स्मरण करून, विराम देणेपूर्वीच आता या अभंगावर एक आरती आहे त्यावर थोडी सेवा झाल्यावर या नित्यपाठाची पूर्णता होईल.

***



## श्रीदासराममहाराजकृत

## श्रीतुकाराममहाराज यांच्या नित्यपाठावरील आरती (विरणासह)

**स्वर्गातून अमृत हे तुकयानी दिधले । सद्‌भक्तासी भूतली समाधान जाहले।**
**साधूसंती चित्ती प्रीती साठविले । टाळ आणि कंथा पाहुनि मन रमले ।।१।।**
**जयदेव जयदेव जय नित्यपाठा । ओवाळू आरती अक्षर वैकुंठा ।।ध्रु.।।**
**त्रिकाळ अभंगाचा घोष जरी झाला । भक्ता भेटेल भक्ती भगवानचि वदला ।**
**गुरूलिंगजंगमरूपे तुकया अवतरला । सद्‌गुरू प्रसाद सेवुनि दासराम धाला।।२।।**

श्रीतुकारामहाराज सदेह वैकुंठास शालीवाहन शके १५७१ मध्ये फाल्गुन वद्य द्वितीयेस सोमवारी सकाळी देवाने पाठवलेल्या विमानातून निघाले. श्रीरामेश्वरभट्टादि चौदा टाळकरी मोठे शोक विव्हळ होऊन दु:खावेगाने हे दृश्य पहात असतानाच, निचेष्टीतपणे अक्षरश: त्यांनी जमिनीवर आपले अंगच टाकले. श्रीतुकाराममहाराज यांना या आपल्या प्रिय शिष्यांची कणव आली आणि त्यांनी ते विमान चार कोसावर थांबवून बारा अभंगाचे पत्र त्याचे फलश्रुतीसह लिहून शिष्यांच्या समाधानासाठी आपल्या शिष्याना हे अभंग आपणच पाठविले आहेत, याची खात्री व्हावी म्हणून टाळ आणि कंथा यासह ते या भूतलावर पाठवून दिले. 'चहू कोसावरी स्तंभविले विमान । लिहिले हे जाण पत्र तुम्हा ।।' असे श्रीतुकारामहाराज याच दृष्टीने या अभंगाचा खुलासा करताना लिहितात, तर 'स्वर्गलोकाहूनी आले हे अभंग । धाडियेले सांग तुम्हा लागी ।।' असे स्पष्ट करतात. याचा अर्थ असा हे अभंग स्वर्गातून आलेले आहेत. हे स्वर्गातील खरेखुरे अमृत आहे आणि अमृत आहे म्हणून अक्षर आहे हे ध्यानात घेतले पाहिजे. मृत नव्हे असे अमृत व क्षर नव्हे असे हे अक्षर आहे. शरीर हे मृत आहे व क्षर आहे. पण त्यात असणारे चैतन्य हे मृत नसल्याने त्याला नाश नाही. हे चिदक्षर आहे.

'स्वर्गात अमृत आहे. तेथे तहान लागली तरी व भूक लागली तरी अमृतपानच आहे.' तेथे जे देव आहेत. त्याना म्हातारपण, आजारपण नाही. त्याचप्रमाणे चैनीत सारे आयुष्य जाते. मनासारखे भोग प्राप्त होतात. यज्ञ करून स्वर्गात जाणारे पण पुण्यक्षय झाला की, त्यांना पुन्हा मृत्युलोकी यावे लागते. स्वर्गातील देवांचा या अमृताने तसा फायदा झाला नाही. 'स्वर्गीचे ते देव इच्छिती मेदिनी । अमृत प्राशोनिया आम्हा नाही नफा रे । निष्काम राम जपा रे।।' श्रीजनाबाईंनी या दृष्टीनेच आपल्या अभंगात या देवांची इच्छा व्यक्त केली आहे. शिवाय स्वर्गातले अमृत हे स्वर्गात जाऊनच मिळवावे लागते. 'क्षीणेपुण्ये मृत्युलोके विशन्ति' अशीच खरी अवस्था आहे. मृत्युलोकात जे पंचामृत आहे ते शक्तीवर्धक आहे. पण ईश्वरी साक्षात्कार घडविणारे नामामृत आणि त्याची गोडी वैष्णव संतानीच चाखली. 'नामामृत गोडी वैष्णव लाधली' असे श्रीज्ञानेश्वरमहाराज या दृष्टीनेच आपले हरीपाठात सांगतात. अशी गोडी लागणेचे सामर्थ्य या बारा अभंगात असलेने श्रीतुकाराममहाराज यांचे हे बारा अभंग म्हणजे त्यानी स्वर्गातून पाठवलेले अक्षरामृतच आहे. हे अवीट असून नामामृताने जीवाला अमृतत्व देणारे असे हे अमृत आहे. म्हणूनच या श्रीतुकारामहाराज यांचे नित्यपाठावरील आरतीत 'स्वर्गातुनि अमृत हे तुकयानी दिधले । सद्भक्तासी भूतली समाधान जाहले । साधुसंती चित्ता प्रीती साठविले । टाळ आणि कंथा पाहुनी मन रमले ।।१।।' असे आरंभीच म्हटले आहे. 'तुकिता तुळणेसी ब्रह्म तुकासी आले' या श्रीरामेश्वरभट्ट यांचे उक्तीप्रमाणे ज्यांचा अधिकार होता अशा श्रीतुकाराममहाराज यांनी स्वर्गातून हे अभंगात्मक अमृत आपल्या प्रिय शिष्यांना या भूतली दिले आणि त्यायोगाने या चौदा शिष्यांना मोठा विरंगुळा वाटून या भूतलावर त्यांना चिरसमाधान प्राप्त झाले आहे. त्यांनी ते आपल्या हृदयी कवटाळले व सतत पाठांत ठेवले. टाळ आणि कंथा पाहून या शिष्यांचे मन त्यात रमले. आणि हा सारा चमत्कार पाहून अनेक संतांनी मोठ्या भक्तीने हे अभंग आपल्या चित्तात साठवून त्यांचे चिंतन केले आणि ते त्यातच रमले.



या निंबरगी संप्रदायाची ही त्रिकाल संध्याच आहे. पूर्वी ऋषीमुनी त्रिकाल संध्या करीत. कालमानाने एकवेळ तरी का होईना संध्या करणारे करतातच. त्रिकाल साधन खरे पण निदान दोनवेळा, एकवेळा तरी करणारे करतातच. एकवेळ हे बारा अभंग म्हणणारे लाखोंनी भाविक आजही आहेत. 'सत्य सत्य जाणा त्रिवाचा नेम हा । अनुभव पहा पदोपदी ।। पदोपदी पहा श्रीमुख चांगले । प्रत्यक्ष पाऊले विठोबाची ।।' असे श्रीतुकाराममहाराज यांनीच सांगून ठेवले आहे. श्रीतुकाराममहाराज यांचा गाथा हा पाचवा वेदच आहे. 'तुका पंचम तो वेद' ही श्रीतुकोक्ती येथे विचारात घ्यावी अशी आहे. तर हे बारा अभंग म्हणजे ते अक्षर वैकुंठ स्वरूप आहे. 'वैकुंठ हे नाम परमात्म्याला आहे.' 'वैकुंठः पुरुषः प्राण' असे विष्णुसहस्रनामात सांगितले आहे. म्हणून या आरतीच्या ध्रुवपदात 'जयदेव जयदेव जय नित्यपाठा । ओवाळू आरती अक्षर वैकुंठा ।' असे म्हटले आहे. त्रिकाल अभंग पठणाचे महत्व सांगताना आरतीच्या पुढील कडव्यात 'त्रिकाल अभंगांचा घोष जरी जहाला । भक्ता भेटेल भक्ती भगवानचि वदला ।। गुरुलिंगजंगमरूपे तुकया अवतरला । सद्गुरु प्रसाद सेवुनि दासराम धाला।।' असे सांगितले आहे. या अभंगांचा त्रिकाल पाठ नित्यनेमाने केल्यास मी त्यास भेटीन असे खुद्द भगवंतांनीच सांगितले आहे. 'दूर होय विघ्न विठ्ठल म्हणे तुकया । शेवटी निजठाया नेईन मी।।' हा भगवंतांनी दिलेला दिलासा फारच महत्वाचा आहे. भगवान भेट तर देतीलच पण त्यास आपल्याजवळ घेईन, असेही ते सांगून राहिले आहेत. श्रीभाऊसाहेबमहाराज उमदीकर यांचे एक अंतरंगातील शिष्य श्रीरामरावमहाराज तिकोटेकर, ज्यांनी ब्रह्मचर्यव्रताने अखंड मौन धरून, पडेल ती महाराजांची सेवा केली आणि कट्टाचा नेम केला, त्यांनी हे अभंग आयुष्यातील शेवटच्या घटकेपर्यंत रोज त्रिकाल नेमाचेवेळी तीन वेळा म्हटले आहेत. तर सांगलीचे श्रीसद्गुरु तात्यासाहेबमहाराज कोटणीस यांचे आज्ञेप्रमाणे माझे परमपूज्य पितृदेव श्रीमामा केळकर यांनी प्रत्यही त्रिकाल नेमाचे वेळी हे बारा अभंग न चुकता कटाक्षाने म्हटले आहेत. परमार्थातील

कोणी काही विचारावयास आले किंवा प्रापंचिक अडचण कोणी विचारली तर आमचे मामा बारा अभंग म्हणावयास सांगत आणि तसे केल्याने त्यांना प्रचिती येत असे किंवा संकट निवारणही होत असे. असे पाहिले तर आमचेकडे हे अभंग तीनदा बारावेळा, तेरावेळा, पंधरावेळा देखील म्हणणारे भाविक आहेत. आमचे श्रीतात्यासाहेबमहाराज यांना हे अभंग फारच प्रिय असलेने त्यानी ते आपले 'कैवल्य वैभव' नामक ग्रंथात पूर्वीच समाविष्ट केले आहेत.

सांगलीत कृष्णाकाठी श्रीतात्यासाहेबांचे समाधीमंदिर उभे असून पुण्यतिथी महोत्सवात हे बारा अभंग रोज म्हटले जातात. श्रीतात्यासाहेबांचे चिरंजीव डॉ. गोविंदराव तथा अण्णा कोटणीस हे श्रीतात्यासाहेबांनी सांगितल्याप्रमाणे चिमड येथील नित्याचे पंचपदी बरोबरच हे बारा अभंग नियमाने व निष्ठेने म्हणत असत. हा त्यांचा क्रम अव्याहतपणे चालला होता.

भगवान श्रीसद्‌गुरु श्रीनिंबरगीकरमहाराज यांचा महानिर्वाण शताब्दी सोहळा श्रीक्षेत्र निंबरगी, चिमड, सांगली, इंचगिरी, सोलापूर वगैरे ठिकाणी आसेतु हिमाचल सर्वत्र फार मोठ्या प्रमाणावर साजरा झाला. परमप्रिय डॉ. दा. वि. कुलकर्णी यांनी माझे इच्छेप्रमाणे हजार संतांची नावे एकत्र करून 'संतसहस्रनाम' हा ग्रंथ संस्कृतमध्ये लिहिला. त्यात चि.डॉ.के.वा.आपटे यांनी लिहिलेले संस्कृत चरित्रही आलेले आहे. याचा पाठ एकाचदिवशी एकाचवेळी हजारावर ठिकाणी झाला. श्रीनिंबरगीकरमहाराज यांचे नाव सर्वतोमुखी झाले. पुणे येथे शारदा मासिक संस्कृतमध्ये निघते. त्यात त्यांनी या महोत्सवाचे निवेदनही दिले होते. हा सर्व सोहळा पाहून मनाला अतीव आनंद झाला. मला सांगावयाचे ते हे की, आमचे श्रीनिंबरगीकरमहाराज हे श्रीतुकारामहाराज यांचे अवतार असून हे बारा अभंग त्यांनी आपले भक्तांना दिलेला तो प्रसादच आहे. याचे सेवनाने अमृत सेवन केल्याचा साक्षात्कार होतो. असे हे बारा अभंग अत्यंत महत्वाचे आहेत.

श्रीभाऊसाहेबमहाराज उमदीकर यांचे परमशिष्य श्रीनरसिंहमहाराज



यलहट्टी यांचेकडे कोणी नाम घेणेस आले तर आधी बारा अभंग म्हणत जा, मग माझ्याकडे येत जा असे म्हणत. व तो निष्ठेने बारा अभंग म्हणतो आहे याची खात्री करून मग नाम देत. असे श्री बाबुरावजी गोखले यांनी मला एकदा सांगितल्याचे स्मरते. त्यांनी 'उमदीमहात्म्य' नावाचे उत्कृष्ट पुस्तक लिहून प्रसिद्ध केले आहे. त्यात (श्रीनरसिंहमहाराज) यांचा उल्लेख प्रामुख्याने केलेला आहे. श्रीगुरुदेव रानडे साहेब यांनी सुशिक्षितांनाही या बारा अभंगाचे महत्व काय आहे ते दाखवून दिले आहे. हेच भजन त्यांना फार आवडले. व श्रीनागाप्पाण्णामहाराज निंबरगीकर हे भजन म्हणत नाचायचे व गुरुदेवांचे देहभान हरपून जावयाचे असे होत असे.

हे बारा अभंग म्हणजे आमचे श्रीनिंबरगीकरमहाराज यांनी स्वर्गातून आणलेले अमृत आहे, असे श्रीअंबुरावमहाराज, श्रीसिध्दरामेश्वरमहाराज म्हणत असत. ते सत्य आहे. अलिकडे बारा अभंगांबरोबर शेवटी ही आरती ही काही भाविक भाविकपणे म्हणत असतात.

हे बारा अभंग उरी बाळगून सर्वांनी कृतार्थ व्हावे महाराजांनी या भजनाबरोबर नेमही करून घ्यावा व आपल्या कृपेने आत्मज्ञानाचा लाभ प्राणिमात्रास होऊन त्यांना आनंदीआनंद करावा अशी निंबरगीकरमहाराजांना प्रार्थना आहे.

– दासरामलेखन वही क्र. ७२ अ/२१४

***

# श्रीतुकाराममहाराज नित्यपाठ तात्पर्यार्थ

(दासरामलेखन वही क्र. ५७)

## अभंग १

**जन्माचे ते मूळ पाहिले शोधून । दु:खासी कारण जन्म घ्यावा ।।१।।**
**पापपुण्य करूनी जन्मा येतो प्राणी । नरदेहा येवुनी हानी केली ।।२।।**
**रज तम सत्त्व आहे ज्याचे अंगी । याच गुणे जगी वाया गेला ।।३।।**
**तुका म्हणे ऐका सत्वाचे सामर्थ्य । करवी परमार्थ अहर्निशी ।।४।।**

### तात्पर्यार्थ

दु:खरूप जन्माचे मूळ शोधून पाहता, कारण जन्म घ्यावा लागतो.(१) पापात्मक पुण्याने प्राणधारीचा जन्म व नरदेहाला येवून हानी.(२) ज्याचे अंगी रज तम सत्त्व आहे, त्याच गुणाने वाया गेला, असे होते.(३) अहर्निशी परमार्थ हेच शुद्ध सत्त्वाचे सामर्थ्य.(४)

## अभंग २

**अहर्निशी सदा परमार्थ करावा । पाय न ठेवावा आडमार्गी ।।१।।**
**आडमार्गी कोणी जन जे जातील । त्यातुनी काढील तोचि ज्ञानी ।।२।।**
**तोचि ज्ञानी खरा तारी दुजीयासी । वेळोवेळा त्यासी शरण जावे ।।३।।**
**आपण तरेल नव्हे ते नवल । कुळे उद्धरील सर्वांची तो ।।४।।**
**शरण गेलिया काय होते फळ । तुका म्हणे कुळ उद्धरीले ।।५।।**

### तात्पर्यार्थ

अहर्निशी सदा परमार्थ करणे म्हणजे आडमार्गी पाय न ठेवणे.(१)



कोणस्थानातून आडमार्गी जाणाऱ्यांना त्यातून काढणाराच ज्ञानी.(२) दुसऱ्यास तारणाऱ्या ज्ञान्याला वेळोवेळी शरण जावे.(३) आपण तरेल ते नवलच नाही. तो सर्वांची कुळे उद्धरील.(४) शरण गेलियाने कायच फळ होऊन कुळाचा उद्धार.(५)

## अभंग ३

**उद्धरिले कुळ आपण तरला । तोचि धन्य झाला त्रैलोक्यात ।।१।।**
**त्रैलोक्यात भला अद्वैती निमाला । योग जो साधला साधन बरवे।।२।।**
**बरवे साधन सुखशांत मन । क्रोध नाही जाण तिळभरी ।।३।।**
**तिळभरी दोष नाही चित्त ते निर्मळ । तुका म्हणे जळ गंगेचे ते ।।४।।**

### तात्पर्यार्थ

ज्याचे कुळ उद्धरीले तो आपण तरलाच.(१) त्रैलोक्यात अद्वैती निमणे हेच बरे योग साधन.(२) तिळभरी क्रोध जाण नसून सुखशांत मन होणे हेच साधन.(३) तिळभरी दोष नसणे हेच चित्ताचे गंगाजळ.(४)

## अभंग ४

**जैसी गंगा वाहे तैसे ज्याचे मन । भगवंत जाण तयाजवळी ।।१।।**
**तयाजवळी देव भक्तिभावे उभा । स्वानंदाचा गाभा तया दिसे ।।२।।**
**तया दिसे रूप अंगुष्ठप्रमाण । अनुभवी खूण जाणती ते ।।३।।**
**जाणती ते खूण स्वात्मअनुभवी । तुका म्हणे पदवी ज्याची त्याला।।४।।**

### तात्पर्यार्थ

जैसी गंगा वाहे तसेच मन होणे हेच भगवंताचे सामीप्य.(१) भक्तिभावे देवाची धारणा हाच स्वानंदाचा गाभा.(२) अंगुष्ठप्रमाण स्वरूपदर्शन हीच अनुभवाची खूण.(३) ही खूण जाणणाराच स्वात्मानुभवी.(४)

## अभंग ५

**ज्याची त्याला पदवी येराला न साजे । संताला उमजे आत्मसुख ।।१।।**

**आत्मसुख घ्यारे उघडा ज्ञानदृष्टी । वाउगी चावटी नका करू ।।२।।**

**नका करू काही संतसंग धरा । पूर्वीचा दोरा उगवेल ।।३।।**

**उगवेल प्रारब्ध संतसंगे करूनी । प्रत्यक्ष पुराणी वर्णियेले ।।४।।**

**वर्णियेली कीर्ति नामरूप घोष । जातील ते दोष तुका म्हणे ।।५।।**

### तात्पर्यार्थ

ज्याची त्यालाच पदवी असून संतालाच आत्मसुखाची प्राप्ती.(१) ज्ञानाने दृष्टी उघडून आत्मसुख घ्यावे.(२) काही न करता संतसंगात पूर्वीचा दोरा उगवेल.(३) संतसंगे प्रारब्ध उगवेल असे पुराणी वर्णिले आहे.(४) दोष नाशक नामरूपघोष हीच कीर्ति.(५)

## अभंग ६

**दोष ते जातील अनंत जन्मीचे । पाय ते देवाचे न सोडावे ।।१।।**

**न सोडावे पाय ऐसा निश्चय करा । आळवा शारंगधरा भावबळे ।।२।।**

**धरोनी केशव आणा भावबळे । पापिया न कळे काही केल्या ।।३।।**

**न कळे तो देव सत्संगावाचुनी । वासना जाळोनी शुद्‌ध करा ।।४।।**

**शुद्‌ध करा मन व्हारे देहातीत । ओळखा वस्तू ते तुका म्हणे ।।५।।**

### तात्पर्यार्थ

देवाचे पाय न सोडल्यास अनंत जन्माची दोष निवृत्ती.(१) भावबळे शारंगधरास आळवणे हाच पाय न सोडण्याचा निश्चय.(२) काही करणाऱ्या पाप्याला न कळे.(३) वासना जाळूनच शुद्‌ध केली पाहिजे.(४) देहातीत शुद्‌ध मनाने वस्तूची ओळख.(५)



## अभंग ७

**वस्तू ते ओळखा सांडा रे कल्पना । नका आडराना जाऊ झणी ।।१।।**

**झणी जाल कोठे बुडवाल हित । विचारी मनात आपुलिया ।।२।।**

**आपुलिया जीवे शिवासी पहावे । आत्मसुख घ्यावे वेळोवेळा ।।३।।**

**घ्यावे आत्मसुख स्वरूपी मिळावे । भूती लीन व्हावे तुका म्हणे ।।४।।**

### तात्पर्यार्थ

कल्पना सांडणे ही वस्तूची ओळख.(१) विचारी आपुल्या मनातच असतो व तो आपल्या मनातच विचारी असतो.(२) वेळोवेळी आत्मसुखाचे लाभ हेच आपुल्या जीवाने शिवास पहाणे.(३) स्वरूपी मिळून भूती लीन व्हावे.(४)

## अभंग ८

**भूती लीन व्हावे सांगावे न लगेची । आता अहंकाराची शांती करा।।१।।**

**शांती करा तुम्ही ममता नसावी । अंतरी असावी भूतदया ।।२।।**

**भूतदया ठेवी तया काय उणे । प्रथम साधन हेची असे ।।३।।**

**असे जे साधन जया चित्ती वसे । मायाजाळ नासे तुका म्हणे ।।४।।**

### तात्पर्यार्थ

अहंकाराची शांती होऊन भूती लीन झाले त्याला सांगण्याची जरूरीच नाही.(१) अंतरी भूतदया असावी पण ममता नसावी.(२) काय उणे होऊन भूतदया ठेवणे हे प्रथम साधन.(३) असे साधन चित्तात वसणे म्हणजे मायाजाळाचा नाशच.(४)

## अभंग ९

**मायाजाळ नासे या नामे करुनी । प्रीती चक्रपाणि असो द्यावी ।।१।।**
**असो द्यावी प्रीती साधूचे पायासी । कदा कीर्तनासी सोडू नये ।।२।।**
**सोडू नये कीर्तन पुराण श्रवण । मनन निदिध्यासन साक्षात्कार ।।३।।**
**साक्षात्कार झालिया सहज समाधी । तुका म्हणे उपाधी गेली त्याची।।४।।**

### तात्पर्यार्थ

या नामे करून मायाजाळाचा नाश हीच चक्रपाणिची प्रीती.(१) साधूंचे पायासी प्रीती ठेवून केव्हाही कीर्तन सोडू नये.(२) कीर्तन पुराण श्रवण मनन निदिध्यास न सोडणे हा साक्षात्कार.(३) उपाधिरहित साक्षात्कारातून सहजतेत येणे हीच श्रीतुकाराममहाराजांची समाधी.(४)

## अभंग १०

**गेली त्याची जाणा तोची ब्रह्म झाला । अंतरी निवाला पूर्णपणे ।।१।।**
**पूर्णपणे धाला राहतो कैशा रीती । त्याची आता स्थिती सांगतो मी।।२।।**
**सांगतो मी तुम्हा ऐका मनोगत । रहातो मूर्खवत जगामाजी ।।३।।**
**जगात पिशाच्च अंतरी शहाणा । सदा ब्रह्मी जाणा निमग्न तो ।।४।।**
**निमग्न तो सदा जैसा मकरंद । अंतर्बाह्य भेद वेगळाले ।।५।।**
**वेगळाले भेद क्लुप्ती त्या असती । हद्गद त्याची गती न कळे कवणा।।६।।**
**न कळे कवणाला तयाचे ते वर्म । योगी जाणे मर्म खूण त्याची ।।७।।**
**खूण त्याची जाणे जे का तैसे असती । तुका म्हणे भ्रांती दुजियाला।।८।।**



### तात्पर्यार्थ

उपाधीपैल अंतरी पूर्णपणे निवाला तोच ब्रह्म झाला.(१) पूर्णपणे धाला तो रीतीच रहातो.(२) जगात तो मूर्खवत असतो.(३) जगात पिशाच्च अंतरी शहाणा (तो सदा ब्रह्मी निमग्न असतो) ही ब्रह्मी निमग्नता.(४) अंतर्बाह्य भेद वेगळाले होऊन, निमग्नत्व(५) भेद वेगळाले होऊन, क्लुप्तीने हृदयांतर्गत गतीची प्राप्ती.(६) ही मर्म खूण योगीच जाणे.(७) जे का तैसे असती तेच ही खूण जाणतात.(८)

## अभंग ११

**दुजियाला भ्रांति भाविकाला शांती । साधूचिया वृत्ती लीन झाल्या।।१।।**
**लीन झाल्या वृत्ती ब्रह्मी ते मिळाले । जळात आटले लवण जैसे ।।२।।**
**लवण जैसे पुनः जळाचे बाहेर । येत नाही खरे त्यातुनिया ।।३।।**
**त्यासारखी जाणा तुम्ही साधूवृत्ती । पुनः न मिळती मायाजाळ ।।४।।**
**मायाजाळ त्याना पुनः रे बाधेना । सत्य सत्य जाणा तुका म्हणे ।।५।।**

### तात्पर्यार्थ

भाविकास शांती प्राप्त होऊन साधूंच्या वृत्ती लीन झाल्या.(१) वृत्ती लीन झालेले ब्रह्मास मिळाले.(२) लवण जळाचे बाहेर येत नाही.(३) साधूवृत्ती मायाजाळी मिळत नाही.(४) मायाजाळ त्याला पुनः बाधणार नाही असे श्रीतुकाराममहाराज सांगतात.(५)

## अभंग १२

**स्वर्ग लोकी होनी आले हे अभंग । धाडियेले सांग तुम्हालागी ।।१।।**
**नित्यनेमे यांसी पढता प्रतापे । जळतील पापे जन्मांतरीची ।।२।।**
**तयामागे पुढे रक्षी नारायण । मांडिल्या निर्वाण उडी घाली ।।३।।**
**बुद्धीचा पालट नासेल कुमती । होईल सद्गती येणे पंथे ।।४।।**
**सद्गती झालीया सहज साक्षात्कार । होईल उद्धार पूर्वजांचा ।।५।।**
**साधतील येणे इहपर लोक । सत्य सत्य भाक माझी तुम्हा ।।६।।**
**परोपकारासाठी सांगीतले देवा । प्रासादीक मेवा ग्रहण करा ।।७।।**
**येणे भवव्यथा जाईल तुमची । सख्या विठ्ठलाची आण मज ।।८।।**
**टाळ आणि कंथा धाडिली निशाणी । घ्यारे ओळखोनि सज्जन हो ।।९।।**
**माझे दंडवत तुम्हा सर्व लोका । देहासहित तुका वैकुंठासी ।।१०।।**

### तात्पर्यार्थ

स्वर्गलोकाहून आलेले हे सांग अभंग तुम्हालागी धाडले.(१) नित्यनेमे प्रतापे पढता जन्मांतरीची पापे जळतील.(२) मागे पुढे नारायण त्याचे रक्षण करून निर्वाण मांडल्यास तो उडी घालतो.(३) बुद्धीचा पालट कुमतीचा नाश हीच सद्गती.(४) सद्गती झालिया सहजतेत साक्षात्काराने पूर्वजांचा उध्दार.(५) येणे इहपरलोक साधतील अशी माझी तुम्हास भाक आहे.(६) परोपकारासाठी देवाने सांगितलेला प्रासादीक मेवा ग्रहण करा.(७) येणे तुमची भवव्यथा जाईल अशी सख्या विठ्ठलाची आण आहे.(८) हे सज्जनहो, टाळ आणि कंथा धाडली निशाणी ओळखून घ्या.(९) माझे तुम्हा सर्वास दंडवत असून देहासहित तुका वैकुंठास गेला.(१०)



## अभंग १३

**सत्य सत्य जाणा त्रिवाचा नेम हा । अनुभव पहा पदोपदी ।।१।।**
**पदोपदी पहा श्रीमुख चांगले । प्रत्यक्ष पाऊले विठोबाची ।।२।।**
**विठोबाची भेटी घडेल वाचिता । तुम्हालागी आता सांगितले ।।३।।**
**सांगितले खरे विश्वाचिया हिता । अभंग वाचिता जे का नर ।।४।।**
**ते नर पठणी जीवन्मुक्त झाले । पुन: नाही आले संसारासी ।।५।।**
**संसार उडाला संदेह फिटला । पूर्ण तोची झाला तुका म्हणे ।।६।।**

### तात्पर्यार्थ

त्रिवाचा नेमाने पदोपदी अनुभव.(१) पदोपदी श्रीमुख व प्रत्यक्ष विठोबाची पाऊले पहा.(२) हे वाचिता विठोबाची भेटी घडेल.(३) विश्वाचिया हिता हे सांगितले.(४) जे पठणी जीवन्मुक्त झाले ते पुन: संसारास आले नाहीत असे होईल.(५) संसार उडून संदेह फिटला तोच पूर्ण झाला.(६)

## अभंग १४

**पांच कोटी एक लक्षाचा शेवट । चौतीस सहस्र स्पष्ट सांगितले ।।१।।**
**सांगितले इतुके कथोनिया गेला । बारा अभंगाला सोडू नका ।।२।।**
**सोडू नका तुम्हा सांगितले वर्म । भवपाश कर्म चुकतील ।।३।।**
**चुकती यातायाती विठोबाची आण । करा हे पठण जीवेभावे ।।४।।**
**जीवेभावे करीता होईल दर्शन । प्रत्यक्ष सगुण तुका म्हणे ।।५।।**

## तात्पर्यार्थ

पांच कोटी एक लक्ष चौतीस हजार अभंग स्पष्टच सांगितले.(१) बारा अभंगाला सोडूच नका.(२) यातील वर्माने भवपाश कर्म चुकतील.(३) हे जीवेभावे पठण केल्यास यातायाती चुकतील हे विठोबाची शपथ घेऊन सांगतो.(४) याप्रमाणे जीवेभावे पठण करता प्रत्यक्ष सगुण दर्शन होईल, असे श्रीतुकाराममहाराज सांगतात.(५)

## अभंग १५

**वेदाचे अभंग केले श्रुतीपर । द्वादश सहस्र संहितेचे ।।१।।**
**निघंट निरुक्त आणि ब्रह्मसूत्र । अवतार सहस्र उपग्रंथ ।।२।।**
**अभंग ते कोटी भक्तिपर झाले । ज्ञानपर बोलिले तितुकेची ।।३।।**
**पंचाहत्तर लक्ष वैराग्य वर्णिले । नाम ते गाईले तितुकेची ।।४।।**
**साठ लक्ष केला बोध या जनासी । वर्णिले रूपासी तितुकेच ।।५।।**
**तीस लक्ष केली देवासी करूणा । कर्मकांड जाणा एक लक्ष ।।६।।**
**द्वादश सहस्र स्वात्मअनुभव । एवं जाणा सर्व संख्या ऐसी ।।७।।**
**ऐसे हे अभंग झालेसे भूतळी । बारा अंतराळी पत्रिकेचे ।।८।।**
**चौतीस सहस्र लक्ष एक कोटी पाच । सांगोनिया साच गेला तुका ।।९।।**

## तात्पर्यार्थ

वेदाचे श्रुतीपर अभंग केले, त्यातील बारा हजार संहितेचे आहेत.(१) निघंट निरूक्त ब्रह्मसूत्र आणि अवतारादि उपग्रंथावर सहस्र अभंग आहेत.(२) एक कोटी अभंग भक्तिपर व तितकेच ज्ञानपर बोलले.(३) पंचाहत्तर लक्ष अभंगी वैराग्य वर्णिले असून, नामपर तितकेच गाईले आहेत.(४) साठ लक्ष अभंग बोधाचे असून रूपवर्णनात्मक तितकेच आहेत.(५) तीस लक्ष अभंगात देवाची करूणा असून, कर्मकांडाचे एक लक्ष अभंग आहेत.(६) द्वादश सहस्र अभंग स्वात्मानुभवाचे आहेत.(७) असे हे सर्व अभंग भूतळी झाले असून बारा अभंग अंतराळी म्हणजे श्रीतुकाराममहाराजांचे वैकुंठगमनानंतर व शिष्यजन आलाप करू लागल्यावर शिष्यजनांच्या समाधानाकरता पाठवलेले आहेत.(८) पांच कोटी एक लक्ष चौतीस हजार अभंग सांगून श्रीतुकाराममहाराज निजधामास गेले.(९)



## अभंग १६

**सगुण हे ब्रह्म विठ्ठलचि बोले । ऐके पा वहिले तुकारामा ।।१।।**
**तुकाराम तुवा केले जे अभंग । करती जे का जगी नित्यपाठ ।।२।।**
**नित्यपाठ करिता आवडी सद्भावे । विपत्ती न होय प्राणियासी ।।३।।**
**प्राण्याचे कल्याण होईल बा पाहे । भावे वाचिता हे नित्यनेमे ।।४।।**
**नेमे संकटासी करी अकरा पाठ । विघ्न त्याचे स्पष्ट दूर होय ।।५।।**
**दूर होय विघ्न विठ्ठल म्हणे तुकया । शेवटी निजठाया नेईल मी ।।६।।**

## तात्पर्यार्थ

सगुण ब्रह्म विठ्ठलच, श्रीतुकाराममहाराजांना सांगतात.(१) तुकारामा, तुम्ही केलेले हे अभंग नित्य आवडीने व सद्भावाने पठण केल्यास त्या प्राण्यास विपत्ती होणार नाही.(२)(३) हे नित्यनेमे भावे वाचिता प्राण्याचे कल्याण होईल.(४) संकटकाळी नियमाने या अभंगांचे अकरा पाठ केल्यास त्याचे विघ्न दूर होईल हे स्पष्ट आहे.(५)

हे अभंग अशा रीतीने नित्यनियमाने पठण करणाऱ्याचे विघ्न दूर होऊन शेवटी त्याला मी निजठायास नेईन, असे भगवान विठ्ठल श्रीतुकाराममहाराजांना सांगतात.(६)

***

श्रीतुकाराममहाराजांचे सदेह श्रीवैकुंठगमन आणि या परमदुर्लभ भाग्यप्राप्तीचा सुगम साधन क्रम

# श्रीतुकाराममहाराज निर्याण

आरती तुकारामा । स्वयंब्रह्म परंधामा ।
नवलाव जगी केला । स्वये गेला निजधामा ।।ध्रु.।।
कंठ ऊर जिवन करुनी । लिंगदेहे विमानी ।
आरूढ होवोनी गेला । आज्ञाचि जे चक्रपाणि ।।१।।
निर्याण अभंग हे । गावोनिया निर्वाणी ।
नारायणमहाराज । ऐक्य झाले नारायणी ।।२।।
अभंग परंपरा । लाधली जे रामचंद्रा ।
हनुमंतराया तेची । दिली निजयोग मुद्रा ।।३।।
संग्रही रघुनाथा । आले कृपेचे गूज ।
संप्रदायी निर्याणी । गाती विश्वाचे बीज ।।४।।
अक्षरी उजळोनी । दीपमार्ग दाविले ।
सदेह तुकाराम । वैकुंठासी केवी गेले ।।५।।
तुका बैसे विमानी । संत पाहती लोचनी ।
वचन ते सार्थ केले । टाकीमहाराज यांनी ।।६।।
अभंग निर्याणीचे । भक्ता पावती निर्वाणी ।
गुरुभाईकृपे खूण । ग्रंथी दाविली निशाणी ।।७।।
हनुमंतदास रामा । कृपा जाली समाधानी ।
गुण किर्ती गावोनीया । भक्तीप्रेम साधनी ।।८।।

– प.पू.श्रीदासराममहाराज (इ.स.१९५०)



## श्रीदासराममहाराज ग्रंथमाला सूची

| अ.नं. | पुस्तकाचे नांव | सन |
|---|---|---|
| ०१) | चिमड संप्रदाय | २००५ |
| ०२) | श्रीरामदासस्वामी चरित्र | २००६ |
| ०३) | श्रीदासरामहाराजप्रणित भजन तरंग | २००६ |
| ०४) | श्रीदासममहाराज कथित हरिपाठ संकीर्तन | २००७ |
| ०५) | श्रीदासराममहाराज नित्यपाठ चरित्र | २००७ |
| ०६) | दासबोधातील तत्त्वज्ञान | २००७ |
| ०७) | श्रीदासराममहाराजांचा वचनसंग्रह | २००८ |
| ०८) | श्रीरघुनाथप्रिय साधुमहाराज चरित्र | २००९ |
| ०९) | **साधन संध्या** (श्रीगुरूलिंगगीता, श्रीरामपाठ, पंचपदी, बारा अभंग, श्रीतात्यासाहेबमहाराजांचे श्लोक) | २००९ |
| १०) | **अनंत अमृत स्मरण** (श्री.अनंत गं.केळकर यांचे ओवीबद्ध संक्षिप्त चरित्र) | २००९ |
| ११) | श्रीगुरुमहिमा | २००९ |
| १२) | **श्रीज्ञानेश्वरी प्रसाद** (श्रीज्ञानेश्वरीतील निवडक ओव्या–अर्थासह) | २००९ |
| १३) | श्रीदासरामगाथा पुरवणी | २००९ |
| १४) | श्रीदासराममहाराज आत्मचरित्र | २०१० |
| १५) | श्रीनारायणमहाराज यरगट्टीकर चरित्र | २०१० |
| १६) | श्रीदासराममहाराज श्लोकरचना | २०१० |
| १७) | **श्रीज्ञानदेवकृत अमृतानुभव** (सम ओवी टीकेसह) | २०१० |
| १८) | श्रीदासराममहाराज सहस्रनामस्तोत्र | २०१० |
| १९) | **समर्थरामदासस्वामीकृत आत्माराम** (श्रीदासराममहाराजकृत गद्य अर्थासह) | २०१० |
| २०) | श्रीगुरुलिंगगीता (कानडी लिपीत) | २०१० |
| २१) | श्रीगुरुलिंगगीता (मराठी) | २०१० |
| २२) | श्रीरामनिकेतन (माहिती पुस्तिका) | २०११ |

२३) **श्रीरामनिकेतनमधील आराधना**
(श्रीतुकाराममहाराजांचे निजधामाचे अभंगासह) २०११
२४) **ग्रंथत्रयी** (आत्मबोध प्रत्ययामृत,श्रीदासरामविंशिका श्रीदासरामपंचविशी) २०११
२५) **श्रीज्ञानदेवकृत उत्तरगीता** (श्रीदासरामकृत गद्य अर्थासह) २०११
२६) **अभंग दरबार (आवृत्ती १)** २०११
२७) **सद्‌बोध दशक** (श्रीदासरामरक्षास्तोत्रासह श्रीदासराममहाराज यांना संतांनी दर्शन देऊन केलेला बोध) २०११
२८) **श्रीदासराममहाराज नित्यपाठचरित्र** २०११
२९) **श्रीगुरुराज कथित ज्ञान आणि बोध** २०११
३०) **प.पू.श्रीमाईसाहेब यरगट्टीकर चरित्र** २०११
३१) **पाठांतर सुलभ भगवद्‌गीता** २०११
३२) **श्रीदासराममहाराज लिखित लघुचरित्रे** २०११
३३) **श्रीतात्यासाहेबमहाराजकृत मनोबोध**
(व निवडक अभंग विवरणासह) २०११
३४) **प.पू.श्रीरामभाऊमहाराज यरगट्टीकर चरित्र** २०११
३५) **महायोगिनी श्रीलक्ष्मीबाई अक्का चरित्र** २०११
३६) **तो हा दासबोध** (श्रीमद् दासबोधातील सारभूत ओव्या अर्थासह) २०११
३७) **श्रीदासराममहाराज चरितामृत** २०११
३८) **श्रीनिंबरगीकरमहाराज चरित्र** २०११
३९) **श्रीदाजीसाहेबमहाराज यरगट्टीकर चरित्र** २०११
४०) **श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस चरित्र** २०११
४१) **श्रीदासराममहाराज यांची आत्मलहरी** २०११
४२) **श्रीदासराममहाराजकृत हरिनामसंकीर्तन** २०१२
४३) **श्रीदासराममहाराज यांची प्रवचने** २०१२
४४) **प.पू.श्रीमामामहाराज केळकर चरित्र** २०१२
४५) **श्रीदासरामगीतम्** (श्रीदासराममहाराज यांचे संस्कृत चरित्र व संस्कृत रचना) २०१२



४६) **श्रीदासराममहाराज वचनसंग्रह** २०१२
४७) **चैतन्यब्रह्म** (श्रीब्रह्मचैतन्यमहाराज व श्रीदासराममहाराज यांच्या जीवनातील साधर्म्य दाखविणारे) २०१३
४८) **श्रीदासराममहाराज विरचित वायुलहरी** (विवरण) २०१३
४९) **श्रीदासराममहाराजकृत सात करुणाष्टके** (विवरणासह) २०१३
५०) **श्रीगुरुलिंगगीता** (६६ पदे व अर्थ) श्रीदादांच्या इच्छेनुरूप विशिष्ट पध्दतीने छापलेली २०१३
५१) **श्रीरामचंद्रावजीमहाराज,चिमडकृत चिमड संप्रदायातील पंचपदी** २०१३
५२) **गुरुलिंगगीतेचे अंतरंग (भाग-१)** २०१४
५३) **श्रीदासराममहाराजकृत रामदासबोध** (विवरणासह) २०१४
५४) **श्रीदासरामायण** (श्रीदासराममहाराज यांचे गीतचरित्र) २०१४
५५) **श्रीदासराममहाराज केळकर नामसाधना मंदिर वास्तुशांत** २०१४
५६) **श्रीदासराममहाराजकृत रेवणसिध्दपाठ** (विवरणासह) २०१५
५७) **गुरुलिंगगीतेचे अंतरंग (भाग-२)** २०१५
५८) **अभंग दरबार (आवृत्ती २ री)** २०१५
५९) **श्रीदासरामचरित्र** २०१५
६०) **आत्मारामपाठ** (श्रीदासरामगाथेवरील २० निवडक अभंगांचा समुह) २०१५
६१) **श्रीज्ञानेश्वरीमधील ६ वा अध्याय**(श्रीदासराममहाराजकृत गद्य अर्थासह) २०१५
६२) **श्रीमद् दासबोधातील प्रपंचयोग** २०१५
६३) **अभंग दरबार (भाग २)** २०१५
६४) **श्रीज्ञानदेवांचे निवडक अभंग** (श्रीदासराममहाराजकृत अर्थासह) २०१६
६५) **श्रीएकनाथमहाराज प्रणित आनंदानुभव**
(श्रीदासराममहाराजकृत आनंदविलास टीकेसह) २०१६
६६) **नासदीयसूक्त विवरण** २०१६
६७) **श्रीज्ञानदेवतेहत्तिशी भावार्थ-विवरण** २०१७
६८) **पाठांतरसुलभ श्रीमद्‌भगवद्‌गीता आवृत्ती दुसरी** २०१९
६९) **दासबोधातील परमार्थयोग** २०१९